

संपादक - प्रा. नंदकुमार आरंबे

# अजिंठा

नियतकालिक

१९९३-९४

KNOWLEDGE IS POWER

# अजिंठा

## नियतकालिक

१९९३-९४

## मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव

संपादक

प्रा. नंदकुमार भारंबे

विद्यार्थी प्रतिनिधी

सुधीर केणे

राकेश शिरसाठे

कु. वासंती बोरकर

## संपादक मंडळ

प्राचार्य - डी.एस. नेमाडे

उपप्राचार्य- डी.एच. महाजन

उपप्राचार्य- एम्.के. येवले

उपप्राचार्य- पी.एल. कोल्हे

प्रा. नंदकुमार भारंबे

प्रा. डॉ. आर. टी. चौधरी

प्रा. डॉ.के.एम. पाटील

प्रा. सौ.एम. गोखले

प्रा. ओ.जी. आयनाले

प्रा. सौ. पी.बी. राणे

प्रा. सौ. एल.वाय. वाणी

प्रा.सौ. यु.एस. मानुधने

### विद्यार्थी प्रतिनिधी

सुधीर केणे

राकेश शिरसाठे

कु. वासंती बोरकर

## संपादकीय

सस्नेह,

अजिंठाच्या निमित्ताने आपल्याशी सुसंवाद साधतांना मला आनंद होत आहे. हे २० व्या शतकातील शेवटच्या दशकातील चवथे वर्ष यात मनुष्य पाखरा प्रमाणे उंच उडू लागला, समुद्रात माशा प्रमाणे विहार करु लागला, माणसाने निसर्गावर विजय मिळवून सुख समृध्दीचे जिवन जगू लागला. आजचे प्रगतशास्त्र हे बुध्दीच्या गगनचुंबी विजय स्तंभ म्हटला पाहिजे. प्रत्येक यंत्र माणसाने निसर्गावर मिळवलेल्या विजयाचे प्रतिक आहे. माणूस बुध्दीच्या मागे धावून भावनेला विसरला, बुध्दीला भावनेची जोड नाही. लहान मुल आईच्या साध्या गाण्याने शांत झोपी जाते. ही ताकद रेडीओ टी.व्ही.तील अत्युच्च्य संगितात नाही. भावना अशीच मोठी आहे.

भारत आंतराष्ट्रीय क्षेत्रात एक महासत्ता होवू पाहात आहे. नविन आर्थिक धोरणाने निश्चित मूठभरांचाच लाभ होणार पण बहुसंख्याकांचे काय होणार ? इ.स. १६०० मध्ये ब्रिटनमधील एकाच कंपनीने भारतात येवून अमर्याद उच्छाद मांडला. अर्थ व राजसत्तेवर प्रचंड नियंत्रण ठेवून पध्दतशीर रित्या भारताचे शोषण केले. आता तर असंख्य परकिय कंपन्या आपल्या अत्याधूनिक यंत्र तंत्र कॉम्प्युटर ही शस्त्रास्त्रे घेवून येणार त्यांमुळे भारताचे कसे होणार ? हिच चिंता साऱ्यांसमोर आहे.

ज्या भीष्माने आपले सर्व आयुष्य त्यागासाठी खर्च केले त्यास दुर्योधनाच्या दुष्टपणाला थोडाही आवर घालता आला नाही. कारण 'अर्थस्य पुरुषो दास' हे मानवी जिवनाचे विदारक सत्य प्राचीन कालापासून चालत आलेले आहे. 'गुलाम, नसतो पैसा पण मोठ मोठे तंत्रज्ञ त्यांचे असतात गुलाम,' गरीबांची उपासमार होणार, श्रीमंताना अजीर्ण होणार, यावर स्पर्धा मार्ग असला तरी उपाय नाही.

या वर्षाचे सिंहावलोकन करतांना मन विषण्ण आहे, अंतःकरणात दुःख आहे. व्याकुळलेल्यांचा टाहो कानात आहे. तो भूकंपांच्या रुपाने, सुखात विरजण पडावं, वैभवाच्या झगमगाटात क्षणभर अंधारी यावी त्या निरामयी स्पंदनांनी माणूस घायाळ व्हावा अशी आमची स्थिती झाली आहे. फुल सुकायचे असते पण कोमजून जाईतो सुगंध दिला की त्याच्या जिवनाचे सार्थक होते. मानवी जिवनाचेही तसेच आहे.

या वर्षी आमच्या महाविद्यालयाच्या प्रांगणात मराठी समाजशास्त्र परिषद भरली. सामाजिक दृष्ट्या मराठी माणूस कुठं आहे कुठं जाणर ! याची सविद्य चर्चा विचारवंतात झाली.

राष्ट्रीय सेवा योजनेचे हे रौप्य महोत्सवी वर्षे/ सुंदर वसुंधरा/वनीकरण, सुंदर परिसर, निरंतर साक्षरता अंधश्रध्दा निर्मूलन, पाणी अडवा व जिरवा मृदसंधारण अश्या एकापेक्षा एक वैविद्य कार्यक्रमांनी भरभरुन हे वर्ष गेले.

राष्ट्र व समाज बदला बरोबर शिक्षण पध्दतीत बद्दल केला पाहिजे यासाठी नविन औद्योगिक आव्हानास समोरे जाण्यासाठी सक्षम, सबल विद्यार्थी व्हावा व त्यांची संशोधन प्रवृत्ती वृध्दीगत व्हावी या हेतूने उ.म.वि.ने कला विभागाकडे सुरु केलेले 'प्रात्यक्षिक' संबध शिक्षण क्षेत्रात एक आगळे वेगळे वैशिष्ट्य ठरले आहे.

आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. अण्णासाहेब बेंडाळे यांनी वयाच्या पंचाहत्तर वर्षात पदार्पण केले. कर्मत्याग, फलत्याग, व सेवा त्याग अश्या त्यागाच्या मूर्तीमंत ऋषीलां आम्ही विनम्र अभिवादन करुन आयुरोग्य, दिर्घायुष्य लाभो हीच ईश्वर चरणी मनो प्रार्थना.

मुख पृष्ठाचे डिझाईन, शांतता, औद्योगिकरण व हरितक्रांती ज्ञान प्रकाशाचे प्रतिक असलेले, खडसे विकास प्रल्हाद टी.वाय.बी.ए. यांनी काढलेले आहे.

तसेच अजिंठा सर्वांग सुंदर व्हावा, त्याला अष्टांग पैलू पाडण्यात सर्वांनी केलेली मदत व सहाय्य, अमूल्य आहे. त्या सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

प्रा. नंदकुमार भारंबे

## विद्यार्थी प्रतिनिधीक मनोगत

''यत्र नार्यस्तू पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता,'' असे सांगणाऱ्या महान भारतीय संस्कृतीने स्त्रियांना योग्य तो आदर केला आहे. भारतीय घटनेनेही यांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार दिले आहेत. केवळ आदर्श गृहीणी-माता आणि काही ठराविक क्षेत्रापूरतीच मर्यादित न रहाता स्त्रियांनी राजकीय - प्रशासकीय सेवा, तांत्रिक व औद्योगिक क्षेत्र, बॅकींग व व्यवस्थापना या क्षेत्रात अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे आणि त्यासाठी महाविद्यालयीन जीवमापासून सुरुवात करावी हीच अपेक्षा.

**कु. वासंती बोरकर**

एम.ए. राज्यशास्त्र

प्रिय विद्यार्थी मित्रानो,

ज्ञानाच्या अथांग सागरात पोहतांना आपल्याला यश आणि अपयशाच्या प्रचंड लाटांचा सामना करावा लागतो. प्रत्येकास लवकरच यश मिळेल असे नाही. परंतु अपयश आले म्हणजे, प्रयत्न सोडून द्यायचे असे सुध्दा नाही कारण ''प्रयत्नांती परमेश्वर'' ही म्हण आपणास माहीतच आहे. म्हणूनच अपयशाच्या लाटांचा सामना करुन यशाचा किनारा गाठेपर्यंत या सागरात पाहणे हे आपले ध्येय असावे. तरच आपले भविष्य उज्वल होईल.

**सुधीर केने**

बी.ए. (अर्थशास्त्र)

प्रिय विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

कॉलेजचे जीवन आनंददायी... उत्साहाचे असते... प्रत्येकाच्या कॉलेज जीवनात... सुखाचे... दु:खाचे... प्रेमाचे... विरहाचे... असे अविस्मरणीय क्षण असतात... स्नेह संम्मेलन... सेण्डॉप... ट्रीप... इ.

आणि एक दिवस... एक. दिवस... शेवटच्या वर्षाची परीक्षा देवून... कॉलेज जीवना पासून अलविदा... होण्याचा प्रसंग येतो... जिवनाच्या या अथांग सागरात... या मित्र-मैत्रिणींच्या होड्या... घोंगावत जाणाऱ्या... वाऱ्यासारशी इतरत्र भरकटतात... भावी आयुष्याच्या वळणावर... नाईलाजास्तव आपल्या मित्राचा निरोप... घेवून त्यांना असे म्हणण्याची... वेळी ही येतेत.

*''रहे गुलशन तो फुल खिलेंगे,*
*रही जिंदगी तो फिर मिलेंगे''*

**राकेश एस. सिरसाठे**

एम.कॉम. (ज्यूनिअर)

### : वंदना :

केले अर्पण जीवन तयांनी
आपल्या या भारत भूमीला
विसरतो न आम्ही क्षणभर
साहसी त्या विरांना
फुलाप्रमाणे झेलून गोळ्या,
स्थान मिळाले स्वर्गात त्यांना.
बलिदानाचे स्मरण ठेवूनि,
त्यांना करीते मी वंदना

***ए.एस. सिरसाठे***

# अमृत महोत्सवानिमित्त अभीष्टचिंतन



**मा.डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे**

अध्यक्ष- के.सी.ई. सोसायटी , **जळगांव**

संस्थाचालक

# डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे.

## माझ्या अनुभवातून,

लेखक- प्राचार्य डी.एस. नेमाडे

जळगाव शहरातील एक ख्यातनाम शल्यविशारद, डोळस विचारवंत व शिक्षणक्षेत्रातातील प्रयोगशील आणि प्रगल्भ संस्थाचालक डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे ह्यांनी येत्या सप्टेंबर मध्ये वयाची पंचाहत्तर वर्षे नुकतीच पूर्ण केली आहेत. त्यांच्या वयास ७५ वर्षे पूर्ण झालीत. हे एक निमित्तमात्र समजून त्यांचे कुटुंबीय व स्नेहीजन ह्यांनी गेले पूर्ण वर्ष 'अमृत महोत्सवी वर्ष'' म्हणून साजरे केले.

आजकाल संस्थाचालक या जातीविषयी बरेच समज-गैरसमज आहेत. तरीही या क्षेत्रात, विशेषत: शिक्षणाशी संबंधीत क्षेत्रात अशी काही विश्वासपात्र नावे आहेत की त्यांच्याविषयी लोकांना आदर वाटावा. त्यात डॉ. अण्णासाहेब बेंडाळे ह्यांच्या समावेश करावा लागेल. यामागील कारणाचा जर आपण शोध घेतला तर त्यांच्या योग्यतेचे विविध पैलू आपल्या सहज लक्षात येतील.

बऱ्याच संस्थांना आज पैशांचा अपहार व सत्तेचा दुरुपयोग याचं ग्रहण लागलेलं दिसतं. पण आपल्या संस्थांना हे ग्रहण लागू नये, त्याची निकोप वाढ व्हावी म्हणून सदैव दक्षता त्यांनी बाळगली. खरं म्हणजे केवळ आर्थिकच नव्हे तर इतरही अनेक शैक्षणिक प्रश्न शैक्षणिक संस्थाशी निगडीत असतात व संस्थाचालक ह्यांचा ह्या ना त्या नात्याने या प्रश्नांशी संबंध असतो.

आपल्या संस्थेत शिक्षण विषयक सोयी उपलब्ध करुन देणे, शिक्षणाचा दर्जा वाढेल व टिकेल असे वातावरण निर्माण करणे, शिक्षक- प्राध्यापक व इतर सेवकवर्ग ह्यांच्या न्याय्य हक्काचं संरक्षण करणं यासारख्या अनेक गोष्टींचा संस्थाचालकांनी विचार करणे आवश्यक ठरते. व म्हणून शैक्षणिक मूल्ये, शैक्षणिक उद्दिष्ट्ये, शिक्षण प्रक्रियेतील परस्परांशी संबंधीत घटक ह्या सर्वाचे ज्ञान असल्याशिवाय या प्रश्नांचा उकल होऊच शकणार नाही. अशा प्रकारचं विचारसंपन्न नेतृत्व देणारी संस्था चालक मंडळी आजही आहेत. ह्या मोजक्या मंडळीत एक नाव डॉ. अण्णासाहेब यांच आहे.

या संदर्भात एक गोष्ट येथे आग्रहपूर्वक नमुद करावीशी वाटते की संस्थेच्या दृष्टीने उपकारक ठरणारे पण हितसंबंधी लोकांना अप्रिय वाटणारे निर्णय संस्थाचालकांना बऱ्याचदा घ्यावे लागतात. संस्थेच्या दृष्टीने हे महत्वाचे किंबहुना कसोटीचे क्षण असतात. अण्णासाहेबाविषयी बोलायचे झाल्यास संस्थेच्या दृष्टीने हितावह असे निर्णय घेण्याचे धैर्य दाखवून त्यांनी आपल्या कर्तव्यकठोर बुध्दीचा परिचय अनेकदा करुन दिलेला आहे. या संदर्भात त्यांना बऱ्याचदा टीका सहन करावी लागली. पण आपला निश्चय त्यांनी सहसा बदलला नाही. संस्थेच्या कारभारात सर्व सहकाऱ्यांना सामील करुन घेण्यात ते सदैव प्रयत्नशील असतात. लोकशाहीत मतभेद होणं हा अपरिहार्य भाग आहे. पण मतभेद मिटावेत, संस्थेला झळ न लागता त्यातून योग्य तो मार्ग निघावा

या बाबतीत अण्णासाहेबांनी नेहमीच दक्षता घेतलेली आहे. काही प्रसंगी नाराजीचे व प्रक्षुब्ध होण्याचे प्रसंग मधून मधून त्यांच्यावर आलेत. पण संयम दाखवून त्याचे उग्र प्रदर्शन कधीच होऊ दिले नाही.

शिक्षण संस्थाचालक म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा पैलू शिक्षणक्षेत्रात उठून दिसण्यासारखा आहे. या बरोबरच ''वैद्यकीय सेवा'' व ''योग आणि अध्यात्म'' हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे आणखी उल्लेखनीय पैलू होत. रुग्णालयासाठी संस्थेने अत्याश्यक अशी १५० खाटाची सोय असलेली भव्य वास्तू उभी केली असून तिच्यात अगदी माफक दरात रुग्णालय सुरु करण्यात आले आहे. विशेष म्हणजे हे रुग्णालय चालविण्याच्या मुळाशी संस्थेने केवळ व्यावसायिक दृष्टिकोन ठेवलेला नाही. तर दुर्धर रोगांचे उपचार जिल्ह्यातील लोकांना येथल्या येथे अल्पखर्चात घेता यावे हा ह्या मागचा संस्थेचा उद्देश आहे.

अध्यात्म व योग हे अण्णांचे एक अंगभूत वैशिष्ट होय. हा विषय केवळ अभ्यासाचा नसून तो आचणाचा व अनुभूतीचा आहे असे ते नेहमीच म्हणत आहेत. योग हा अध्यात्माकडे नेणारा मार्ग आहे. त्या योगे वृत्ती अंतर्मुख होतात. मनाला चिंतनाचे वळण लागते व जीवनातील निर्णय स्थिरबुध्दीने होतात.

अण्णासाहेबांची शैक्षणिक दृष्टी व तोला-मोलाचे शैक्षणिक कार्य लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यकारी परीषदेवर त्यांची नियुक्ती केली. नव्या विद्यापीठाच्या उभारणीत त्यांचा वाटा फार मोलाचा आहे. विद्यापीठाच्या अनेक समित्यांवर ते आहेत. व आपल्या शैक्षणिक दृष्टीचा आणि कार्यपध्दतीचा ठसा त्यांनी त्यावर उमटविलेला आहे. कुठलाही निर्णय निखळ शैक्षणिक दृष्टकोनातूनच घेतला जावा ह्यावर त्यांचा कटाक्ष असतो.

## अजून एक महाभारत

माजले आहे जगात
अत्याचाराचे काहूर
घालीत आहे थैमान
धर्माचा भस्मासूर
गीता म्हणते
पृथ्वीवर अन्यायाविरुध्द लढण्यासाठी
घेईन मी पुन:पुन्हा अवतार !
पण आजची पाहून अवस्था
असावा देव ही घाबरत
अवतार घ्यायला !
अत्याचार, रक्तपातानं
हे जग बनलय रणक्षेत्र !
अत्याचारी रावणाला
भ्रष्टाचारी कंसाला
मारण्यासाठी - संपवण्यासाठी
सत्याची स्थापना करण्यासाठी
आपणा सर्वांनाच
अजून एक महाभारत
अजून एक महाभारत
लढवायचे आहे

जितेंद्र मधुकर तायडे
पदव्युत्तर द्वितीय वर्ष (संरक्षणशास्त्र)

# निरोप (कथा)

सुनिल नारायण चौधरी टी.वाय.बी.ए. [मराठी स्पेशल]

गणपतरावांना कळाले होते की, आपल्याच हातून शालेय शिक्षण घेणारी स्वाती हिने आता कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाची परिक्षा दिली होती आणि कालच तिचा साखरपुडा झाला. गणपतराव तिचे अभिनंदन करण्यासाठी स्वातीच्या घराकडे निघाले. 'अहो लक्ष्मणराव आहेत का घरात? गणपतरावांनी आवाज देताबरोबरच उत्तर आले.'' कोन! गुरुजी हाय व्हय! या -या, घरात या लक्ष्मणराव टोपी घालतच बाहेर आले. सोबत तुडकी मुडकी खुर्ची घेऊन ती बाहेरच्या घरात टाकून तीवर गुरुजीना बसावयास सांगितले. 'काय कसा काय झाला तुमच्या स्वातीचा साखरपुडा'. 'लयी झकास झाला बुवा!'' लक्ष्मणराव पुढे बोलले. आमचं जावाई बापू ते इयर-बीयर इंडिया हाय नव्ह त्येच्यात नोकरी करत्यात. आन तिथं इमान चालवितो की, पायलट वयलट हाय म्हने. लयी पगार बुवा त्यांना आता आमच्या स्वातीचं नशिबच उघडल की म्हनावं. तिला सरकारी नोकरी करनारा नवरा मिळाला. आमी जावाई बापूला स्पष्ट सांगून टाकल साखरपुडा आता करुन टाकू आन् लगिन पुढच्या वर्षी उरकून टाकू. स्वातीच ते इथे बीए हाय ते शेवटच वरीस पुर्ण संपल की लगिन करुन ते बी मोकळं आन आमी बा मोकळं. गणपतरावांनी मध्येच प्रश्न विचारला 'तुम्ही हुंडा किती दिला हो लक्ष्मणराव? '' ''छ! हुंडा नाय घेतला हेच तर आमच्या स्वातीच नशिब, हुंडा घेणारा मी मानुस न्हाई अस जावाईबापून अगोदरच सांगून टाकलं. आन जावाई बापू हुंडा कशापायी घेनार हो त्येंना काय कमी हाय. चांगल सरकारी नौकर. पैसा त्येंच्या घरात खेयतो. लाखात एक देव मानूस हाय ते जावाई बापू'' ''बर त्यांच नाव काय सांगितल तुम्ही' ''राजू'' लक्ष्मणरावांनी आपली तोंडाची एक्सप्रेस चिलमच्या स्टेशनवर थांबविली आणि चिलममध्ये तंबाखु भरु लागले. स्वातीला अभिनंदन देऊन तिला मिळालेल्या आयुष्याच्या जोडीदारा विषयी समाधान व्यक्त करुन गुरुजी जायला निघाले. बर लक्ष्मणराव मी निघतो म्हटल आता बराच टाईम झाला शाळेची वेळ झाली.'' अहो गुरुजी आला बी आन तसच जाणार? '' ये स्वातीची आई गुरुजीसाठी काही च्या ऽ बिया आन की'' लक्ष्मणराव चिलम भराभर ओढीत होते.

गुरुजींच्या आणि वडिलांच्या चाललेल्या गोष्टी स्वाती मधल्या घरात बसून ऐकत होती. स्वातीच्या मनात कालच्या दिवशीच्या आठवणी गर्दी करु लागल्या. साखरपुड्याचा तो दिवस, सगळीकडे आनंदी आनंद, घरात पाहुण्यांची गर्दी राजूकडील मोजकी मंडळी साखरपुड्याच्या दिवशी उपस्थित होती पूजेच्या वेळी राजूने स्वातीच्या बोटात आंगठी घातली तेव्हा राजुचा तो स्पर्श किती नाजूक होता. भावनांना साद घालणारा. क्षणभर एकमेकांचा झालेला तो

दृष्टीक्षेप राजूने त्याचक्षणी स्वातीला मनोमन जिंकून घेतल. शेवटी पाहुणे मंडळी परत जात असतांना राजूने स्वातीकडे पुन्हा बघीतलं. आणि 'पुन्हा भेटू' असा अबोल निरोप डोळ्यामार्फत दिला. तो निरोप होता दोन मनं जुळण्याचा, पुढील आयुष्यात सुखी राहण्यासाठी एकमेकांच्या सुख दुःखात साथ देण्याचा. तो निरोप होता एक छोटसं घरट बांधून त्यात राजाराणीसारखा सुखी संसार करण्यासाठी साथ देण्याचा...... राजूने क्षणभर स्मितहास्य करुन स्वातीला त्यावेळी निरोप दिला त्यावेळी झालेल दोन मनांच मिलन पाहण्यातच स्वाती गुंग असतानांच तिला आवाज आला ''स्वाती गुरुजी निघाले त्येंच्या पाया पडुन आशिर्वाद घे'' स्वाती अचानक स्वप्नातून जागे झाल्या सारखी बावरलेल्या अवस्थेत बाबांजवळ येऊन म्हणाली बाबा तुम्ही काही बोललात? ' ''अग गुरुजी जायच म्हनत्यात त्येंचा आशीर्वाद घे' स्वाती गुरुजींच्या पाया पडून त्यांच्याकडून आशीर्वाद घेत म्हणाली. 'गुरुजी मला माफ करा साखरपुड्याच्या दिवशी तुम्हाला बोलावयाची आठवण नाही राहीली'' '' आता विमानात जाणाऱ्या माणसाच्या पत्नीला आमच्यासारख्या पायी चालणाऱ्या माणसांची आठवण कशी होणार? 'तस नाही हो गुरुजी' अस म्हणतच स्वाती लाजून मधल्या घरात पळतच गेली. गुरुजी पुढच्या वरशी लग्नाला नक्की याल ना? ''असा प्रश्न लक्ष्मणरावांनी गणपतरावांना विचारला. हे काय बोलण झालं हो'' अस म्हणतच गणपतराव तेथून निघाले.

जून महिन्याच्या वेळेस नुकतीच निकाल लागण्यास सुरुवात झाली. स्वातीचा निकाल उद्या लागणार होता. दुसऱ्या दिवशी मैत्रीणींसोबत जाउन स्वाती निकाल घेउन आली. तिला फर्स्टक्लास मिळाला होता. बी.ए.च्या शेवटच्या वर्षाला प्रवेश घेऊन स्वाती नियमित कॉलेजला जाऊ लागली. सात आठ दिवसाने एका मुलाने प्रवेश केला. स्वातीला तो अगदी राजूसारखाच वाटला. हुबेहुब अगदी राजू प्रमाणेच. मनातल्या मनात ती 'म्हणते हा राजू आणि इथे कसा काय आला'' हा नक्की राजुच आहे की दुसरा कोणी आहे की काय? '' रजा घेउन हा इथे कशा करता आला असेल. असे अनेक प्रश्न तिच्या मनात थैमान घालू लागले. कॉलेज संपल्यानंतर ती लगेच घरी आली आणि झालेला प्रकार आई वडिलांना न सांगता संध्याकाळी जेवण आटोपून झोपायला गेली. झोपतांना सुध्दा त्याचाच विचार करु लागली. हा राजुच जर असेल तर मग तो माझ्याशी बोलला का नाही. का मी स्वतःहून त्याच्याशी बोलायला पाहिजे होत? उद्या सकाळी मीच त्याला स्वतःहून भेटणार असा निश्चय करुन स्वाती झोपी गेली.

स्वतःहुन त्याच्याशी बोलण्याचा निर्धार करुन स्वाती कॉलेजला आली आणि त्याला शोधू लागली. सुरुवातीच्या पहिल्या तासाला तो आला नि तास संपताच गर्दितच निघुन गेला. स्वाती मात्र त्याला वर्गातल्या गर्दित शोधत होती. वर्गातच तिला वही सापडली. त्या वहीवर नाव होते 'चेतन पाटील.... '' उद्याच्या दिवशी कॉलेजला आल्यावर ही वही ज्याची असेल त्याला देउन टाकू या विचारातच ती घरी निघून गेली. दुसऱ्या दिवशी कॉलेजला आल्यावर तास चालु असतांनाच वही सरांकडे देउन ज्याची असेल त्याला द्यायची सांगितली आणि परत येउन बेंचवर बसली. सरांनी 'चेतन पाटील हे उच्चारता बरोबरच जो मुलगा समोर आला. त्याला पाहुन स्वाती आश्चर्य चकित झाली. हाच तो मुलगा होता की जो परवाच्या दिवशी स्वाती त्याला आपला राजू समजत होती. झाल मनातली शंका गेली की तो राजु नाही. हे निश्चित झाल. तास संपल्या नंतर चेतन स्वातीला येउन भेटला आणि थँक्यू म्हणून स्वातीचा स्वतःहून परिचय करुन घेतला. स्वाती सुध्दा मन मोकळेपणाने त्याचा आणखीनच परिचय करुन घेते. स्वाती त्याच्याकडे सारखी बघत होती. राजूच अर्धवट रुप त्याच्यात दिसत होत. चेतन मात्र मनात विचार करत होता स्वाती आपल्याकडे सारखी कां बघते आहे की, आपले काही चुकले.

कॉलेजला आल्यावर प्रत्येक दिवशी क्षणभर का होइना ती चेतनकडे बघत असते. चेतन मात्र तिच्या या सततच्या बघण्याचा मनात खोलवर विचार करतो. ही सारखी- सारखी माझ्याकडे का बघते? हिच्या मनात माझ्याविषयी काही तर नसेल ना? तास संपल्यानंतर त्यांच्या गप्पा रंगत असत. गप्पा मारण्याचे प्रमाण दिवसेदिवस वाढत चालले होते. चेतनला वाटत होते कदाचित ही माझ्यावर प्रेम तर .....? स्वातीसारखी तरुणी मिळाल्यावर आयुष्य किती मजेने घालविता येईल. मी स्वतःला किती नशिबवान समजेल. मात्र मनातील हे सर्व विचार तो आपल्या मनातच ठेवत असतो. स्वातीला तो काहीही सांगू शकत नव्हता. सतत स्वाती विषयीचाच विचार. स्वातीच्या मनात मात्र त्याच्या विषयी (चेतन विषयी) काहीच नव्हते. दररोज ते एकमेकांना भेटत होते. कोणत्या ना कोणत्या विषयावर गप्पा रंगत होत्या.

राजू कालच स्वातीला भेटण्याकरता आला होता. स्वाती त्याला घेऊन कॉलेजला आली आणि कॉलेजमधील वातावरण, कॉलेज या विषयी सांगू लागली. त्याच दिवशी चेतन, स्वातीला आणि त्या अनोख्या तरुणाला बघतो. त्याच्या मनात नाही नाही ते विचार येतात. चेतन त्या दोघांच्या समोर गेला असता स्वाती, चेतनची आणि राजूची ओळख करुन देते. दोन चार दिवस राहून राजू परत जातो त्यानंतर स्वाती कॉलेजला येते. स्वाती विषयी चेतनच्या मनात शंकेने घर केलेले असते. कदाचित ही त्या तरुणावर आणि माझ्यावर सुध्दा प्रेम करत तर नसेल? यातील नेमके रहस्य जाणून घेण्यासाठी तो एक दिवस स्वातीला भेटतो. खरं काय ते आज विचारायचं या हेतुने तो स्वाती जवळ जातो 'स्वाती खरच माझ्यावर तुझ प्रेम आहे का? की त्या तरुणावर... मी त्याला दोन चार दिवसापूर्वी तुझ्यासोबत पाहील होतं.' स्वातीला क्षणभर त्याच्या बोलण्यावर विश्वासच बसत नव्हता. पण त्याला काहीतरी कळालं पाहिजे म्हणून खर रहस्य ती त्याला सांगते. ''चेतन तू फार चुकलास. मी तुझ्या सोबत मन मोकळे पणानं बोलले, वागले म्हणून तू माझ्याकडे वेगळ्याच नजरेने पाहू लागला. माझ्याशी भावनेच्या भरात भलतेच नाते जोडून बसलास माझा साखरपुडा झाला आहे आणि तो ही एका वैमानिकासोबत की ज्याला तू दोनचार दिवसापूर्वी माझ्या

सोबत पाहीलेस. राजूशी माझ लग्न ठरलं आहे. त्याच अर्धवट रुप तुझ्यात मला दिसत होतं म्हणून मी तुझ्याकडे क्षणभर बघत असे. स्वातीविषयी आपण मनात भलतेच काही ठरवले होते आणि स्वातीने आपल्याला काय सांगितले. त्याच्या हृदयाला धक्का बसला. 'स्वाती मला हे अगोदर सांगितल असतं तर ही परिस्थिती आज निर्माण झाली नसती. खरच मी किती चुकलो. मला माफ करशील? '' असे बोलून चेतन तेथून निघून गेला.

वार्षिक परिक्षेचा शेवटचा पेपर होता. चेतनने स्वातीला अस्पष्ट अशा आवाजात Best Luck दिले. तीने पण त्याला Best Luck दिले आणि पेपर संपल्यानंतर भेटायला सांगितले. पेपर संपल्यानंतर ते दोघे भेटतात. झालेल्या प्रकाराबद्दल स्वाती त्याला Sorry म्हणते. चेतन माझा तरी त्यात काय दोष. कोणतीही मुलगी स्वत:हून सांगत असते की माझा साखरपुडा झाला आहे म्हणून? मी मात्र तुझ्याशी एक चांगला वर्गमित्र म्हणून मनमोळे वागले. माझ्या मनमोकळे वागण्याचा तू भलताच अर्थ घेतलास'. चेतन मनातून आणखी खचत होता. पण आयुष्यात ठोकर लागल्याशिवाय माणून शहाणा होत नाही. आणि अशी ठेच लागली की पुन्हा ठेच लागू नये म्हणून तो सावधानता बाळगतो. तिच्या समोर आपण खचू नये असे मनाशी ठरवून तो स्वत:ला धीर देत होता. नाराजी आज इतकीच होती की, आपल्या आयुष्याचं गणित चुकलं आपण आपल्या भावनेच्या भरात ते गणित चटकन सोडविलं, बुध्दीला जागे ठेवून हे गणित जर आपण सोडविल असतं तर कदाचित चुकल नसत. 'चेतन' त्याच्या कानावर शब्द पडले आणि तो भानावर आला. 'चेतन' मला निघायला खूप उशीर झाला मला आता निघायला हवं. आईबाबा घरी वाट बघत असतील. असे म्हणून स्वाती तेथून निघाली. स्वातीच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहतच चेतन मनोमनी म्हणाला 'स्वाती जा सुखी राहा'

किती फरक होता त्या दोन्ही निरोपामध्ये. एक निरोप राजूचा आणि दुसरा चेतनचा. राजूचा निरोप होता एकमेकांची मन जुळवून आयुष्यात सुख दु:खाच्या प्रसंगी एकमेकांना साथ देण्याचा. एकमेकांच्या भावना जाणून घेण्याचा. तर चेतनचा निरोप दोन मनं विलग होण्याचा. सजवलेल्या काल्पनिक विश्वातील छोट्याशा घरट्यात एकट्याला सोडून जाण्याचा. चालता चालता अर्ध्या वाटेवर साथ सोडून देण्याचा. शेवटी चेतन हलक्या मनानं घराकडे निघाला. 'चेतन तू एकवेळा चुकलास पुन्हा अशी चूक करु नकोस! आयुष्य हे माणसाला एक वेळाच उपभोगवयास मिळतं आणि त्यात आनंदान विहार करण्यासाठी सुखानं जगण्यासाठी तू एखाद्या अशा जोडीदाराला निरोप दे! जो निरोप राजूच्या निरोपासारखा होता. असा मनोमनी विचार करत होता.



# आजचे युवक-युवती भाग्यवान

**मनोज दयाराम चौधरी** एस.वाय.बी.एस.सी.

आजचे युवक-युवकती खऱ्या अर्थाने भाग्यवान असे मानले पाहिजे. याचे कारण त्यांना शिक्षणाची, उच्च शिक्षणाची क्षेत्रे मोकळी होऊन विविध विभागातील ज्ञान मिळविण्याची त्यांना सुवर्ण संधी प्राप्त झाली आहे. आज ज्ञानगंगा युवकांच्या आणि युवतींच्या जवळपास आली आहे. त्या ज्ञानगंगेत डुबणे आणि स्वत:चा उध्दार करुन घेणे हे सर्वस्वी त्यांच्या इच्छेवर अवलंबून आहे. शैक्षणिक संधी ज्या कालावधीत त्यांना प्राप्त झाली, त्या कालावधीचा जास्तीत जास्त मन:पूर्वक अभ्यास करुन, उपयोग करुन, त्याला आपल्या पुढील जीवनाचा पाया पक्का भक्कम करता येईल. शिक्षण घेत असताना युवक-युवती जितका जास्त जीव ओततील त्या शिदोरीवर त्यांचे भवितव्य घडणार आहे. तसचे पुढील संधी मिळणार आहे. मात्र शैक्षणिक जीवनात आपण निष्काळजीपणाने वावरलो तर त्याची दुष्फळे आपणा स्वत:लाच पुढील जीवनात भोगावी लागणार आहेत. या काळाचा नीट उपयोग करुन घेतला नाही. तर त्यांचा भविष्य काळ मोठा चिंताजनक ठरणार आहे, हे त्यांनी वेळीच लक्षात घेतले पाहिजे.

बऱ्याच वर्षापूर्वी अशी परिस्थिती होती की, गावात - खेड्यात साधी मराठी शाळा नसायची. जवळपास जेथे मराठी शाळा असेल तेथे विद्या घेऊ इच्छिणाऱ्यांना पायी जावे यावे लागे. हायस्कूलचे शिक्षण घ्यायचे जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणी होस्टेलमध्ये किंवा नातेवाईक किंवा पालकांच्या हितचिंतक मित्राकडे राहून विद्यार्जन करावे लागे. महाविद्यालयीन शिक्षण घ्यायचे ठरले तर पुण्या-मुंबईला जावे लागे. मोठ्या शहरात राहून महाविद्यालयीन शिक्षण घेणे म्हणजे ते फार महागडे पडत असे. ज्यांची आर्थिक क्षमता चांगली आहे, जे श्रीमंत आहेत, असेच लोक आपल्या मुलांना पुणे- मुंबई - नागपूर सारख्या मोठ्या शहरात पाठवू शकत असत. सामान्य परिस्थिती असलेल्या पालकांना जेथे आपल्या मुलांना हायस्कूलचे शिक्षण सुध्दा फी-पुस्तके- वह्या यांच्या अमाप खर्चामुळे देता येणे शक्य होत नसे, ते पालक आपल्या मुलांना महाविद्यालयीन शिक्षण कुठून देणार? हुशार व होतकरु मुलांना केवळ सामान्य परिस्थीती मराठी सातवी पर्यंत शिक्षण कसेबसे पूर्ण करता येत असे आणि सातवी उत्तीर्ण झाल्याबरोबर अर्थार्जन होण्यासाठी नोकरीच्या शोधात फिरावे लागत असे. पण ज्यांची उडी हायस्कूलचे शिक्षण पूर्ण करण्यापर्यंत जात असे. त्यांना महाविद्यालयीन शिक्षण कोणत्या व कुणाच्या आधारावर घ्यावे हा प्रश्न पुढे येत असे. जे मोठ्या शहरात जाऊन पदवीधर झाले; त्यांना मोठमोठ्या अधिकाराच्या जागा नोकरी म्हणून मिळाल्या व प्रतिष्ठाही मिळाली. ज्यांचे शिक्षण मनातून अतिशय उर्मी व तळमळ असून सुध्दा व्हर्नाक्यूलर फायनल (मराठी सातवी) पर्यंत झाले ते मराठी शाळेत मास्तर म्हणून नोकरी मिळवू शकले. ज्यांनी हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले ते कारकून म्हणून कोठेतरी चिकटले. ज्यांच्या पालकांच्या काही धंदा व व्यवसाय होता, त्या पालकांनी त्याकाळी

विचार केला की, मुलाला जर धंदा किंवा व्यवसायच करायचा आहे तर त्याला जास्त शिकवून काय उपयोग? म्हणून अशा धंदा-व्यावसायिक कुटुम्बातील मुलांचे शिक्षण अपूर्ण राहिले व ते व्यवसायात लक्ष घालू लागले.

मुलींच्या शिक्षणाची अवस्था तर अतिशय वाईट होती. मुलीला का म्हणून शिकवायचे? ती मोठी झाल्यावर तिचे लग्न करुन द्यायचे आणि तिला 'चूल आणि मूल' सांभाळायचे हीच तिच्या जीवनाची इतिकर्तव्यता असे समाज मानित असे. म्हणून मुलींना शिक्षण देण्याविरुध्द समाजाचे मानस होते. त्यामुळे बहुसंख्य मुलींना शिक्षणाची संधी मिळत नव्हती. ज्या मुलींना अशी शिक्षणाची संधी मिळाली; त्यांना मध्येच शाळेतून उठवून घेऊन त्यांना घरातील कामांना जुंपले जायचे. शिक्षण अजिबात नसल्याने किंवा अपूर्ण असल्याने अशी मुली मोठ्या झाल्यावर त्यांची फक्त लग्ने व्हायची. लिहिणे- वाचणे - व्यवहार - ज्ञान या सर्व बाबींपासून त्या वंचित असायच्या. त्या निरक्षर व अर्धशिक्षित मुलींना संसारात पडल्यावर शिक्षणाच्या अभावामुळे अनंत अडचणी उभ्या रहायच्या, वेळप्रसंगी त्यांची फसवणूक सुध्दा व्हायची स्त्रियांची अवस्था दयनीय असायची संसाराच्या घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे त्या घरात राबत, अन्याय- अत्याचार सोसत असत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ह्या परिस्थीतीत बदल झाला पाहिजे, असे विचारवंतांना वाटू लागले, राज्यकर्त्यांना वाटू लागले. लोकशाहीत स्त्री व पुरुष हे समान मानून त्यांना शिक्षणाचा अधिकार व हक्क असावा ही म.फुले- आंबेडकरांची पुरोगामी भूमिका अमलात आणण्यात आली. पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सुध्दा जेथे मतदानाचा अधिकार मिळाला तेव्हा त्यांना शिक्षणाच्या संधी त्यांच्या इच्छेप्रमाणे प्राप्त झाल्या पाहिजेत या दिशेने कार्य सुरु झाले. महात्मा गांधी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून शिक्षणाची जी महती सांगितली, लोकांच्या विरोधाला न जुमानता, स्त्री-शिक्षणाचे महत्व जनमानसावर बिंबविण्याचे प्रयत्न केले; त्या कृतीचा व विचारांचा वारसा स्वातंत्र्योत्तर काळात अधिक प्रभावीपणे चालविण्याचा सातत्याने प्रयत्न राहिला. आणि त्यातून शिक्षण क्षेत्र अधिक व्यापक झाले. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. त्याचा लाभ घेऊन समाजाची प्रतिगामी विचारधारा बदलून पुरोगामी विचारशक्ती वाढली व स्त्रियासुध्दा शिक्षणाच्या मिळेल त्या संधीच्या फायदा, घेऊ लागल्या व सुशिक्षित होऊन निरनिराळ्या क्षेत्रात कार्यरत झाल्या.

आता प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा आहे. प्रत्येक खेड्याच्या जवळपास माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये यांची प्रचंड संख्या वाढली आहे. जिल्ह्यात, शहरी, निमशहरी भागात तांत्रिक ज्ञान देऊ शकणाऱ्या संस्था चालविल्या जात आहेत. मुलांबरोबर मुलीही शिकत आहेत. एवढेच नव्हे तर या शैक्षणिक क्षेत्रात अनेक विभागांत मुलांपेक्षा मुलीसुध्दा विशेष प्रावीण्य मिळवून उत्तीर्ण होत आहेत. काळाचा हा महिमा खरोखरच मोठा कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे. जसजशी वर्षे उलटत आहेत; तसतशी शैक्षणिक प्रगती जास्तच होत आहे, ही अभिमानाची बाब आहे. प्रत्येक राष्ट्राचा आधार त्या राष्ट्राची युवक पिढी वर तयार अवलंबून असतो. आजचे युवक-युवती भारताचे भावी आधारस्तंभ आहेत. त्यांना शिक्षणाची फार मोठ्या व्यापक प्रमाणात सुसंधी मिळत आहे, म्हणून या पिढीस 'भाग्यवान पिढी' असेच संबोधले पाहिजे. आर्थिक परिस्थिती ही आता शिक्षणाच्या आड येऊ शकत नाही. मुलींना जशी शिक्षणाची संधी मिळाली, त्याचप्रमाणे आदिवासी, मागासलेले वर्ग यांना सुध्दा शासनाने भरपूर सोयी- सवलती- उपलब्ध करुन देऊन त्यांचेही सामाजिक जीवन उन्नत होईल या दिशेने वेगाने प्रयत्न चालविले आहे. त्यामुळे आपल्या या लोकशाहीत जात-धर्म लिंग भेद न मानता प्रत्येक जन्माला येणाऱ्या व्यक्तीला शिक्षणाची सुवर्ण संधी प्राप्त आहे. या संधीचा आता कुणी, किती, कसा उपयोग करुन घ्यावा, हे ज्याच्या त्याच्या विचारशक्तीवर अवलंबून आहे.



## हा देश आहे कुणाचा ?

हा देश आहे कुणाचा ?
शेतात अन्न-धान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचा
उद्योग व्यवसायात रमणाऱ्या श्रमीकांचा
इतिहास घडविणाऱ्या महत्वाकांक्षाचा
देशात राहणाऱ्या सर्व सामान्यांचा
हा देश आहे कुणाचा ?

जाति,धर्म, रुढी परंपरा मानणाऱ्या समाज कंटकाचा
मंदिर-मज्दिद वादात गुरफटलेल्या
भारतीय विद्वान अतिरेक्यांचा
किं मानव मुक्तीच्या लढ्यासाठी अहोरात्र
झटणाऱ्या समाज पुरुषाचा ?
हा देश आहे कुणाचा ?

शिक्षणाची दारे उघडणाऱ्या फुले- आंबेडकरांचा
शिक्षणाची तहान लागलेल्या विद्यार्थ्यांचा
की युगाचा अंधार धरुन बसणाऱ्या दुःखीतांचा
या देशात भ्रष्टाचाराची गंगा वाहणाऱ्या देशद्रोह्यांचा ?
हा देश आहे कुणाचा ?

अज्ञान दारीद्र्यात पिचत पडलेल्या मजूरांचा
गुलामगिरीतून मुक्त होऊ पाहणाऱ्या पामरांचा
देशासाठी लढणाऱ्या जवानांचा
की स्वराज्याचे सुराज्य बनवणाऱ्या कर्तृत्ववान सेवकांचा

**लालचंद अहिरे**
१२ वी आर्ट

# थोर-मोठ्यांचे हास्य-विनोद

कु. मेधा मुकुंद इनामदार एम.ए. [मानसशास्त्र]

इंग्लंडचे पंतप्रधान सर विन्स्टन चर्चिल व जगप्रसिध्द ब्रिटीश लेखक व नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ या दोघात विचित्र मैत्री होती. कारण दोघेही मित्र असून देखील एकमेकांना चिमटे घेण्याची व टोमणे मारण्याची संधी सोडित नसत. एकदा शॉ यांनी पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांना आपल्या नवीन नाटकाच्या पहिल्या प्रयोगाची दोन तिकीटे पाठविली. परदेशात अशी तिकीटे पती- पत्नीसाठी पाठविण्याची प्रथा आहे. परंतु चर्चिल यांनी खिजविण्यासाठी शॉ यांनी मुद्दाम बरोबरच्या चिट्ठीत लिहीले- ''माझ्या नविन नाटकाच्या प्रथम प्रयोगाची दोन तिकीटे पाठवित आहे. एक आपल्यासाठी व एक आपल्या मित्रासाठी! अर्थात, आपल्याला मित्र असलाच तर!''

चर्चिल पण कसले वस्ताद! त्यांनी चिठ्ठीचे उत्तर असे पाठविले, - ''कामाच्या व्यग्रतेमुळे नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला हजर राहू शकत नाही, याबद्दल दिलगीर आहे. दुसऱ्या प्रयोगाला हजर राहिन म्हणतो- अर्थात दुसरा प्रयोग झालाच तर!

इस्त्राएलचे भूतपूर्व पंतप्रधान एशकोल हे स्वभावाने विनोदी होते. त्यांनी एका भाषणात स्वत:बद्दलचा पुढील किस्सा ऐकवून प्रचंड हंशा पिकविला. ते म्हणाले, ''मी इस्त्राएलचा अर्थमंत्री असतांना एकदा मला अमेरिकेकडून हव्या असलेल्या आर्थिक मदतीच्या कामानिमित्त न्यूयॉर्क येथे जाण्याच्या योग आला. एके दिवशी ,का बैठकीसाठी मी जात असतांना मला रस्त्याच्या कोपऱ्यावर एक भिकारी दिसला. मी सहजच त्याला एक नाणे देऊ केले.

नाणे न घेता माझ्याकडे रोखून पहात मला प्रश्न केला 'तुम्ही कोण आहात?''

''इस्त्राएलचा अर्थमंत्री,'' मी उत्तरलो.

''माफ करा, ''भिकारी म्हणाला, ''मी समव्यवसायिकांकडून (एकच धंदा करणाऱ्या व्यक्तीकडून) पैसे घेत नसतो.

जगप्रसिध्द अमेरिकन करोडपती रॉकफेलर एकदा न्यूयॉर्क येथे गेले असतांना कमी दर्जाच्या हॉटेलाची चौकशी करु लागले. ट्रॅव्हल एजण्टला याचे नवल वाटले. न राहवून त्याने विचारले- ''माफ करा हं मि रॉकफेलर, मागील महिन्यात आपले चिरंजीव येथे आले होते तेव्हा ते उत्तमातल्या उत्तम हॉटेलाची चौकशी करीत होते पण आपण मात्र.''

''माझ्या मुलाने जे केले ते ठिक केले,'' रॉकफेलर मध्येच बोलले, ''त्याचा बाप श्रीमंत आहे. पण तुम्हाला ठाऊक आहे, माझ्या बाबतीत तशी परिस्थीती नाहिय.



# ३० सप्टें. ९३ ची दैनंदिनी

दिपक चव्हाण, एम.कॉम. सिनिअर

३० सप्टेंबर ९३ ची ती क्रूर पहाट आजही संपूर्ण महाराष्ट्रवासीयांना आठवत असेल. समस्त राज्य साखरझोपेत असतांना अचानक पहाटे चार वाजेच्या सुमारास धरणीने एक जबरदस्त धक्का दिला. आणि जवळ-जवळ संपूर्ण महाराष्ट्रच जागा झाला. त्यावेळेस लोकांच्या मनात चिंतेचे वादळ निर्माण झाले.

त्या दिवशीही मी कॉलेजच्या वसतीगृहातच होतो. अचानक पहाटे या धक्क्याने संपूर्ण वसतीगृहच जागे झाले. 'भुकंप' झाला म्हणून विद्यार्थी - मित्रांत वेगवेगळे तर्क-विर्तक सुरु झाले. हे सर्व ऐकून मन अगदी सुन्न झाले. व यातच सकाळ झाली. अधिक उत्कंठीत होऊन मी रेडिओच्या बातम्या ऐकायला बसलो. तसा बातम्यांचा एक जबर धक्का मनाला बसला ''संपूर्ण महाराष्ट्रात भूकंपाचा धक्का तर मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात जीवीत व आर्थिक हानी...'' हे ऐकून काळीज दु:खाने भरुन आले. माझी बालपणापासूनची सेवाभाववृत्ती जागृत झाली. मी भूकंपग्रस्त गावाला स्वयंसेवक म्हणून जाण्याचा निश्चय केला. कॉलेजला गेल्यावर कळाले एन.सी.सी. चे मित्रही जाणार आहेत. त्यांच्याबरोबर मी जाण्याचा दृढ निश्चय केला.

तो कठोर, क्रूर, निर्दयी दिवस फक्त रेडिओवरुन आलेल्या मृतांच्या संख्या ऐकण्यात गेला. मराठवाड्यातील भूकंपग्रस्तांसाठी राज्य सरकारने मदतीचा हात पुढे केला व जनतेलाही आर्थिक मदतीचे आवाहन केले. संध्याकाळी मला एक वेगळाच चमत्कार जाणवला. झोपडीपासून ते महालात राहणाऱ्यांपर्यंत सर्व आपल्या कुवतीनुसार सढळ हाताने आर्थिक मदत करीत आहे. अशी गोळा झालेली मदत निधी केंद्रा' कडे सोपविली जात आहे. तर शहरातील काही बड्या लोकांनाही मिळून काही प्रमाणात अन्न पुरवठा केला असे समजले. रात्रीच्या रेडिओ बातम्यांवरुन कळाले की, इतर राज्ये इतकेच नव्हे तर काही विदेशी सरकार सुध्दा भुंकपग्रस्तांसाठी आर्थिक मदत करणार आहेत. हे सर्व ऐकून माझे डोळे राहून - राहून भरुन येत. जणू हे अश्रू मला माणूसकीच्या अथांगतेची साक्ष देत होते. त्यावरच हे जग आजपर्यंत टीकून आहे. असे वाटले. मनाला चांगला धीर आला न आला तोच बातम्यांचा दुसरा धक्का मनाला बसला ''तेथे लष्करांना पाचारण करण्यात आले आहे. इतर कोणीही स्वयंसेवक भूकंपग्रस्त ठिकाणी मदत करु शकत नाही. अशी मदत फक्त आर्थिक स्वरुपातच स्विकारली जाईल....'' तरी सुध्दा भूकंपग्रस्तांना प्रत्यक्ष मदत करण्याचा हट्ट मनातून हटला नव्हता. ती संपूर्ण रात्र मला वैऱ्याची वाटू लागली, मनात विचारांचा सारखा गोंधळ माजत होता. अधिक व्याकूळ होऊन मी सकाळची वाट पहात होतो. कशीतरी ती रात्र टळली व दुसरा दिवस निघाला त्या सकाळीच मी कॉलेजमध्ये

प्राध्यापकांना भेटलो, मित्रांना भेटलो. परंतु शासनाच्या आदेशापूढे सर्व काही फोल ठरले. आणि ज्याप्रमाणे धरणी दुभंगली तसे माझे मनही दुंभगले.

शेवटी मन अगदी निर्विचार झाले, कंठ दाटून आला काय करावे ते सुचत नव्हते. तेवढ्यात विद्यार्थी-मित्रांची एक टोळी हातात पैशांचा लहान डबा घेऊन भूकंपग्रस्तांसाठी मदत निधी गोळा करतांना दिसून आली. ते दृश्य पाहून दाटून आलेला कंठ तसाच गिळंकृत केला व खिशात असलेली संपूर्ण पॉकेटमनी त्यांच्या डब्यात सामील केली. आणि त्या विद्यार्थी-मित्रांत मी सुध्दा सहभागी झालो.

धरणी दुभंगली हे निसर्गाच्या हातात होते. पण यानंतर जे घडले ते माणसाच्याच हातात होते. मानवाच्या मदतीमुळे आजही मानवी मनात कुठेतरी 'माणूसकीची ज्योत' तेवत आहे असे वाटते.

## यौवनल्या मैफलीत

यौवनल्या मैफलीत कोण गाजून गेले ?
धीट होता आम्ही तुम्ही लाजून गेले.
चांदण- स्पर्श तुमचा- शहारलो अंभागी
उघडले मादक डोळे - खास थिजून गेले
उसवित गेलो एकेक नक्षत्राची वीण
आमाळला आम्ही - तुम्ही भिजून गेले
तुमच्या आमच्या गळी वांझ नैतिकतेचे ढग
संस्कृतीच्या अंगणात उगा गरजून गेले.
तरी मग लावत सुटलो देही-देही चेतन दीप
वखवले वासनवेडे गजबजून गेले
हा गंध असा हा छंद असा
कित्येक पेटले अन विझून गेले.

**प्रशांत धांडे रोझोदेकर**, एफ.वाय.बी.ए.

## अशी का गेलीस

मागे वळूनी पाहता अशी
हलकेच का गं गेलीस

मैत्रीच्या खुणा शोधतांना
त्या पुसून तू गेलीस

या भावनाशील जीवाला
दुखवून तू गेलीस

प्रेमाची अखंड ज्योत
विझवून तू गेलीस

फुलणाऱ्या या मनाला
अशी तोडून का गं तू गेलीस

**अनिल व्ही. पाटील**
एस.वाय.बी.ए.

## मेंदी भरला हात

मेंदी भरला हात चंद्रमा नभात
एकमेका खुणावत रंग चढे
मेंदीची लाली चंद्रमा च्या गाली
संगे संगे डोली नशा चढे
रंग चढे नशा चढे
रात्र चाले पूढे पूढे
चालतांना चंद्रमा घेई आढेओढे
मन त्याचे धाव घेई
मेंदी भरल्या हाताकडे

**कु. मेघा मोहिते**
एम.ए.ज्यूनी.



**अजिंठा संपादक मंडळ**



**राष्ट्रीय सेवा योजना गृप**



राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबीर
उ.म.वि. नियोजित जागा




राष्ट्रीय सेवा योजना उ.म.वि. नियोजित जागा



राष्ट्रीय सेवा योजना सांस्कृतीक कार्यक्रमातील एक प्रसंग

# एन.सी.सी.



वैशाली कुलकर्णी राज्यपालाशी बोलतांना



वृक्षारोपण एन.सी.सी. कॅडेट समवेत मुख्यमंत्री



एन.सी. विद्यार्थीनी



एन.सी.सी. विद्यार्थी

# "आखूखाजी" अहिराणीतील.

कु. लिना जि. बागुल एम.ए.

'अहिराणी' खान्देशातील मुख्य बोलीभाषा, एक समृध्द आणि वैभवान डोलणारी अशी आहे. प्राचीनकाळी राजा अहिरांच्या राज्यातील ही भाषा की जिलां एक परंपरा आहे. स्वताचं एक सांस्कृतीक मूल्य आहे. या भाषेला त्यातील शब्दन् शब्दाला एक प्रकारचा गोडवा आहे, माधूर्य आहे.

अहिराणीतील 'आखखाजी' एक मुख्य सण समजला जातो, त्यास अक्षय-तृतीया म्हणतात. अहिराणीतील अख्खाजीला तिची स्व:ताची धाटणी आहे. हा सण विशेषत: सासरवाशिणीच्या द्दष्टीने महत्वाचा समजला जातो. सासरवाशिणी या सणाची चातका प्रमाणे वाट पाहात असतात. कारण याच सणाच्या निमित्ताने त्यांना माहेरी यायला मिळते. शेतकऱ्यांच्या घरात सर्व धान्य, पिके येवून गेलेले असतात. जिकडे तिकडे लग्न, सोयरीक जुळविण्याचा धुमधडाका असतो. तर कुठे साखरपुडा, मग लगन, असा हा काल असतो. असा वसंत ऋतूत येणारा हा सण दिवाळीपेक्षा जास्त महत्वाचा वाटल्यास काही नवल नाही.

आपल्याला माहेरी जायला मिळणार. भाऊ, बहिण आई वडील, संवगडीणीचा सहवास लाभणार, म्हणून सासरवाशिणी अत्यांनंदनात असतात.

आज, उद्या, भाऊ राया घ्यायला येणार म्हणून अगदी आतुरतेने वाट बघत असतात.

''केव्हा येणार भाऊराया',

'मुऱ्हाई, अजून उन्हा नही,'

'देख न् काय उशीर हुई ऱ्हायना',

'हाऊ भाऊ न असाच शे, भलती वाट देखाले लावसं,'

'काय व्हयं हुई, अशी चिंता युक्त दबकी कुजबुज बायकामध्ये सुरु होते. केव्हा एकदा दमडी गाडी बैलांच्या गळ्यातील रुण झुण रुण झुण घंट्या ऐकायला मिळतात याकडे सारखे लक्ष लागून असते.

आंब्याच्या मोहरांचा मादक गंध कोकीळेला मोहरुन टाकून कंठ फुटलेला असतो जिकडे तिकडे कुहू ऽऽ कुहु ऐकू येत असते.

तोच --- पहाटे पहाटे घुसर, शांत वातावरणात... आवाज कानावर येतो आणि ....

'उन्हा माय, मन्हा भाऊ उन्हा,'

'अहो! आत्याबाई, मन्ह भाऊ उन्हा, म्हाले लेव्हाले,'

बरंका, सरुबाई, मन्ह भाऊ उन्हा, मन्ह भाऊ उन्हा'

माय व्ह कितनी वाट देखी राह्यनूं'.

माझा भाऊ माहेरी घ्यावयास आलां म्हणून काय तो आनंद, डोळ्यात अश्रू, आनंदाने छाती भरुन येते. आणि सगळ्यांना सांगत सुटते.

देख मन्हं भाऊ उन्हा, गोठ्यातील गाई वासरांना कुरवाळत सांगते, ''मी मन्ह मायना घर जासू, तठे मन्हा भाऊ बहीण सखू, तीन्हा आंडोर भेटतीनं, सारजा, मैना, म्हाले भेटतीनं ''मग, मंग काय!'

''मंग, म्हना भाऊ, आंबा ना झाडले झोका बांधी, दोरना, त्याव्हर त्या झोकावर,'....

'अथानी कैरी, तथानी कैरी,'

'झुय, झुय झोका खाय व्ह'

'कैरी तुटनी खडक फुटना',
'झुय, झुय पानी व्हाय व्ह,
'झुय, झुय पानी व्हाय, तठे रतन धोबी धोम व्ह,'
'रतन धोबी धोम तठे, कस्साना बझार व्ह',
माय म्हाले 'तोडा' लि दे जो, लि दे जो,'
'बंधो ना हाते धाडी दे जो, धाडी दे जो,'

आंब्याचा मोहर संपून, लहान कैऱ्या झाडालां लागलेल्या असतात. ती कैरी वाऱ्याच्या झोका इकडे तिकडे डुलत असते. याचे सुंदर वर्णन वरील लोकगीतात आढळते. आपल्या लाडक्या बहीणीला, भाऊ पहिल्यांदा माहेरी घेवून जाण्यासाठी आलेला असतो.

'म्हना भाऊ, पहिली वखत् मन्हं घर ऊना.'
बहीण आपला भाऊराया कसा घ्यायला आलेला असेल याचे सुंदर, रुपकात्मक वर्णन अत्यंत बहारदारपणे करताना म्हणतो...
'सण, माण सणनी हाऊ आखाजीनां उना व माय',
'ह्या ते सण ते देखू बंधुरायानी वाट व माय',
'देखू बंधूरायानी वाट व माय'
'भाऊ तो मना गाडे, घोडे उना व माय'
गाडे, घोडे उना''
'मन्हा भाऊना टांगाना घोडाले चांदीना साज व माय,'
'चांदीना साज,'
'मी तर माहेरले जाणार आज व माय,
माहेरले जाणार आज,'
टांगा मा बसुनं नी तुटी गया नैसर हार व माय,'
तुटी गया नैसर हार'
'नैसर हारनी टिकली चमकनी तापीना पार व माय'
'चमकनी तापीना पार',
'तापीनं पानी वाजे ऋण, झुण व माय ऋण झुण'
'बंधुराया कस्सा म्हणे ताई करु नको कुणूमुनू व माय'
'करु नको कुणूमुनू व माय'
'बंधुरायानी घाली समजूत व माय घाली समजूत'

अशा प्रकारे घोड्याच्या टांग्यातून मी माझ्या माहेरी जाणार पण मध्येच रस्त्यावर तापीच्या काठावर गळ्यातील नैसर हार हरवतो. बहीणीला फार वाईट वाटतें रडते. तेव्हा भाऊ बहीणीची समजूत घालतो. तापी नदीचं पाणी कस आवाज करते याचं सुदंर अस वर्णन यात केलेले आढळते. शेवटी पेठच्या बाजारातून माझा भाऊ नैसर मला पुन्हा आणून देईल. याच वर्णन करतांना बहीण म्हणते.

'करा पेठ गावना बजार'
'पेठ गावनां बजार माइनं आनीदीधा नैसर हार व माय',
आनीदीधा नैसर हार
पेठ गावच्या बाजारातून माझा भाऊ मला दूसरा नैसर हार आणून देईन नव्हे आणून दिला आहे अस ती या गीतात म्हणते.

# स्त्री आणि कायदा

विजय पां. महाजन (वाघोडकर) ॲडव्होकेट (एम.ए.)

भारतातील प्राचीन संस्कृती व परंपरा पाहता असे आढळून येते की, प्राचीन काळात स्त्रीला जरी देवतेचे स्थान असले तरी समाज तिला तिच्या अधिकारांबाबत दुय्यम व कनिष्ठ लेखत होता. ही प्रथा इंग्रजांच्या काळापर्यंत चालत होती. एखाद्या स्त्रिच्या पतीच्या निधनानंतर तिला समाज परंपरेनुसार सती जावे लागे. या अनिष्ठ प्रथेला इंग्रजांनी कायदे करुन बंधने घालण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांना राजाराम मोहनरॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले इ. पुरोगामी विचारसरणीच्या लोकांनी चांगल्या प्रकारे साथ दिली. म्हणूनच २० व्या शतकात गौण लेखली गेलेली स्त्री २१ व्या शतकाच्या अगोदरच सर्व बाबतीत आघाडीवर दिसत आहे. याला एकमेव कारण म्हणजे भारतीय राज्यघटना व भारतातील इतर कायदे. ज्यामुळे स्त्रीला तिच्या अधिकार व कर्तव्यांची जाणीव करुन देण्यात आली आहे. स्त्री सारख्या दुर्बल म्हटलेल्या समाज घटकाला कायद्याने सशक्त व शक्तीशाली बनविले आहे. म्हणूनच कायदे व त्याबाबतीत स्त्रीयांचे स्थान किती व कोणते आहे ? या बद्दल विचार मांडणे अपरिहार्य होते.

२६ जाने. १९५० ला भारतीय राज्य घटना उदयास आली व स्त्रीयांचे नशिब सुध्दा उजाळले असे म्हणावे लागेल. भारतीय राज्य घटनेच्या क. १४ या समानतेच्या तत्वामध्ये स्त्रीला सुरवातीला प्रथम पुरुषांबरोबर अग्रक्रम देण्यात आला व समान लेखले गेले आहे. व पुरुषांबरोबर हक्क देण्यात आले आहेत.

सद्य परिस्थितीत स्त्रीयांचा संरक्षक व तारक, पाठीराखा कायदा म्हणजे 'हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ होय.' रोज वर्तमानपत्र उघडले की, पहिल्याच पृष्ठावर .... 'या महिलेचा जाळून मृत्यु, .... ची आत्महत्या'' अशा मथळ्याखाली बातमी आलेली आढळते. याचे प्रमुख कारण ''हुंडा'' हेच असते. अशा या भयानक अनिष्ठ प्रथेतून स्त्रीचे जीवन सुसह्य केले ते या कायद्यानेच. या कायद्यानुसार ''हुंडा'' म्हणजे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने लग्नसंबंधाने लग्नाचे वेळी किंवा लग्नानंतर किंवा लग्ना अगोदर दिलेली वा देवू केलेली मालमत्ता, मौल्यवान रोखे, जे लग्नाचे एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाला देऊ केलेली वा दिलेली असावी. पण यात मुस्लीमांच्या 'शरियत' मधील 'मेहर' व 'डावर' चा समावेश होत नसतो. अशा प्रकारे जो कुणी हुंडा मागेल वा घेईल त्याला कमीतकमी ६ महिने तर जास्तीत जास्त २ वर्षे पर्यंत शिक्षा होवू शकते. तसेच दंड सुध्दा रु. १०,०००/- पर्यंत वा हुंडाच्या रकमेपेक्षा जो जास्त असतो तो दिला जातो.

भारतीय दंड संहिता मध्ये स्त्रीयांच्या संरक्षणार्थ वा रक्षणार्थ फक्त स्त्रीयांसाठी कलमे आहेत की जी स्त्रीला होणाऱ्या त्रासाबाबत तिला आवाज उठवायला

लावतात. यांत प्रामुख्याने भारतीय दंड सहितेत नवीनच १९८६ मध्ये परिस्थीनुरुप मुद्याम समाविष्ठ करण्यात आलेले क. ३०४ ब चा उल्लेख करावा लागेल. हे कलम हुंडाबळीचे म्हणून संबोधण्यात येत असते. यानुसार कोणाही लग्न झालेल्या स्त्रीचा लग्रा नंतर ७ वर्षाच्या आंत अनैसर्गिकपणे मृत्यु झाला तर तो हुंडाबळी म्हणून ठरविण्यात येतो व तसेच गृहीत धरावे लागते. व मुलाकडील व्यक्तींना हा 'हुंडाबळी'' नाही असे सिध्द करावे लागते. याला शिक्षाम्हणून कमीतकमी ७ वर्षे ते जन्मठेपे पर्यंत देण्यात आलेली आहे.

कलम ४९८ (अ) नुसार जर स्त्रीला लग्नानंतर तिच्या नवऱ्याने अथवा नवऱ्याच्या इतर नातेवाईकांनी क्रुरतेने वागणूक देवून तिला आत्महत्येस प्रवृत्त केले असेल, वा तिच्या जीवास, अवयवास किंवा प्रकृतीस गंभीर इजा व धोका निर्माण होतो तेव्हा नवऱ्याकडील व्यक्तींना तीन वर्षे पर्यंत कैद अधिक दंडाची शिक्षा दोषी असल्यास होवू शकते.

क. ४९८ नुसार एखाद्याच्या बायकोला की जिला नवरा आहे तिला एखाद्या व्यक्तीने अन्यायाच्या इराद्याने फूस लावून पळवून नेणे वा अटकावून ठेवल्यास त्या व्यक्तीस भा.दं.वि. नुसार २ वर्षेपर्यंत कैद, किंवा दंड किंवा दोघं शिक्षा सांगितल्या आहेत.

एखाद्या व्यक्तिने आपले कायदेशीर लग्न एखाद्या स्त्री बरोबर झाले आहे असे फक्त भासवून त्या स्त्रीस फसविले व तिचा उपभोग पत्नी म्हणून घेतला असतो तेव्हा ती व्यक्ती दहा वर्षापर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस व दंडास क. ४९३ नुसार पात्र ठरत असतो.

पूर्वी भारतात राजेशाही होती तेव्हापासून दोन-दोन, तीन-तीन स्त्रीयांशी एकेक माणूस लग्न करत होतां व घरात सोबत आणत होता ह्याला पायबंध घालावा म्हणून भारतीय दंड संहितेस ४९४ चा समावेश करण्यात आला व यानुसार एक बायको म्हणून जीवंत असतांना दुसरे लग्न केले तर तो विवाह बायको वा नवरा जिवंत आहे म्हणून व्यर्थ होत असेल तर त्यास सातवर्षे पर्यंतची शिक्षा व दंडास पात्र ठरविला जातो.

तसेच ज्या व्यक्तीचा विवाह सुरवातीला झाला आहे ही गोष्ट दूसरा विवाह ज्या व्यक्तीशी करावयाचा आहे त्या व्यक्तीपासून लपवून ठेवली व तिच्याशी विवाह केला तर अपराध ठरुन वरील कायद्याच्या क. ४९५ नुसार दहावर्षेपर्यंत शिक्षा तसेच दंडास पात्र होत असतो.

एखादी व्यक्ती विवाहीत होण्याची जी क्रिया आहे त्या प्रमाणे आपला विवाह कायदेशीर ठरत नाही वा होत नाही हे माहीत असून सुध्दा लबाडीने किंवा कपटाने विवाहीत होण्याचे ढोंग करील तर ती व्यक्ती क. ४९६ नुसार सात वर्षपर्यंत कैद व दंडाच्या शिक्षेसही पात्र ठरत असते.

एखादा पुरुष कोणा ऐका पुरुषाची एक स्त्री बायको आहे हे माहीत असतांना सुध्दा त्या पुरुषाच्या संमतीशिवाय तसेच त्या पुरुषामागे त्या स्त्री बरोबर सहमतीने संभोग करत असेल तर ते कायद्यानुसार 'नारकर्म' ठरत असते व त्याला या कायद्याच्या क. ४९७ प्रमाणे पाच वर्षेपर्यंत किंवा दंडाची शिक्षा देता येते. पण या कलमात स्त्री (बायको) सहाय्य करणारी असली तरी तिला शिक्षेस पात्र धरले गेले नाही.

स्त्रीसाठीचे सर्वात विकृत समाजाचे दर्शन म्हणजे बलात्कार. ज्यावेळी एखादी व्यक्ती एखाद्या स्त्रीस तिच्या इच्छे विरुध्द, तिच्या संमती शिवाय, तिची संमती तिला हित संबधी असलेल्या व्यक्तीच्या मरणाचे भय दाखवून घेवून तसेच तिला नशेत वा तिची संमती आहे पण ती १६ वर्षापेक्षा कमी वर्षाची असेल व तिच्यावर संभोग करत असेल तर तो कायद्याच्या क ३७६ नुसार सात वर्षापेक्षा कमी नाही अशी कैद पण आजन्म अथवा १० वर्षपर्यंतची कैद व दंडास पात्र असेल. तसेच १२ वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आपल्या स्वत:च्या पत्नीवर बलात्कार केला तर त्याला या कलमान्वये २ वर्षपर्यंत कैद दंड शिक्षा होवू शकते.

या सारखीच अनेक स्त्री हक्क व स्वातंत्र जपणारी कलमे या कायद्यात आहेत की ज्यामुळे स्त्रीस स्त्रीपण जोपासता येते. तसेच स्त्रीस दुय्यम स्थानी लेखणाऱ्यांना व तिची टर उडविणाऱ्यांना या कायद्याच्या इतर अनेक कलमांन्वये शिक्षा सांगितल्या आहेत. व कायदा हा स्त्रीस तारक व पालक म्हणून ठरला आहे.

काही-काही ठिकाणी स्त्रीयांचे लग्न होते पण तीला तिचा नवरा नांदवत नाही वा तिला तिच्या वडीलांच्या घरीच राहण्यास सांगतो. अशावेळी फौजदारी प्रक्रिया क. १२५ ते १२७ यांनी स्त्री या अबला, मुलं बाळं तसेच म्हातारे आई वडील यांना प्रेमाचा दिलासा देवून त्यांच्या निर्वाहाचा खर्च भागविण्याचे कर्तव्य नवरा, मुलगा, मुलगी यांच्यावर कायद्याने टाकले आहे. जर तसे करण्यास एखादा व्यक्ती चुकला तर त्याला तुरुंगात ठेवण्याचा आदेश न्यायालय देवू शकते.

अशा प्रकारे विविध कायद्यांमध्ये परिस्थितीनुरुप व समाज जीवन ज्या प्रमाणे बदलत आहे त्या प्रमाणे स्त्रीयांचं संरक्षण, रक्षण कायदे करुन, बदल करुन वा नवीन कायदे अंमलात आणून करत असते. तसेच त्यासाठी कायद्यात कठोर उपययोजनांचा उल्लेख केलेला असतो. त्यामुळे शेवटी असेच म्हणावे लागले की ''स्त्रीचं कायद्यातील स्थान हे अग्रस्थानी असुन कायदा हा स्त्रीचा आधार आहे.''



# अशांत काश्मीर

**चौधरी जितेंद्र** तृतिय वर्ष कला

भारताच्या अगदी उत्तरेच्या टोकावर, पश्चिमेला पाकिस्तान, पुर्वेला तिबेट, इशान्येला चीन, वायव्येला अफगाणिस्तान अशी राष्ट्रे आहेत. तो काश्मीर व रशियाची सरहद्दही काश्मीर पासुन लांब नाही हे आपण विसरता कामा नये. खुद्द काश्मीर चार विभागाचे मिळून बनलेले आहे १) लडाख या भागात बौध्द धर्मिय २) गिलगिट मधे इस्लाम तर ३) काश्मीर खोऱ्यात हिंदू आणि मुसलमान ४) जम्मुत हिंदू बहुसंख्य आहेत.

काश्मीर प्रश्नाला सुरुवात झाली २२ ऑक्टो. १९४७ रोजी पाकिस्तानी टोळ्यांनी काश्मीरवर आक्रमण सुरु केले या टोळ्यांचे नेतृत्व पाकिस्तानी फौजी अधिकारी करीत होते. काश्मीर फौजांचा प्रतिकार दुबळा पडत होता. कारण मुस्लीम सैनिक पाक ला जाऊन मिळत होता म्हणून काश्मीरचे महाराज सर हरीसिंग यांनी मदतिसाठी भारताकडे धाव घेतली. या विनंतीकडे पं. नेहरु लक्ष द्यावयास तयार नव्हते. पण काश्मीर भारतात विलिन करण्याचा निर्णय कळविला तेव्हा पं. नेहरुनी २७ ऑक्टो. रोजी हवाई मार्गाने श्रीनगर ला सैन्य पाठविले. भारतीय सेनेचे काश्मीर मधील आगमन बॅ. जिनांना समजताच त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. काश्मीरचे विलिनीकरणास आपण मान्यता देणार नाही असे बॅ. जिनांनी जाहीर करुन टाकले. काश्मीरवर आक्रमण केल्याच्या लियाकत अलिखान यांनी भारतावर आरोप केला. टोळीवाल्यांना मागे रेटण्याचे काम भारतीय सेनेने घेतल्यानंतर बारामुल्ला परत जिंकण्यात आला. त्यावेळी बाराबुल्ल्यातील १४ हजार स्त्रियांपैकी १३ हजार स्त्रिया टोळीवाल्यांनी आपल्याबरोबर पळऊन नेल्या होत्या. जर भारत सरकारने सेना पाठविली नसती तर काश्मिरी हिंदू व त्यांच्या स्त्रियांवर किती अत्याचार झाला असता याची कल्पनाही करता येत नाही.

पाकिस्तानी निवडणुकांमुळे काश्मिर मधील वातावरण पार बदलुन गेले. नविन निवडून आलेल्या श्रीमती बेनझीर भुट्टो यांनी भारताचे आंतराष्ट्रीय राजकारणातील कलंडते स्थान पाहुन काश्मीर प्रश्नाला आंतरराष्ट्रीय स्वरुप देण्याचा प्रयत्न जोरात चालु आहे. काश्मीर मिळविण्यासाठी आम्ही काश्मीर संपऊन टाकू अशा प्रकारची भुमिका पाकिस्तानची असल्याने सध्या काश्मीर प्रश्न फार बिकट अवस्थेत जात आहे. सायप्रस येथे भरलेल्या राष्ट्रकुल परिषदेच्या व्यासपीठावर बेनझीर भुत्तो यांनी काश्मीर समस्येत राष्ट्रकुल परिषेदेने हस्तक्षेप करावा अशी जोरदार मागणी केली. ही मागणी जरी मान्य झाली नसली तरी बेनझीर भुत्तो या समस्येचे आंतरराष्टीयीकरण करण्यात काही प्रमाणात यशस्वी झाल्या आहे.

पाकिस्तानला काश्मीर बाबत आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याचे कारण म्हणजे अमेरीकेसारखे बलाढ्य राष्ट्र पाकिस्तानच्या मदतीसाठी उभे आहे. या दोन राष्ट्रांचा विचार करतांना मोठ्या वृक्षाखाली छोटे वृक्ष सुरक्षित असे आपणास सहजपणे वाटते. या बाबतीत क्लिंटन प्रशासनाला असे वाटते की सिमला करार झाला त्यावेळी पाकिस्तान हे पराभुत राष्ट्र होते. विजयी राष्ट्रंने पराभूत राष्ट्रावर लादलेला तो करार होता. काश्मीर संस्थान भारतात विलिन करण्यात आलेल्या दस्तऐवज (Instrument of Accession) हा दस्तऐवज आता अमेरीकेला मान्य नाही. युध्द चालु असतांनाच गरज नसतांना जवाहरलाल नेहरुंनी हा प्रश्न आंतरराष्ट्रीय संघटणेकडे नेला व भारतीय आणि पाकिस्तानी सैन्य होते तीच प्रत्यक्ष सीमा (तात्पुरती) ठरली. त्याचबरोबर भारत आणि पाकिस्तानने व्यापलेल्या काश्मीर प्रदेशात लवकरात लवकर सार्वमत घेण्यात यावे आणि जनतेचा कौल लक्षात घेऊन काश्मीर स्वतंत्र्य ठेवावा अथवा भारतात किंवा पाकिस्तानात सामिल करण्यात यावा अशीही अट मान्य करण्यात आली आणि आता ही मागणी पाकिस्तान वारंवार करीत आहे. यामुळे काश्मीर हातातून जाण्याची दाट शक्यता निर्माण होत आहे.

''काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे'' ही भारताची भुमिका हजरतबल दर्ग्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा कसाला लागली. १५ ऑक्टो. १९९३ सकाळी ११ वाजेपासून श्रीगरमधील मुस्लीम बांधव शुक्रवारच्या नमाजसाठी हजरतबल दर्गात जमा होत होते. दुपारी नमाजनंतर ४०,००० च्या आसपास असलेली ही संख्या आपापल्या कामात मग्न होती. मात्र सायंकाळी पाचच्या सुमारास असे लक्षात आले की हजरत पैगंबराचा केस असलेल्या मुख्य खोलीची कुलूपे बदलण्यात आली व अतिरेक्यांनी दर्गा आपल्या ताब्यात घेतल्याचे दिसुन आले. त्यामुळे भारतीय सेनेला दर्ग्याला वेढा घालुन ठेवावे लागले. दर्गा लष्कराच्या वेढ्यात आल्यानंतर दहशतवाद्यांची अन्न पाणी बंद करुन त्यांना शरण येण्यास भाग पाडवे ही लष्करांची इच्छा होती. परंतु वाजाहत हबिबुल्ला यांना हा प्रकार मान्य नव्हता. दोन तीन दिवसातच सर्वांना अन्न पाण्याची सोय करण्यात आली. दहशतवाद्यांची इच्छा होती की लष्कराने आक्रमक भुमिका घ्यावी त्यासाठी दहशतवाद्यांनी स्वत:ची सुरक्षा व्यवस्था वाढविली दर्ग्याच्या गच्चीवर वाळुची पोती रचुन संरक्षणाची आणि टेहाळणिची व्यवस्था केली. मिनारांमधुन स्नायपर, रायफलींद्वारा मारा करता यावा यासाठी दहशतवाद्यांनी हवेत गोळीबार करुन सीमा सुरक्षा दलाचे स्वागत केले. परंतु तसे न करता हजरतबल दर्गासारख्या पवित्र ठिकाणी रक्तपात होऊ देणार नाही असा लष्करप्रमुख बिपिनचंद्र जोशी यांनी भुमिका घेतली या प्रकरणावरुन असे आढळते की हजरतबल दर्ग्यात रक्तपात हा पाकिस्ताला पाहीजे होता. कारण रक्तपातानंतर हा मुद्दा आंतरराष्ट्रीय राजकारणात उचलून काश्मीर गिळंकृत करण्याचा पाकिस्तानचा डाव उधळुन लावण्यात आला आहे.

अमेरीकेच्या असिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट श्रीमती रॉबीन रॅफेल यांनी तर अमेरीकेला भारत आणि काश्मीरचे महाराज हरीसिंग यामध्ये झालेला करारच मान्य नाही असे जाहीर करुन काश्मीर समस्येबाबत उघडपणे भारताच्या भुमिकेला विरोध केला याच पूर्वी अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी युनोच्या आमसभेपुढे भाषण करतांना सोमालिया, बोस्निया बरोबरच काश्मीर

समस्येचा उल्लेख करुन तेथे होत असलेल्या मानवी हक्कांच्या भंगा बद्दल चिंता व्यक्त केली होती. शीत युध्दाच्या काळात रशिया आणि भारत सतत एकमेकांना मदत करीत राहीले त्यामुळे सिऍटो करारात सहभागी झालेल्या पाकिस्तानसाठी अमेरिका काहीच करु शकली नाही. परंतु आता पुन्हा रशियात सत्ता स्पर्धा सुरु झालेली आहे अमेरीकेच्या आर्थिक मदतिवर येल्त्सीन यांचे राजकीय भवितव्य अवलंबुन असले तरी येल्त्सीन काश्मीर संबंधास भारताची बाजु मांडतिल की अमेरीकेच्या दबावाखाली पाकिस्तानची. यासाठी भारतीय राज्यकर्त्यांनी कायम सतर्क राहुन पुढील पाऊले उचलणे योग्य आहे. पं. नेहरुंनी आंतरराष्ट्रीय संघटणेकडे विनाकारण नेलेला हा प्रश्न इंदिरा गांधींनी बऱ्याच प्रमाणात सावरण्याचा प्रयत्न केला. १९७१ मध्ये बांगला देशावरुन पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान यांच्या मध्ये युध्द झाले. आणि युध्दाचा शेवट 'सिमला करारात' झाला. पंतप्रधान इंदिरा गांधी आणि झुल्फीकार अली भुत्तो यांनी काश्मीर समस्या भारत आणि पाकीस्तान यांच्यात वाटाघाटी करुन सोडवावी असे ठरले. परंतु आता मात्र या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय स्वरुप प्राप्त होत असल्याने राजनैतिक अधिकारी, परराष्ट्रखाते आणि मोंठ्या प्रमाणात काश्मीरी जनता यांच्यावर काश्मीरचे भवितव्य अवलंबून आहे.

पाकिस्तान भारताबरोबर आता समोरासमोर लढण्यापेक्षा छुपे युध्द पुकारत आलेला आहे कारण पाकिस्तानचे मागिल युध्दाचे घाव अजुन मिटले नाही आणि दुसरे युध्द त्यांना परवडणार नाही म्हणून दहशदवाद्यांचा पाकिस्तान वापर करतो आहे. पण या दहशदवादामुळे युध्दापेक्षा मोठी जीवीत व वित्त हानी झालेली आहे. काश्मीर राज्याच्या माहीती व प्रसारण खात्याच्या आकडेवारीनुसार जाने. १९९० पासुन ९३ जुलै पर्यंत काश्मीर खोऱ्यात ७००० च्या वर लोक ठार झाले तर सुरक्षा दलाचे ६०० कर्मचारी आणि २८५० अतिरेक्यांच्या समावेश आहे. तर फक्त जुलै महिन्यात १७३ नागरिक तर १८२ अतिरेकी आणि २६ कर्मचारी ठार झाले तर अपहरण केल्यानंतर २३० लोकांना अतिरेक्यांनी ठार केले. दहशदवादाच्या काळात ३५४५ खाजगी घरे, १२०८ दुकाने, १३५ महत्वाचे पुल, २२५ शाळा तर ११२२ सरकारी इमारती नष्ट झाल्या. आज काश्मीर मध्ये बालकाचे भवितव्य शाळा कॉलेज मध्ये न घडता त्याला आपले भविष्य बंदुकीच्या टोकावर घडत असलेले आढळत असेल अशाप्रकारची परीस्थिती निर्माण करण्यास पाकिस्तान जबाबदार आहे. काश्मीर मध्ये मानवी हक्क तुडविण्याची सुरुवात पाकिस्तानने केली आणि आरोप मात्र भारतावर लावला म्हणजे 'चोर तो चोर वर शिरजोर'.



**जिमखानाडे प्रसंगी अण्णासाहेबांचा सत्कार करतांना प्राचार्य डी.एस. नेमाडे**



**लोकहितवादी वाद-विवाद स्पर्धेत**
**विजयी कु. पंकज अत्रे, प्रफुल्ल केतकर सोबत प्राचार्य**




काव्यमैफिल

काव्य वाचन करतांना

सुधीर केने, अध्यक्षपदी-

श्री. नारायण शिरसाळे



नियोजन मंडळ (वरिष्ठ)



मेस कार्यकारिणी

# घेता पायधूळ तुझी जराशी.....

**कु. मनिषा बी. पाटील**, एस.वाय. बी.एस.सी.

आई म्हणजे मुर्तिमंत ममता ! प्रेमस्वरुप वात्सल्यसिंधू आई ! तिच्या ममतेत त्रिभुवनातलं सौंदर्य साठलं आहे. मराठी साहित्यात आपल्या प्रतिभेची दौलत उधळणारे जादूगार कवि निकुंब मातेला चंदनी खोडाची उपमा देतात. ते म्हणतात.

''माझ्या चंदनी खोडाचा
मंत्र 'झिजणे- झिजणे'
उणे लिंपायला माझे
घाली सुगंधाचे लेणे''

क्षितिजाला जसा अंत नाही ना तसाच मातेच्या प्रेमाला अंत नाही. चिमुरड्या वयात ऐकलेली एक गोष्ट अजूनही आठवते.

एकदा एका प्रियकराला त्याच्या प्रेयसीने त्याच्या मातेचे हृदय मागितले. प्रेमाने वेडा झालेल्या प्रियकराने आपले मन मातेजवळ व्यक्त केले. आपल्या इच्छांचा, भाव-भावनांचा, सुखांचा साक्षीदार असलेल्या आपल्या पुत्राला तिने तात्काळ आपले हृदय काढून दिले. तेव्हा आनंदाने धावत धावत जात असलेल्या त्या मुलाला ठेच लागली आणि तो खाली पडला. त्या हृदयाने त्याला विचारले ''बाळा, तुला लागले तर नाही ना ?'' शेवटी आईचेच हृदय ना ते ! त्या मुलाचे अंतःकरण गहिवरले, त्याचे डोळे डबडबले. त्याला कळून चुकले हे हृदय कसे आईचे ! मुलाला टाचणी टोचली तरी आईला भाला टोचल्याचे दुःख होते. मातेच्या प्रीतीची महती त्याला पटली. त्याला आपल्या क्रूर कृत्याचा पश्चाताप झाला. आई आपल्याला पुन्हा भेटावी असे त्याला वाटू लागले. पण कविवर्य माधव जूलियन यांचे शब्द आठवतात-

''सारे काही मिळे परंतू आई पून्हा न भेटे
तेणे चित्ताचे चित्ती माझ्या अखंड पेटे''

पण तरीही आई आर्त साद घालते

''घे जन्म तू फिरोनी, येईन मीही पोटी
खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी''

लहानपणी मुलांचे मन ओल्या मातीच्या गोळ्याप्रमाणे असते; मेणासारखे असते. हवा तो आकार त्याला देता येतो आणि दिला तो आकार प्राप्त होतो. संस्कारक्षमवयात मुलाला जसे घडवाल तसा तो घडतो. या वयात मुले आईच्याच सहवासात अधिक असतात. म्हणून आई हिच मुलाची पहिली शिक्षिका आहे. संस्कृतात एका सुभाषितात आईचा गौरव ''शंभर गुरु एका मातेच्या बरोबर असतात'', या शब्दांत केला आहे. साने गुरुजी म्हणतात-

''आई माझा गुरू । आई कल्पतरु॥
सौख्याचा सागरु । आई माझी॥''

पण कशासाठी ? मुलाच्या जीवनात कस्तुरीचा सुगंध दरवळावा यासाठीच ना.

आई मुलांवर चिडली आणि मुले तिच्यावर रागावली म्हणजे तिचे मन अस्वस्थ होते, तिच्या हृदयाला पाझर फुटतो. मग ती आपल्या लाडक्या बाळाची समजूत घालते. मुलगा चुकला म्हणून ती त्याला मारत नाही. 'चूका आणि शिका' हेच

तर ती सांगत असते. पण एकदा केलेली चूक मुलाने पुन्हा करु नये म्हणून ती मुलाला शिक्षा करते. मुलगाही आईवर रुसला तरी आई आणि मुले यांच्यातील जिव्हाळ्याचा संबंध अतूट आहे. म्हणून शब्द शूर धरतात-

''तू सुप्त स्वर कंठातले,
तू श्वास माझा एकला
तू स्पंदने हृदयातली,
तू रक्तिमा रक्तालला,
नाही बरे माझा तूझा आई, जिव्हाळा संपला''

आणि कवि यशवंताच्या शब्दात-

'रुसणार मी न आता
जरी बोलशील रागे'

अशी प्रतिज्ञाच जणू व्यक्त होते.

एकवेळ मुलगा आईवर रुसेलही, पण आई ? ती मुलावर कधीच रुसत नाही. मुलासाठी ती सर्वस्व पणाला लावते. त्याच्यासाठी ती डोळ्यांचा दिवा करते. हातांचा पाळणा करते, रक्ताचा पान्हा करते. ती स्वत: काट्यांवरुन चालून जाते, पण मुलाच्या कोमल पायांना काट्याचा स्पर्शही होऊ देत नाही.

किल्ल्याची दारं बंद झाल्यावर, जीवावर उदार होऊन आपल्या बाळासाठी बुरुज ओलांडणाऱ्या गवळणीचं उदाहरण का आपल्याला माहीत नाही.

आजच युग कलियुग आहे. या युगात विज्ञानाच्या क्षेत्रात मानवानं विजयांच्या पताका लावल्या आहेत. जग जवळ आल आहे पण, पण माणूस माणसापासून दूर गेला आहे. अस म्हणतात, 'जीवन ही मानवतेची पूजा आहे' पण आज समाजाच्या देव्हाऱ्यात मानवतेला कुठे स्थान आहे ? आज माणसातील माणूसकी हरवली आहे. सगळेच रस्ते रक्ताने माखले आहेत. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार ठरला आहे. सर्वत्र दहशतवादाचा भस्मासूर माजला आहे. माणूस स्वार्थी आणि अमानूष होत चालला आहे. अशा या जगात आपल्या मुलाची आबळ होऊ नये म्हणूनच आई जीवाचं रान करते.

पद्मा गोळे यांच्या कवितेतील आई आपल्या मुलाला सांगते-

''लक्षात ठेव प्रत्येकालाच असते आई''

अर्थात् अशा या जगातही तू सर्व जगाप्रमाणे क्रूर आणि क्षुद्र होऊ नकोस. दुसऱ्याशी वाईट वागतांना त्याच्या आईला काय वाटेल याचा विचार कर. अशी शिकवण ती मुलाला देते.

लहान मुलांची जीवने विशुध्द आणि विशाल बनविणारी 'विलक्षण संजीवनी' आणि तरुणांनी 'अमर गीताई' म्हणजे 'श्यामची आई ? या पुस्तकात साने गुरुजींनी मातेच्या हृदयातील अमृतस्पर्शी जिव्हाळा ओतला आहे.

कवि यशवंत म्हणतात-

''स्वामी तिन्ही जगाचा आईविणा भिकारी''

अशा या मातेच ईप्सित पूर्ण करणे आपले कर्तव्य आहे. वृध्द वयात मातेची सेवा करणे प्रत्येकाचे आद्य-कर्तव्य आहे. कवि निकुंबांच्याच शब्दात सांगावेसे वाटते-

''वृध्द चंदन ते माझे
नित्य जपले जपेन
त्याच्यासाठी, आज त्याची
जीव ठेविन गहाण''

समुद्रातील पाण्याएवढी शाई आणि आकाशाएवढा कागद घेतला तरी मातेचं ममत्व, तिच्या प्रेमाचं पावित्र्य शब्दात रेखाटताच येणार नाही. तरीही कवि सुरेश भट म्हणतात-

''मी पायधूळ घेतो जेव्हा तुझी जराशी,
माझी ललाट रेषा बनते प्रयाग काशी॥''

# 'जीवनसंध्या'

वासंती बोरकर, एम.ए.ज्यु. (राज्यशास्त्र)

शेजारच्या बंगल्याच्या फाटकाचा आवाज येताच, मुलांना घेऊन स्कूलबसची वाट बघत असलेल्या अलकाने वळून पहिले. ''आल्यात माई देवदर्शनाहून ?'' सुस्मित चेहऱ्याने तिने विचारले, ''हो आले बाई, बछडी शाळेत निघालीत वाटतं,'' माईनी धापा टाकीत विचारले ''टाऽऽटा माई आजी आम्ही निघालो स्कूलमध्ये'' अंकीता आणि अमोलने टाटा केला. माई हात उंचावत ओट्यावर तुळशीपाशी येऊन बसल्या आणि अप्पांची वाट पाहू लागल्या. अप्पांचा ''मॉर्निंग वॉक'' अजून झाला नव्हता. तितक्यात शेजारील दाराशी स्कूलबस थांबली. मुलं पळतच बसमध्ये चढली सुध्दा. माईना क्षणभरातच उदास वाटू लागलं. त्यांनी आपल्या बंद दाराकडं पाहिलं आणि त्यांनी एक उसासा टाकला. हं, काय अर्थ आहे या जीवनाला ?'' माईंना पुन्हा आयुष्य निरस वाटू लागाल...

माईंना अलिकडे करमत नसे. कारण त्यांच्याकडे कोणी विशेष येत-जात नसे. स्वत:चा बंगलाही जरा कोपऱ्यात निवांत होता. शेजारच्या बर्वे कुटुंबाचा आणि त्यांच्या मुलांचा काय तो आधार आणि विरंगुळा. अंकीता आणि अमोलकडे पाहिल्यावर त्यांना वाटायच की, 'साहीलची मुलंही आज एवढीच असती.'' साहीलचच्या आठवणीने त्यांच्या चेहऱ्यावर कळ उठली. त्यांनी आपल्या बंद दाराकडं वळून पाहिलं. बंगला त्यांना खायला उठल्यासारखा वाटत होता. दुरुन मंदिराच्या घटांचा आवाज मधून-मधून ऐकू येत होता आणि माईंच विचारचक्र सुरु झालं.... खरचं मंदिरातल्या घंटेच्या टोलाच्या आवाजाप्रमाणे आपलं आयुष्य क्षणाक्षणानं कमी होतय.... हं आता जगावसंही वाटत नाही... कोणासाठी जगाव ? जीवन म्हणजे तरी काय ? अळवावरचं पाणी ? होय, अळवावरच पाणीच.

त्यांची नजर परसदारच्या आळवाच्या गारेकडे गेली. त्यावर सकाळचे दवबिंदू पडले होते. त्याकडे माई एकटक पाहू लागल्या. अळवावरच्या दवबिंदूत त्यांना त्यांच पूर्वायुष्य दिसू लागलं.

कोकणातलं माहेर... पैंजणाच्या नाजूक पावलांनी माडाच्या माजघरातील चुल-मुल, बाहुला-बाहुलीच लग्न... अल्लडपणे परकराचे ओचे रायआवळे, कैऱ्यांनी भरुन घेणं... सगळे फुलपंखी दिवस ! फुलपाखरसारखे अलगद उडून गेले आणि मग रत्नागिरीच्या महाविद्यालयात बावरलेल्या नजरेनं प्रवेश... सुरुवातीला बिचकत, नजरेच्या कोपऱ्यातून इकडे-तिकडे चोरटा कटाक्ष टाकणं आणि अभ्यास एके अभ्यास.... शेवटच्या वर्षाला असतांना अप्पांशी विवाह ! 'अप्पा' त्यांच्या आठवणीने माईंच्या अंगावर गोड शिरशीरी उठली.... त्यांचा उमदा स्वभाव ... खळखळून हसणं- आत्मविश्वास- माई तर त्यांच्या प्रेमाने न्हाऊन निघाल्या... बँकेतून आल्यावर अप्पांना दार उघडायला झालेला वेळ अजिबात चालत नव्हता. सदा आपली घाई !

एका हातात स्कूटरची चावी आणि दुसरा हात बेलवर.... आणि दार उघडताच अशी घट्ट मिठी की माई गुदमरुन जायच्या. मिठी- हं साहीललाही शाळेतून आल्यावर दार उघडायला झालेला वेळ खपत नसे. आणि आल्या आल्या माईच्या कमरेला विळखा घालून जोरात म्हणायचा, ''आई मला भूक लागलीय गऽऽ - लवकर जेवायला वाढ'' वडिलासारखीच सदा घाई! बघता बघता साहील मोठा झाला आणि कॉलेजात जाऊ लागला. त्याला वेगाच फार आकर्षण - 'जीवनाला गती हवी' अस त्याला नेहमी वाटायचं आणि-आणि एक दिवस वेगात जात असतांना तो जीवघेणा अपघात!!

माईच्या मनात आलं माणसाच आयुष्यच अस क्षणभंगुर ... दव बिंदू सारख- थोड्याच वेळात सूर्य किरण पडतील आणि मग हे दव बिंदू नाहीसे होतील आपणही असच जगातून निघून जाऊ आणि कोणाला आपली आठवणही येणार नाही- हं - नंतर आहे तरी कोण म्हणाव.... साहील आपल्या रक्तामासांचा सोडून गेलाय, कायमचाच? पुन्हा न येण्यासाठी!! माईंचे अश्रु डोळ्यांच्या कडा सोडून गालावरुन वाहू लागलेत. माईंनी डोळे घट्ट मिटले.... त्यांना सगळं नुकतच घडल्यासारखं वाटू लागलं.... आणि त्यांच मन अधिकच उदास झालं....

इतक्यात फाटकाचा आवाज एकू आला. माईंनी डोळे पुसले आणि अळवावरच्या दवबिंदूकडे पाहिले. त्यावर आता कोवळे सोनेरी सुर्यकिरण पडले होते. आणि त्यातून ''सप्तरंग' दिसत होते माई किंचीत सुखावल्या 'दवबिंदू क्षणभंगुर असले तरी काय झालं. नेत्रसुख तर देतात. दुसऱ्याला आनंद तर देतात' या विचारांनी माईच्या मनात सप्तरंग खुलले.

त्यांना जाणवलं आतापर्यंत आपण फक्त आपलच दुःख कवटाळत बसलो. 'साहील' अप्पांचाही मुलगा होता. त्यांना सुध्दा आपल्या इतकचं दुःख झाल असेल पण ते आपल्याला जाणवू देत नाहीत. आपण रडू तरी शकतो, पण अप्पा? नाही, नाही, आता अप्पासाठी तरी जगायलाच हवं' या विचारासरशी माईंनी आपल्या मनाची मरगळ टाकली. त्या आता कौतुकाने दवबिंदूकडे पाहू लागल्या. त्यांच्या ओठावरच्या कोपऱ्यात स्मित झळकलं. अप्पा आत काठी टेकीत तसत येत होते. माई उठल्या आणि म्हणाल्या, ''चला आज आपण दोघेही समुद्रावर फिरायला जाऊ'' अप्पा म्हणाले, ''हं .. हं ... हे काय भलतंच, तुझे गुडघे दुःखतात ना? मग नको इतक्या लांब जायला, तु देवळात जाऊन आलीस ना ?

''देवळात तर जाऊन आलेय, पण आज आपण दोघं समुद्रावर फिरायला जाऊ या''

''बरं ठिक आहे, हं, ही माझी शाल घे तुझ्या खांद्यावर'', अस म्हणत अप्पांनी शाल माईंच्या खांद्यावर टाकली. माईंनी अप्पांचे हात घट्ट धरला आणि ती दोघे समुद्रकिनाऱ्यावर आली. लाल ओल्या रेतीत त्यांची पाऊले शेजारी - शेजारी उमटत होती आणि माईंच्या मनातले सप्तरंग गडद होत चालले होते.

❖❖❖❖❖

# राष्ट्रीय सेवा योजनेचे रौप्य महोत्सवी वर्षी

गिरीष बडगुजर, [टी.वाय.बी.ए. इंग्रजी]

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्याचे उद्दीष्ट ठेवून कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे १९९३-९४ हे वर्षे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. विद्यापीठ पातळीवर युवक युवतीमध्ये सामाजीक सेवेची जाणीव निर्माण करणे, शिस्त या भावनेचा विकास करणे, श्रमाविषयी आदराची भावना निर्माण करणे या उदेशाने भारत सरकारने २४ सप्टे. १९६९ ला राष्ट्रीय सेवा योजना सुरु केली. तेव्हा भारतातील एकुण ३७ विद्यापीठात, ४०,००० विद्यार्थ्यांनी या योजनेत भाग घेतला होता. या योजनेला मिळत असलेला उत्तम प्रतिसाद पाहून संपूर्ण भारतातील विद्यापीठात ही योजना सुरु केली आणि ज संबंध भारतात १० लाखापेक्षा अधिक युवक युवती या योजनेत सहभागी झालेले आहेत.

राष्ट्रीय सेवा योजनेचे उध्दीष्टे-

सामाजिक सेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास करणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख वैशिष्ट आहे. तसेच विद्यार्थ्यांन मध्ये सामाजिक सेवेची जाणीव निर्माण करणे व नागरी भावनेचा विकास करणे समाजाला गतीमान करण्यामध्ये नैपुण्यता प्राप्त करणे, राष्ट्रीय एकात्मतेला कार्यात्मक स्वरुप प्राप्त करुन देणे व श्रमाविषयी आदरभावना निर्माण करणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे उदिष्ट होत.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम

रा. से. यो. च्या कार्याचे दोन प्रकार पडतात. रासेयोचे नियमीत कार्यक्रम व विशेष शिबीर कार्यक्रम

**१) रासेयोचे नियमीत कार्यक्रम :-** हे कार्यक्रम सतत वर्षभर सुरु असतात यात महाविद्यालय परिसर स्वच्छ ठेवणे, वृक्षारोपण व वृक्षसंगोपन करणे, व्यक्तीमत्व विकास करण्यासाठी विविध तज्ञांचे भाषण आयोजित करणे व सांस्कृती कार्यक्रम केले जातात.

**२) विशेष शिबीर कार्यक्रम :-** रासेयोचे दहा दिवसाचे शिबीर एका ग्रामीण भागात आयोजित केले जातात. या दहा दिवसात श्रमदान, गावातील साफसफाईचे कामे, श्रमसंस्कार कार्यक्रम गावातील प्रौढांना शिक्षण देणे, अंधश्रध्दा निमूर्लन कार्यक्रम करणे गावात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रम करणे. ग्रामीण भागातील लोकांना अंधश्रध्दा निर्मुलनसाठी विविध प्रयोगात्मक कार्यक्रम घडवून आणणे या प्रकारे ग्रामीण जनता व शहरातील युवक यांच्यात सामाजिकरणाचे कार्य केले जाते.

गेल्या वर्षी मु.जे. महाविद्यालयाचे रासेयोचे शिबीर जळगाव पासुन पंधरा कि.मी. अंतरावरील कानसवाडे या तापी नदीच्या काठावरील खेडेगावात भरले. तेथे गावकऱ्यांसाठी विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून मारोती या देवतेचे मंदीर बांधण्यासाठी पाया खोदला. व त्या गावाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी नाली खोदल्या. या दहा दिवसाच्यां काळात सर्व विद्यार्थ्यांनी

एक आगळा वेगळा आत्मानुभव मिळाला. गाव कऱ्यांचा प्रेमळ स्वभाव व निर्मळ मनाने शहरातील विद्यार्थ्यांना आपलेसे केले.

या वर्षाचे हिवाळी शिबीर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियोजित परिसरात आयोजित करुन 'पाणी अडवा व जीरवा' योजनेखाली बंधारे बांधून रस्त्याची रचना श्रमदानाच्या माध्यमातून केली. व पावसाळ्यात आम्ही लावलेल्या एक हजार वृक्षांचे योग्य संवर्धन केले. या नविन विद्यापीठात आपला खारीचा वाटा या विचाराने सर्व विद्यार्थ्यांची मान ताठ झाली. गावातील सर्व नामवंत अभियेत्यांनी आमच्या बांधकामाची स्तुती केली याचा अभिमान आम्हास वाटतो.

या वर्षी निसर्गाने महाराष्ट्रावरील आणलेल्या भुकंप या संकटामुळे झालेल्या भयानक नुकसानीत रासेयोच्या विद्यार्थ्यांनी त्वरीत धान्य, कपडा, पैसा, भांडी या स्वरुपात मदत गोळा केली व भुकंपग्रस्ताच्या दुःखात सहभागी झालो.

या वर्षीचा रासेयोचा समारोप विद्यार्थ्यांची सामाजिक बांधिलकी या माध्यमातून रक्तदान करुन साजरा केला.

रासेयोच्या या रौप्य महोत्संवी वर्षात 'पाणी अडवा व जीरवा' योजना ग्रामीण भागात लोकांना समजावून सांगणे. विद्यार्थ्यांचे व विद्यार्थीनीचे व्यक्तीमत्व विकसीत करण्यासाठी प्रयत्न करणे पर्यावरण संरक्षण करणे. विद्यार्थ्यातील सुप्त गुनांणा संधी देणे. राष्ट्रीय एकात्मता संस्कार शिबीर आयोजित करणेही विविध कार्यक्रम घेण्यासाठी मानस आहे. अशाप्रकारे विद्यार्थी हा रासेयोच्या माध्यमातून सामाजिक बांधीलकी असलेल्या भारताचा नागरीक घडत असतो एक प्रकारे राष्ट्राची सेवाच करीत असतो.

## माहित आहेत ही टोपणनावे!

१) ज्ञानेश्वर– ज्ञानेश्वर विट्ठलपंत कुलकर्णी
२) तुकाराम– तुकाराम बोल्होबा झांबिले
३) रामदास– नारायण सुर्याजी ठोसर
४) एकनाथ– एकनाथ सुर्याजी पंत
५) बी– नारायण मुरलीधर गुप्ते
६) होनाजी– होनाजी सयाजी शिलारखाने
७) अनिल– आत्मराव रावजी देशपांडे
८) गिरीष– शंकर केशव कानेटकर
९) मोरोपंत– मोरोपंत रामचंद्र पराडकर
१०) केशवसूत– कृष्णाजी केशव दामले
११) केशवकुमार– प्रल्हाद केशव अत्रे
१२) गोविंदाग्रज– राम गणेश गडकरी
१३) कुसुमाग्रज– विष्णू वामन शिरवाडकर
१४) माधव ज्युलियन– माधव त्र्यंबक पटवर्धन
१५) बालकवी– त्र्यंबक बापूजी ठोमरे
१६) यशवंत– यशवंत दिनकर पेंढारकर
१७) आरती प्रभू– चिंतामणी त्र्यंबक खानोलकर



## ''रंग! अव्यक्त मनाचे! विखुरल्या स्वरांचे!!''

मल्लिका धनंजय कलकोंडा, एस.वाय.बी.एस.सी. [कॉम्प्युटर]

रे क्षणा ! थांब जरा !
सृष्टीच्या साजेत मला झुलू दे जरा!
धुंद मेघांच्या पंखांना स्पर्शू दे जरा!!

निसर्ग! मोठा जादुगर! तो जसं कळ्यांची फुल करतो नं, तसंचं अश्रुंचही हास्य करतो! निसर्गाने किती रंग भरले आपल्या जीवनात! हो रंगच! कारण आयुष्य ही एक रांगोळी आहे, ज्यातील ठिपके भरणे नियतीच्या हातात आहे तर रंग भरणे आपल्या हातात! कितीतरी रंग आहेत समोर- पहिल्या पावसात होणाऱ्या चिखलात उमटणारा ओल्या पायांचा रंग, डोळ्यातल्या चमकेत उमटलेला ध्येयस्वरुप रंग, मनांना रंगवून टाकणारा प्रीतीचा अनोखा रंग, आशेच्या कोवळ्या पालवीचा रंग, आकाशतल्या ''निळ्या'' चं वेड लावणारा भावविभोर गहिरा रंग! असे किती तरी रंग! जे पाहता बरोबर वाटतं की घ्यावा मनाचा कुंचला अन् आयुष्याचा कॅनव्हॉस आणि करावी सुरुवात एका अकृत्रिम अजरामर पेंटींगची!.......

...... जेव्हा उजेडाचे दुध घेऊन, डोइवरचा सावळा घडा सावरत ''संध्या'' गवळण निळ्या आभाळातून जात असते, तेव्हा तिच्या नकळत तिचा पाठलग करावा एखाद्या पाऊल वाटेन.... सायंतरीची कुठंतरी धून वाजजत असतांनाच पोहचावं एखाद्या तळ्याच्या काठी, जिथं जललहरी गात असतील वाऱ्याचा संदेश.... करंज्यातून उडणारा नितळ थेंब जस चिमुकल्या बाळाच्या नखाप्रमाणे बोचतो तशाच बोचऱ्या थंडीत तळ्याच्या काठाने वळून तिथल्या मंदिराच्या पायऱ्या चढाव्यात. पानांची सळसळ जसा काही तंबोऱ्याचा नादस्वर. द्वाराजवळची झाडे. षड्ज पंचम, पायऱ्या चढतांना उमटला आरोह, गाभाऱ्यात उतरतांना अवरोह आणि मंदिरातली सावळ्या श्रीहरीची रागमूर्ती! आणि मनाच्या गाभाऱ्यातून धीरगंभीर स्वरांतून वदावे ''ॐऽऽ'' ते वलय पूर्ण वाढत असतांनाच पुन्हा वदावे ''ॐऽ....'' आणि काही वेळाने म्हणण्याचीही अवश्यकता भासत नाही. असं लक्षात येतं की अखंडपणे! युगायुगांपासून!! तो नाद वाढत जातो.... वाढत जातो... डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. त्या रागमूर्तीच्या आरसपानी डोळ्यात खोल खोल शिरतांना उमयतो. 'आनंदाचे डोही आनंदतरंग!' हा एकरुपतेचा रंग किती गहीरा!

मनं हिरवंसुध्दा असतं एक कवी म्हणतो- 'जेव्हा अंगणात लावलेलं झाड मरु लागतं, तेव्हा त्याच्याकडे पाठ फिरवून त्याला पाणी देणं बंद करायचं नसतं, तर त्याला पाणी देतचं रहावं हसतमुखानं!, त्याचं मरणं सुखाचं व्हावं म्हणून!' हा भावार्थ कवी मनाच्या हिरवेपणाचीच साक्षच देतो नाही का ?

हिरव्या रंगावरुन वाटलं की हिरवळीच्या मऊ शेल्यावरुन पहाटे पहाटे हळूवार पावले टाकत जावं त्यात दवांनी केलेल्या ओल्या नक्षीचा अर्थ लावत जावं! दवं! छे! दवं नाही ते - ते तर मोती!!

कदाचित् रात्री उमामहेश्वर येथे आले असतील. चांदण्यांच्या तेजात उमेचे अलंकारा झगमगत उठले असतील खट्याळ वाऱ्याने केशबंध मुक्तपणे उलगडला असेल व त्यातील मोती खाली सांडले असतील! प्रभाती बालरविच्या साक्षीने ते निघाले असतील हे मोती इथेच विसरुन!

असचं बर्फाळ शिखराच्या पायथ्याशी उभं रहावं... एकीकडे हिमराजाची साद दुसरीकडे सृष्टीचं अमूर्त नादमय संगीत! एखादी गोष्ट ओठात आहे पण ओठावर येत नाही. किती विचीत्र वेदना! पण खोल डोहातून एक सूर डोकावावा आणि हळूच सर्व सूरावट उमगावी व मनपक्ष्याने दाही दिशांत भराऱ्या मारुन म्हणावं, ''आमि पेलाम्- आमि पलाम्! - ''मला मिळालं- मला मिळालं!!''

यातनेची पुरेपुर किंमत दिल्यावरही धरतीवर फक्त थोडासा शिडकावा होतो तसं आसवलेलं मन अतृप्तचं रहावं. मनसाच्या रागामध्ये जेव्हा अनुराग व अनुबंध वादीसंवादी होऊन मिसळून जीवनसतारीवर दिड-दा स्वर निघतात तेव्हाच जीवनसुंगध दखळतो! नुसतं चालण्यात काही अर्थ नाही. जेव्हा पायात काटा रुतलेला असतो आणि शिखरापर्यंत पोहचायचं असतं, तेव्हा चालण्यांत खरी मजा असते. कारण तो प्रत्येक क्षण आपण जगलेलो असतो. म्हणुन या युगप्रवासात एक का हजार शाप मिळोत्, मुग्धपणे जगुन दाखवण्यात अर्थ असतो. ''कशाला भिती, भरतीच्या तडाख्यांची ? खारटपाणी! डोळ्यात वाळू, अरे ही तर किमत जगण्याची!''

माझे रंग तर कधीच संपणार नाहीत. जेव्हाजेव्हा जललहरी किनाऱ्यावर आदळून परततील - गणित चुकलं म्हणुन चांदणं मोजणारा हात पुन्हा सरसावेल- पुन्हा एकदा श्रावणातला घननीळ वर्षेल - तेव्हा तेव्हा माझे हे रंग नित्य नवा जन्म घेतच असतील पण एकवेळ अशी येईल की माझ्या रांगोळीतले टिपके संपलेले असतील आणि या भवसागरात माझे सत्व शोधता - अस्तित्व सिध्द करता करता - मी त्या बिंदुरुप महान साकार तत्वात विलीन होण्यासाठी पायऱ्या चढत असेन.

युग लोटतील.

माझ्या प्रत्येक पावला-पावलावर सुंदर हसरी फुले उमललेली असतील-

''हसत हसत जाईन निघुन
त्या हास्यरुपात मागे राहुन!
अश्रुफुलांत बरसुन जाईन
स्मृतीकरणांचे मधुपराग बनुन!''

आणि या फुलांशेजारुन त्याच मातीत एखाद्या अवखळ बालकांची निरागस चिमुरडी पावलं उमटलेली असतील पुन्हा असचं एखादं भावस्वप्न रंगवण्यासाठी !!



## मेडीकल व इंजिनिअरिंग ला प्रवेश



गणेश भारुळे
बी.जे. पुणे



सचीन कोल्हे
बी.जे मेडीकल पुणे



अमितो चांदिवाल
बी.जे. मेडीकल पुणे



रुपाली पाटील
मेडीकल कॉलेज धुळे



कविता गौड
बी.जे. मेडीकल पुणे
(जिवशास्त्र बोर्डात प्रथम)



अंजली बढे
बी.जे. मेडीकल पुणे



चिंतामन चौधरी
मेडीकल कॉलेज, धुळे



चारुलता महाजन
मेडीकल कॉलेज, धुळे



जान्हवी चौधरी
मेडीकल कॉलेज, नाशिक



**पंकज शाह**
मेडीकल कॉलेज, नाशिक



**राहूल पाटील**
बी.डी.एस. पुणे



**शांताराम ठाकुर**
मेडीकल कॉलेज, धुळे



**जिंतेद्र नारखेडे**
(केमीकल) जवाहरलाल नेहरु
कॉलेज औरंगाबाद



**निलेश चौधरी**
बी.टेक. (पेट्रो) लोनेरे



**ललीत चौधरी**
बी.डी.एस. पुणे.



**प्रसन्न मुचरीकर**
कॉम्प्युटर, पुणे



**कुमुदेश चौधरी**
इलेक्ट्रॉनिक कोपरगाव



**दिपक चौधरी**
एम.आय.टी. पुणे




**जयश्री किनगे**
शासकीय अभियांत्रिकी
कॉलेज पुणे (संगणक)




**अमृता देशपांडे**
शासकीय अभियांत्रिकी
कॉलेज, पुणे



**देवेंद्र कोल्हे**
शासकीय अभियांत्रिकी
कॉलेज, पुणे



**मनोज चौधरी**
जनरल सेक्रेटरी



**अनिरुध्द सकळकळे**
बेस्ट स्टुडंस्ट



**नितीन सपके**
गॅदरींग सेक्रेटरी



**गिरीष बडगुजर**
एन. एन. एस.
ग्रूप लिडर



**प्रशांत कोल्हे**
एन. एन. एस.
बेस्ट ग्रूप लिडर



**संजय कोळी**
एन. एन. एस.
ग्रूप लिडर

# प्रथम श्रेणीचे मानकरी



कु. सुहास चतुर
बी.ए.



वासंती बोरकर
बी.ए. राज्यशास्त्र



भगवान साखळे
बी.ए. इंग्रजी (स्पेशल)



सुरेश ढाके
एम.ए. अर्थशास्त्र



हेमलता नागपूरे
एम.एस्सी. झुऑलॉजी



राजेश पाटील
एम.एस्सी. पदार्थविज्ञान



सौ. उषा शर्मा
एम.ए. (हिंदी)



एन.बी. नारखेडे
एम.एस.सी. (केमेस्ट्री)



गिरिष कौशिक
१२ वी सायन्स



रोहित शर्मा
सिनिअर अंडर ऑफीसर
एन.आय.सी. कॅम्प



विलास बोंडे
सिनिअर अंडर ऑफीसर ऑल इंडिया
रॉक-क्लायम्बींग कॅम्पमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व



संजय चौधरी
अंडर ऑफीसर ऑल इंडिया अॅडव्हान्स
लीडरशीप कॅम्पचे नेतृत्व बेस्ट लीडर ऑफ महाराष्ट्र



सर्वानंद कुकरेजा
अंडर ऑफीसर
बी.एल.सी. दिल्ली येथे निवड



वैशाली कुलकर्णी
अंडर ऑफीसर
आर.डी. परेड दिल्ली



नरेश भानुदास रडे
नॅशनल इंटिग्रेशन कॅम्पसाठी
वेलूर,
तामीलनाडू येथे निवड



दीपक चौधरी
सिनीअर अंडर ऑफीसर
'सी.' सर्टीफीकेट पास



गोविंद बोरोले
सिनिअर अंडर ऑफीसर
'सी.' सर्टिफीकेट पास



चंद्रशेखर पाटील
सिनिअर अंडर ऑफीसर
'सी.' सर्टिफीकेट पास

# विद्यापीठ खेळाडू



ललिता हर्डीकर
टेबल टेनिस



माधूरी फालक
खो खो



प्रीती रडे
बॅडमिंटन



संजय कोल्हे
वेट लिफ्टींग प्रथम



रोहित निकम
फुट बॉल



अतुल देशपांडे
बॅड मिंटन



विनीत जोशी
बॅड मिंटन



अनुप चांडक
फुट बॉल



निळकंठ खडके
कबड्डी

## मनोरथ

सखे ! तू हा प्रेमाचा खेळ खेळून
आता नात तोडणार
याची मला चाहूल होतीच
कारण,

मी ओळखतो हे जग
स्वार्थी आहे.
इथल्या सिमेंट कॉक्रीटच्या
जंगलात पाखरांना
करता येत कृत्रीम प्रेम
जोडता येत कुणाशीही
फसवं नात ।
पण, आता तरी तू
ठोकरल्यावर होशील नां शहाणी
तू तूझ स्वच्छंद आयूष्य
खुशाल जगू शकतोस
पण जातांना एक तरी कर
माझ्या वाळवंटी आयुष्यात
या अंधारी जीवनात
एकतरी दीपक लावून जा
कारण तोच मला
उद्याचा प्रकाश देईल
बस ! एवढच मनोरथ
पूर्ण करुन जा सखे !

**मनोज चौधरी**
एस.वाय.बी.एस्सी.

## किंमत तुझ्या अश्रुंची

जोवर आहे सुर्य
तोवर ...
रहावे असेच हास्य
तुझ्या चेहऱ्यावर...

जरी सुर्य गेला
चालेल मला...
जाळून घर माझा मी
प्रकाश देईन तुला....

जोवर आहे सागरात
पाणी...
तोवर पडू नये तुझया
डोळ्यातून पाणी.....

आटले जरी सागरातले पाणी
चालेल मला....
पण तुझ्या डोळ्यातुन पाणी
नाही आवडणार मला....

कारण दोन अश्रुंची किंमत
तुझया....
आहे जिवापेक्षा जास्त
माझया....

विजय एस. शिरसाठ
एफ.वाय. बी.ए.

## ''मैत्री''

बंधनात पवित्र मैत्रीच्या
किंतु परंतु ठेवू नकोस
मैत्रीबद्दल शंका मना
कधी तुझ्या तू धरु नकोस

मैत्रीचे निर्मालय जाणूनी
पाप मना तू आणू नकोस
मैत्रीच्या अंकुरास फुलतांना
कधी कुचकारुन टाकू नकोस !

जन म्हणतात म्हणून हृदयी
अविचार तू आणू नकोस
आत्मा म्हणतो म्हणुन तू
कधी कर्तव्य टाळू नकोस

जीवनात कोठेतरी गेलीस तू
मैत्रीच्या आणा-बाका विसरु नकोस
मित्रत्वाचा उघड्या डोळा
कधीही मुडदा पाडू नकोस

मैत्रीचा इतिहास घडवू
ऱ्हास कधी घडवू नकोस
मैत्रीशी 'प्रतारणा' करुन
कधी स्वस्तात अमर होवू नकोस

**विजय पा. महाजन**
एम.ए. एफ.वाय. [राज्यशास्त्र]

## बायको मन्ही अशी

[खान्देशातील अहिराणी भाषेतील कविता]

बायको मन्ही अशी दादा, बायको मन्ही अशी
कानमा तुम्हना सांगस दादा, बायको मन्ही अशी ॥धृ॥
तीन्ही गोट सांगस तुम्हले पन वायदा करा
बोलजात नका तीन्हापान, मन्ही गन्हाना करा.
सकायले मी उठनू, अन् तिले मी बोलनू
रांधेल काई व्हईन त् दे माले बनू
तव्हय ती म्हनस कशी, शिरा खाईल्या एक बशी
काय तिन्हा गुन सांगू, बायको मन्ही अशी ॥१॥
दिसाले शे ती देखनी, म्हनीसनच माले पटनी
रात दीन दादा झगडा करस, मन्हा जोडा मालेच मारस
एक दिन तीले साडी लयनु तं म्हनस माले हौशी
लैया आखो म्हनस माले नवी कोरी मॅक्सी,
काय होनार शे, बोलनू मन्हा मनशी
घाटामा माल्हे टाकी दिन बायको मन्ही अशी ॥२॥
असाच एक दिन सकायले उठनू
देखीसन मटकन खालेच बठनू
माय, बाप, बहीन, भाऊ उन्ही तीन्ही जीजी,
सगळासले पाहुनचार करा नाटक देखं ''शिवाजी''
सैपाक करा, भांडा धोयात, धोयी तीन्ही मॅक्सी
रडी राहनू नशिबले मना बायको मन्ही अशी ॥३॥

**संजय रामदास बडगुजर**
प्रथम वर्ष (कला)

## व्यथा फुलाची

कोमेजलेल्या फुलाची
असते व्यथाच न्यारी
न्हाले दंव बिंदुनी तरीही
फिरकत नाही भुंगा तिकडे
रुप-रंग-गंध हीन ते
पडलेले पायतळी
कुठेतरी इतस्ततः....
शवावर, थडग्यावर, देवापुढे
विस्कटलेल्या पाकळ्यांनी
निर्माल्य होऊन! निर्माल्य होऊन!!

**शारदा बावस्कर**
तृतीय वर्ष कला (मराठी)

## दुःख

प्रत्येक वेळी होते का असे ?
जिथे जिथे मी जात असे
दुःख माझ्या आधी तिथे
कदाचित ती असेल ही
माझ्या येण्याची चाहूल
पण त्याला आहेका माहीत ?
ते तर माझे अविभाज्य अंग !
मला तर नक्की माहित असे
दुःख असे क्षणभंगूर !
केवळ क्षणभंगूर !
कारण त्याला आहे अंत !
नाही ते अनंत !

**स्वाती बोंडे**
तृतीय वर्ष (विज्ञान)

## असेल तर...

मरायचे असेल तर
माणुसकीसाठी मरायचे
व्यर्थ जगून माणूसकीचे
मुडदे नाही पाडायचे

द्यायचाच असेल तर
मदतीचा हात द्यायचा
कुणाचे सर्वस्व हिरावून
अनाथ नाही करायचे

गायचेच असेल तर
जीवन संगीत गायचे
पर हृदयाची तार छेडून
उगीच नाही दुखवायचे

मानायचेच असतील तर
आईचे उपकार मानायचे
तिला हृदयमंदीरी स्थापून
मनोभावे पुजायचे

विसरायचे असेल तर
जातपात धर्म विसरायचे
असल्या भांडणांना विसरुन
विश्वकुटुंबात राहायचे

**चौधरी सुनिल नारायण**
तृतीय वर्ष कला (मराठी)

## अनंत मी ! अवध्य मी !!

'आई,'
सर्पीण आपलीच पीले खाते
हे ऐकतांना सुध्दा शहारत होतो आम्ही
आईच्या प्रेमळ पान्हयावर
अचल श्रध्दा होती आमची
तूच पुरवलेस आमच्या स्वप्नांना रंग
आणि आमच्या मुलांना पाणी
तूच झाली होतीस आमची गाणी.
तुझ्या कुशीतच आम्ही स्वप्नं रंगवीत होतो
स्वप्नांचे पक्षी क्षितीजावर गुंफीत होता.

आई,
आज तूच कंटाळलीस आमचे ओझे सांभाळतांना
तुला फक्त कुस बदलायची होती
पण आई.... तुझ्या नुसत्या हुंदक्याने
आमचे हजारो श्वास संपलेस गं !
तू कुस बदललीस पण......
किती मातांची कुस उजाड झालीय.

आई,
संपणाऱ्या श्वासांच्या
त्या शेवटच्या प्राणांतिक धडपडीची शपथ
आम्ही आता हरणार नाही.

आई,
वैरीण झालीस तू आमची. तरी
आम्ही आता मरणार नाही.

आई,
जरी तूच पुन्हा ठरवशील
कधी आम्हाला संपवण्याचे
आम्ही पुन्हा उभे राहू, पुन्हा
फुलवू स्वप्न जगवण्याचे !

आई,
कोलंबस, नेपोलियन. सावरकर
गेलेत सांगून हेच, आणि 'मी'
किल्लारीचा एक भूकंपग्रस्त
पुन्हा सांगतोय तेच;
अनंत मी ! अवध्य मी !!
कोसळणाऱ्या मनातून पेटेन मी !

आई,
फिनीक्स, होऊन क्षितीजावर
पुन्हा झेपावेन मी !

**अनिरुध्द अ. सकळकळे**
टी.वाय.बी.ए. इंग्रजी



## दंगल

जनावर
जपत असतात
माणसांनी सोडलेली माणूसकी
जंगलात राहून माणसं झाली
जंगली करतात केव्हाही दंगली

शहरात राहून
काही गुलाल मशिदीत
काही विष्णु मंदिरात
काही आंबेडकरांना तर
काही शिवाजी महाराजांना
काळ फासलं म्हणून

दंगलीत जाळली जातात माणस
अन लाकडा सारखी पाडली
जातात,
घरं...........

आकाशातील पाऊस ही बरसत
नाही पूर्वि सारखा
उगिचच दंगलीत
अडकू नये म्हणून

**एस.डी. जैन**
११ वी. आर्ट

## जाता जाता

आलं वाऱ्याले उधान
गाली चांदणी हसली
तुझ्या प्रेमरुपी आगमणाची
चाहूल मला ग लागली

न सांगता तुझ ते
अचानक येण
हूरहूर जिवाले लवते
तुझ रुप ग देखणं

गाल गुलाबी गुलाबी
ओठी प्रेमाची लाली
सौंदर्याची खाण अशी
लाज नक्षत्राला आली.

वाट पाहूणी तूझी
जीव कासाविस होतो
येशील का परतूनी
प्रश्न मनाला पडतो.

अखेरच हे मागणं
खंत एकच ही आता
डोळा भरुन पाहील
एकदाच जाता जाता

**सुधीर प. केने**
टि.वाय.बी.ए. अर्थशास्त्र

## विनोद

**१) पत्नी (पतीला)**

संध्याकाळी जरा लवकर येत जा आजच शेजारी कोणीतरी चर्चा करीत होतं की एक वेडसर माणूस म्हणे गाडीखाली चिरडून केला. मला तर काळजीच वाटू लागली होती.

**२) निवडणूक चिन्ह**

एक पत्रकार : (उमेद्वाराला)

येणाऱ्या निवडणूकीत आपण कोणती निशाणी ठेवणार आहात?

उमेद्वार-

मी निवडून आल्यावर मंत्री बनणार हे निश्चितच असल्यामुळे माझे निवडणूक चिन्ह राहणार आहे, खुर्ची व डिंकाची बाटली.

**३) एक दिवसा आड**

पोलिस : (सुटका झालेल्या जुगाऱ्याला)

आता तरी जुगार सोड. त्यात माणुस एक दिवस जिंकला तर दुसऱ्या दिवशी हरतोही.

जुगारी :

म्हणूनच मी आता जुगार एक दिवसाआडच खेळणार आहे.

**४) राजकारण व मिशा :**

एक मेजवानी प्रसंगी एका बाईने चर्चिल यांना कुत्सितपणे टोमणा मारला, ''मला तुमच्या राजकारणाशी व मिशांशी काहीही घेणे देणे नाही''

त्यावर चर्चिल तितक्याच मिश्कील स्वरात म्हणाले :

''काळजी करु नका, तुमच्या वाट्याला दोन्हीही येणार नाही''

**५) बाबा :** राजू, आज सकाळपासून घरी कोण आले होते ?

राजू : DO - DIE - DO

बाबा : म्हणजे नक्की कोण ?

राजू : अहो बाबा, आपलेच शेजारी 'करमरकर'

**६) माणूस :** (पाकीट चोरास)

काय रे, पाकिट चोरायला लाज नाही वाटत.

पाकिट चोर :

साहेब, लाज तुम्हांलाच वाटली पाहिजे, इतके कमी पैसे पाकिटात ठेवता ?

**७) एक्स् – रे :**

रमण : (डॉ. सुरेशला)

डॉ. साहेब, या डोक्याच्या एक्स्-रे मध्ये तर काहीच दिसत नाही आहे.

डॉ. सुरेश :

मुर्खा, हळू बोल. तो माननिय मंत्र्यांच्या डोक्याचा एक्स्-रे आहे.

## वात्सटायण

''अर्थशास्त्री कोणाला म्हणतात ?''

ज्या माणसाला दुसऱ्याच्या अर्थाविषयी शास्त्रीय माहिती आहे, त्यालाच अर्थशास्त्री म्हणतात.

''आंबा कसा पडतो ?''

झाडावरच्या आंब्याची **स्थिती**
फेकलेल्या दगडाची **गती**
फेकणाऱ्या मुलाची **मती**
यांची होते **युती....**
**... आणि आंबा पडतो.**

''समृध्द मराठी''

मराठीचा इतिहास किती समृध्द होता, याचेच उदा. रघुनाथ पंडित यांच्या या अटितटीच्या काण्यातुन दिसुन येते. श्रीकृष्णाच्या वनभोजनाचे वर्णन करतांना ते म्हतात.

वंशी नाद नटी । तिला कटी तटी ।
खोओनी पोटी पटी ॥
कक्षे वाम पुटी सप्तश्रृंग निकटी ।
वेताटी ही गोमटी ॥
जेवी निर तटी करु तळवटी ।
श्रीश्याम देही उटी ॥
दाटी व्योम घटी सुरा सुखलूटी
घेती जरी धुर्जटि ॥

**हृषीकेश अ. सकळकळे**
एफ.वाय.बी.कॉम.




मेधा इनामदार – एम.ए. ज्युनि. [मानसशास्त्र]

# मेरे सपनों का भारत

**दिपक चव्हाण**, एम्.कॉम. सिनिअर

आज भी भारत की महानताकी जितनी तारिफ की जाए उतनी कम है। लेकीन कभी हमने सोचा है ? आज हमारे भारत की महानता वही है ? जो कल थी, क्या है इसका जवाब। दंगा- फसाँद, खूंन खराबा या किसी नेता की हत्या ? इसका जवाब कदापि नही हो सकता।

इस देश की आजादी के लिए कई क्रान्तिकारोने अपना बलिदान किया भगतसिंग, राजगुरु, बहादुरशहा जफर, तथा झाँसी की रानी जो एक महिला होते हुए भी मरते दम तक रणभूंमी मे लढती रही। आज अपना देश आजाद होते हुए भी हम देश को क्या दे रहे है ? यह प्रश्न देश की वर्तमान परिस्थीती की और ही लक्षीत है।

कब तक चलेगा यह दंगा- फसाद, कब तक बहती रहेगी, यह खून की नदीयाँ, कब तक ऐसी अशांती फैली रहेगी ? ऐसा किसी धर्म मे या मजहब में नही लिखा कि आपसमें लड झगडकर दंगा-फसाद करना चाहिए।

हम भारत वासी एक ही छत के निचे पल रहे है। उस छत पर पहलेही समस्याँओंका पहाड खडा हैं। जैसे- काश्मिर प्रश्न, अयोध्या मंदिर-मस्जिद प्रश्न, बेरोजगारी, महंगाइ इसी तरह हम आपसमे लड-झगडते रहे तो यह जटील समस्याओंका पहाड हमपर टूट पडेगा परिणाम स्वरुप हम सब मारे जाएगे और कोई विदेशी आकर फिरसे इस देश पर राज करने लगेगा।

एक तरफ कहा जाता है हिन्दु, मुस्लिम, सिख ईसाई सब है भाई भाई। फिर दुसरी तरफ यह दंगा- फसांद क्यू होता है ? इसका जवाब हर एक के पास है लेकिन कुछ लोग सच बोलने वाले का गला दबा देते है, तो कुंछ लोग अच्छे इन्सान की बुराईया निकालनेपर तुले होते है। ऐसे राक्षसोने युवाँओके हाथ पाँव जकड रखे है और मुह बांध रखा है। युवक अत्याचार होते हुवे देख सकता है लेकिन बोल नहीं सकता। इस मजबुरी का दुसरा कारण अच्छा कार्य करने का बिचार, परंतुंवह कार्य विपरित होने का डर बदलेमें समाज के मुंह से अपनी बदनामी सहने की भावना है। परिणामतः कई समस्याँओंसे संघर्ष करना पडता है। लेकीन जब पृथ्वी के अंदर जादा गर्मी हो जाती है तब ऐसी गर्मी एक दिन लावा बनकर फूट पडती है। इस तरह एक दिन युवाँओंके मुंह से ज्वाला मुखी बाहर निकल सकता है। जो पुकार -पुकार कर कहेगा, ''आज तक जा अनर्थ हुंवा वो सब सडी गली गंदी राजनिती का दुष्प्रभाव था और अब भविष्यमें ऐसा कदापि नही होगा।''

लेकिन प्यारे युवाँ मित्रों, यह ज्वाला मुखी हिंसा के रुप में प्रकट न हो तो और भी अच्छा होगा हमें उन दृष्ट लोगों को खत्म नही करना है जो यह दंगा-फसाँद करते हैं या कराते है। हमें उनके अंदर छूपे हुए शैतान को खत्म करना है। इसका मतलब खुन का बदला खुन

# स्नेह संमेलन



उद्घाटन - डॉ. अण्णासाहेब बेंडाळे




प्रमुख पाहुणे- श्री. दिलीप श्रीराव

नही। इसका मतलब है इस समस्याँ के स्थायी हल ''मै सिर्फ एक इन्सान हूँ मेरा पहला कर्तव्य है इन्सानियत को जगाना और समाजकी उन द्दष्ट प्रवृत्तीयों को मिटाना अगर यह सिध्दांत हर युवक ठान ले और मन में सद्‌भावना का विचार लिए आगे बढे, तो उन सभी युवाँओंमें एकता निर्माण होकर भारत की महानता का आज के निराशा के दौर मे पहला सफल कदम हो सकता है।

हमारा दुसरा कदम उठता है। द्दष्ट राजनिती का अंत करने की और चाँहे हम किसी की हालत से गुजरत हों। हमें उन द्दष्ट राजनितीत बातों में नही आना चाहिए जो राजनिती ''और मजहब'' का हत्यारे लेकर हमें आपस में लडाती है फलस्वरुप ऐसे द्दष्ट राजनिती का अंत अपने आप हो जाएगा।

अगर मन में है तो जरुर मिलेगी राह। जिस दिन ऐसा जाएगा उस दिन हमारा संपूर्ण भारत हँसता - खेलता, सुखी समृध्द और पृथ्वीपर स्वर्ग से सुंदर होगा।

आओ. ऐसे समृध्द खंश हाल भारत के निर्माण के लिए हम सब भारत वासी कटिबध्द हो जाये।

## ''खेल सुख-दुःख का''

अय जिंदगी<br>
तूम क्यो उदास हो !<br>
मेरे दुःख से<br>
तूम क्यों नाराज हो ?<br>
इस दुःख भरे सागर के<br>
किनारेको क्या मै<br>
अकेला पथ्थर हूँ ?<br>
जिसकी लहरे<br>
क्या मुझ अकेले से<br>
टकराती है ?<br>
हाँ !<br>
पर इसमे भी मुझे<br>
जीनेका मजा आता है।<br>
जब बाढ आती है।<br>
तब आती हुईं लहरों कों<br>
छातीपर झेलकर<br>
सामना करती है लहरोंका<br>
ताकी हारकर वह पिछे<br>
जाती है। जमानेसे मुडके<br>
तो मै सुख पाता हूँ<br>
लेकिन यह सुख-दुःख का खेल<br>
कितने दिन चलेगा ?

**सुनिल तायडे**<br>
टी.वाय.बी.ए. (हिंदी)

# उपलब्धिका रहस्य-अनुशासन

कु. किर्ती शांतिलाल जैन, एम.ए. हिन्दी

प्रत्येक व्यक्ति अपने जीवन में कुंछ बनना चाहता हैं। वह अपने सपने सजाते रहता है, हर सक्त कुछ पाने की कोशिश करते रहता है पर इसके लिये उसे अपने जीवनपर अधिकार प्राप्त करना होगा। जिसकी एकमात्र कुंजी ''अनुशासन'' है उसका स्वीकार करते है। तो कई लक्ष्यो को ना भी कहते है अगर हमे कोई पुरस्कार पाना है तो उसका मूल्य भी चुकाना होता है। जैसे किसी पुरंस्कार का रुप ''हॉं'' मे होता है तो मूल्य का रुप ना एक इगोर नामक गायक ने अपने संगीत सीखने के आरंभिक दिनों के बारे में बताये कि उनको सीखने के आरभिंक दिनो के बारे मे बताये कि उनको पाईप पिने का शौक था तो उनेके टिचर ने कहा इगोर तुम्हे निश्चय करना होगा कि तुम महान संगीतज्ञ बनना चाहोगे या प्रसिध्द पाईप पिने वाला, तुम दोनो नही बन सकते'' तब से उन्होने पाईप हमेशा के लिये छोड दिया जिससे उन्ही संगीत की, उपाधि मिली, स्वास्थ भी अच्छा रहा इस तरह हम देखते है की कुछ पाने के लिये कुछ खोना भी पडता है। इसी बारे में मेंनशिस ने कहा था ''मनुष्य को पहले यह निश्चीत करना चाहिये कि वह क्या नही करेगा तभी वह जा करना चाहिये उस पर संपूर्ण शक्ती लगा पायेगा।

कई बार तो ऐसा होता है कि हम किसी कार्य का आरंभ तो कर देते शक्ति होती जिससे यह कार्य पुरा हो सके जिसके लिये हमें बहूत मूल्य चकना होता है वह है ''अनुशासन'' कहा जाता है कि कार्य आरंभ करने की कला उत्तम है किंतु उसे पूर्ण करने की कला सर्वोत्तम है। जैसे हमारे सुप्रसिध्द क्रिकेट खिलाडी कपिल देव ने यह स्पष्ट ही कर दिखाया है इसी तरह एक पियानो वादक का पियानो प्रदर्शन सुनकर एक प्रशंसक ने कहा- ''ऐसे संगीत के लिये मै अपना पूरा जीवन न्योछावर कर दूंगा। इस पर पियनो वादक ने काह मैने यही तो किया है। यहा हम यह नही कह सकते की हम सभी अनुशासन द्वारा पियानो वादक बन सकते थे। पर अवश्यही हम किसी लक्ष्य को प्राप्त कर सकते है। आवश्यकता है शर्त है केवल दृढ संकल्प की।

कभी-कभी हम रोजाना घटनेवाली घनाओं को भी ले सकते है। जैसे कभी हम रात टी.व्ही. पर आनेवाला मनपसंत कार्यक्र न देख जल्दी सो जाना चाहते है। ताकी अगले दिन सुबह कॉलेज जा सके इसी तरह हमारे जीवन के सुख और दु:ख की ऐसी समायोजना जिसमे सुख को पाने के लिये हपले दू:ख से टकराकर उसे झेलना और उसपर विजय पाना होता है पहले कुछ त्याग करना होता है बाद मे उसका फल हमे मिलता है।

अमेरीकन मानसशास्त्रज्ञ एलिसाबेथ

हरलोक ने कहाँ है ''हमारे विकास में गति उत्पन्न करने वाली प्रक्रिया अनुशासन कहलाती है।''

अनुशासन के बारेमें यह दुर्भाग्य ही होगा कि हम अनुशासन का नाम सुनते ही दुःखी हो जाते है। हमे लगता है हमे हमारी स्वतंत्रा से दूर रखा जा रहा क्योंकि हमे यह अनिवार्य एवं दडात्मक लगता है। जैसे कोई सक्त प्राध्यापक है जो हमारा पिछा कके हमे नियमों का पालन करने को कहते वे परिक्षा आदि मे भी कोई नरम रुखान अपनोये तो हम उन्हे भला बुरा कहते है। परंतु यह तब तक ही होगा जब तक ही होगा। जब तक हम अनुशासन को आत्मसुरक्षा के रुप में समझा लेगे ना की आत्मतिरस्कृत के'' तब हम किसी को भला बुरा हिन नही समझेंगे बल्की उसे अपनायेंगें।

अनुशासन के प्रति अन्य बात यह है कि अनुशासन को कभी कठोर नही समझाना चाहिये. ''परपूर्णता को लक्ष्य बनने की बजाय आत्म शांती को लक्ष्य मानना आधि उचित होगा जो आत्म सेंयम से ही मिलती है किसी भी कार्य के आरंभ में हम कष्ट हो सकते है पर सचा अनुशासन संतुलन ''आत्म विकास'' बठाता है न की परिश्रम इसलिये आवश्यक यह है कि अनुशासन को भी अनुशासित करने की जरुरत होती है।

अनुशासन के लिये परिस्थीतीयो के अनुसार व्यवहार बदलेने की बीती भी होनी चाहिये व्यकती हर वह क्या नही कर सकता है ? के स्थान पर वह क्या नही कर सकता है ? यह सोचे तो अधिक योग्य होगा एक अमेरीका गोल्फ नही कर सकता है ? यह सोचे तो अधिक योग्य होगा एक अमेरीकी गोल्फ चँपियन जो १७ बार चॅपियन बन चूका है पर अपनी दृष्टी खो बैठा है कहता है की ''जो मे खों चुका हू उसे नही गिनता, जो मेरे पास है उसे गिनता हूं।

बहूत बार हम कोइ काम पूर्ण करना पसंद नही करते और उसे अधुरा छोड देते है लेकीन हम उसीमें लभगे रहे तो खों जाते है इसलिये हम कह सकते है। कम पहले आता है प्रेरणा नही हमे शुरुआत करनी होगी, अगर हम प्रेरणा का इंतजार करते रहे तो जीवन भर इंतजार ही करते रहेंगे। इस बात से मुझे स्कूल के दिन याद आते है जब स्कूल जाना होता था तो मा की आवाज आती ''उठने का समय हो गया'' और मे बिस्तर पर उसी आखरी क्षण तक पडी रहती जब तक मा सयंम न खो दे फिर मै कॉलेज के लिए दूर चली गई तो मुझे अपने आप उठना पडता आखिर उठने जानेसे उब कर यह निश्चित किया की अलॉर्म बजते ही मै उठ जाउँगी क्यूं की जैसा भी हो मै जल्दी उठना चाहती थी जो आज मै बिगर अलॉर्म के भी उठ सकती हूं। यह अनुशासन आज तक काम आ रहा हैं।

इसतरह अनुशासन एक तो स्वयंचलित होता है दूसरों के लिये द्वारा बनाये हूये इसके लिये कोई हूकूमशाही प्रवृत्ती का अवलंब कर सकता है तो कोई लोक तंत्र पर यह निश्चित है की, अनुशासन की आदत डालनी पडती।

यह छोटी सी आदत बडी लाभपद सिध्द होती है इसे हम स्थिरता पर विजय पाकर मानसिक संतूलन की चरणसीमा पर पहूँच सकते है। इस तरह अगर हम प्रत्येक महा पुरुषों की उपलब्धीओंके बारे में सोचे तो हमें इसका रहस्य अनुशासन के रुप में ही मिलता है।

## सीमा की बेवफाई

क्या सुनावूँ मै
मेरे प्यार की दॉस्ता
दिलके बगियनमे खिला था
एक जिवनका गुलदस्ता
जिस प्यार को मैने अपनी हाथोसे
सजानेका देखा था सपना
उस प्यार ने कॉटा बनके
गला घोट दिया अपना
वो प्यार तो गैर था
अपनोने भी साथ छोड दिया
बडे ही प्यार से
मेरे अरमानोको लुट लिया।
छोड दिया है मुझे तुमने,
जिस आग मे जलने के लिये
उस ऑग की चिगांरी न पहुँचे तुम तक
दुवाँ करुंगा मै तुम्हारे लिये।
दर्द भरी कहॉनी थी
यह मेरे सचे प्यार की
लेकीन इसमे मेरा क्या कसुर था
यह दॉस्ता थी मेरी सीमा के बेवफाई की।

**सुधीर प. केने**
तृतीय वर्ष कला अर्थशास्त्र

## 'वह .... मेरा साया !'

जहाँ मै जाती हूँ, मेरे साथ चलता है वह,
मैं जिधर भी देखती हूँ, मेरे साथ रहता है वह,
मेरे हर गम में मेरा साथ देता है वह,
मेरी हर खुशीमें खुशी से झूमता है वह,
अगर मै कभी चूँक जाऊ,
तो मुझे राह दिखाता है वह,
दूसरां तिसरा कोई नही, सिर्फ मेरा साया है वह,

**स्वाती बोंडे**, तृतीय वर्ष (शास्त्र)

## गजल

रास्ते कठीण है मंजिल का कहीं पता नही
मुझ को है शौकवजूस्तूजु
राहीबर का पता नही

इस राहपर फुल हैं कम, कॉटे हैं जा-बजा
पॉव जखमी हैं
और हमसफर का पता नही

मतलबी दुनियाँमे है ऐसे बहोंत कम लोग
बेलुस मुहोब्बत जो करे,
बनावट का पता नही

सारे शहर के लोग आये हैं मय्यतपे मेरी
जिन के लिये थे मरे,
उन का कही पता नही

हर घर में आज चलता हैं वी.डी.और टी.व्ही.
कुरऑ भी हर घर में है
इमान का पता नही,

**अ.रशिद अ. करीम**
एफ.वाय.बी.ए.



## "हर पल"

हॉंटो पर हँसी अपने सजाएँ रहे हर पल
पर फासला लोगो से बनाए रहो हर पल
कब जाने मुसाफिर कोई थक-हार के लौटे
पलकों पर नये दीप सजाए रहो हर पल,
चुभते हैं जो काँटे तो चुभे पाव में लेकिन
होटों पर कँवल अपने खिलाएँ रहो हर पल
ऐसा न हो राह राह कोई तारिखी में भटके
ऐ-शमा सरे राह जलाएँ रहो हर पल

**रुहीना तबस्सुम खान**
एम.एस्सी. (ज्युनि.)

## "औरत"

फुल खुशबु बहार है औरत
जिदंगी की निखार है औरत
देखने वालो उस की कदर करो
एक हुस्न शहाकार है औरत
उस से कायम है कारोबारे हयात
आबरु-ए-बहार है औरत
माँ की ममता खुलुस बीवी का
मौनीस गम गुसार है औरत
उस की पाकीजगी को पहचानो
दिन की पासदार है औरत
जुल्म सहकर भी उफ नही करती
किस कदर बाविकार है औरत
उस की अजमत को मत पुछो
शैनक रोजगार है औरत,

**रुहीना तबस्सुम खान**
एम.एस्सी. ज्युनि.



## जिदंगी

जीना अपाहीज का मैं जी रही हूँ।
टूटीं हुयी जिदंगी को जोड रही हूँ।
जिसमें खुदका कोई नक्श नहीं
उस तस्वीर में रंग भर रही हूँ
जिदंगी क्या इसी को कहते हैं।
ये नूर कैसा है, राख का सा रंग पहने
गुंगी चाहत है ऊसवाई का कफन पहने
जिदंगी क्या है कभी सोचने लगती हूँ
मैं जिदंगी को देती रही अपना खूँने दिल
मग खुद मेरी जिदंगी ने मुझे क्या दिया
जिदंगी यह है तो फिर मौत किसे कहते है।

**कु. सुरेखा शिवरामे**
एम्.ए. अर्थशास्त्र

## सहेली

ओ मेरे दिल की रानी
आँसमान सा दिल रखनेवाली
सलामी तुझे मेरी प्यार भरी
दिल्लगी के राहों की रानी है तू
है कमल तू झील का
चाँद है तू आसमाँ का
है चाँद की तू चांदनी
दिल सी सहेली जब पायी
सागर सी प्रीत भी साथ मिली
क्या ये प्यार का कोई ख्वाब तो नही?
उस ख्वाब की तू ताजीर ना पूछ
क्या मिली प्रीत की
उस प्रीत की ताबीर ना पूछ
सोचती हूँ वह सावन पाया
जिस में पूरवाईयाँ चलती है
लेकिन कभी ऐसी बरसात ना आये
जो मेरे आँसू भी लूट जायें

**कु. सुरेखा शिवरामे**, एम.ए. अर्थशास्त्र

## मौत की खूबसूरती

मुझे मौत से प्यार है, मुझे मौत से प्यार है
सचमुच ये मौत बड़ी खूबसूरत है॥धृ॥
मंजिल है ये हर जिंदगी की
चाहत नये सपनो की
दिवानगी है ये दिवानोंकी
सचमुच ये मौत बड़ी खूबसूरत है॥१॥
सखी है ये, प्रिया है ये
आसुओं में रंग मिलाकर होली खेलने वालों की
सौगात नयी जिंदगी की
सचमुच ये मौत बड़ी खूबसूरत है॥२॥
इनाम है ये प्यार का
किमत है आसुओं की
क्या कहूँ उसकी नशिली अदा की
सचमुच ये मौत बड़ी खूबसूरत है
वफा है इसका नाम
बेवफाई नही करती किसी जिदंगी के साथ
मौत होते हुये भी जिदंगी है इसका नाम
सचमुच ये मौत बड़ी खूबसूरत है
मुझे मौत से प्यार है ! मुझे मौत से प्यार है!

## बेदर्दी दुनिया

दुनियाने मुझको इतना दुख दिया
फिर भी मैंने उसको दिल में छुपा लिया
दुनिया ने मुझको तडफते हूए देखा
किसीने भी मुझको अपना ना बनवा
दुनिया ने मुझको शेते हूए देखा
किसीने भी मेरे आँसू नही पोंछे
कितनी जालीम थी तो दुनिया
जिसने मुझे दिवाना समझकर ठुकरा दिया
मैंने दिल की मुबारक कली को चुना था
मगर दुनिया ने उसे भी मिलने से मजबूर किया
इस मासुम दिल को नही था मालूम
कि मुस्कराने से पहले रोना भी पडेगा।

**परदेशी रमेश माधव** टी.वाय.बी.ए. [राज्यशास्त्र]

## याद

तुम्हारे याद में खोये खोये से रहते हैं
उसी के सहारे कविता लिख लेते हैं

तुम क्या जानोगी हाल मेरे दिलका
प्यार के गम में हम कैसे जीलेते हैं

जब भी आथी है याद तुम्हारी
तो हम हवासे बात कर लेते हैं।

तुम तो खूश होती छोडकर हमे
हम तो तुम्हारी याद के सहारे जी लेते है

पल्कों को आपकी राह में मिलाकर
अपने लबों को हम सी लेते हैं

**विलास गूंजाळ**
तृतीय वर्ष कला (इंग्रजी)



# The Will to win

Miss Rekha K. Varyani, S.Y.B.Sc. (A)

There is a little jingle which sports coaches used to be very fond of repeating when their charges failed to win top honours.

"But when the one great scorer comes,
To write against your name,
He writes not that you won or lost
But how you played the game"

It is true that sportsmanship-playing a clean game in the spirit of the game is a very praise-worthy attribute, but this by itself is not enough today. Discipline & determination, expertise and a physique finaly honed to the most trying tests, coupled stamina & a deep regard for national honour are the vital elements that make up today's olympic champion.

कु. फालक माधुरी मधुकर हिच्या कौशल्यामुळे तिची उत्तर महाराष्ट्रविद्यापीठ संघामध्ये निवड करण्यात आली.

३) आंतरमहाविद्यालयीन वैयक्तिक स्पर्धामध्ये जाधव मुकेश बबन, भावसार अतुल रमेश, बडगुजर लालचंद वासुदेव हे स्पर्धक विजयी होऊन त्यांचा जळगांव विभागाच्या संघात समावेश झाला. त्यापैकी जाधव मुकेश बबन हा जळगांव विभागातही विजयी झाला.

**४) टेबल टेनीस (मुले)** यांचा संघ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत विजयी झाला असून गंगराळे हिमांशू, विक्रम पवार, मुल्ला हुनेद इसाक या ३ खेळाडूंची जळगांव विभाग संघासाठी निवड करण्यात आली. त्यातील विक्रम पवार व गंगराळे हिमांशू यांच्या नेत्रदिपक खेळामुळे त्यांची विद्यापीठ संघात निवड करण्यात आली.

**टेबलटेनीस मुली** यांचा संघ पराभूत झाला. परंतु कु. ललिता गोविंदा हर्डीकर हिच्या कामगिरीमुळे तिची जळगांव विभागाच्या संघात निवड झाली. तेथेही तिच्या असामान्य आक्रमक खेळामुळे तिची उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघात निवड करण्यात आली. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघाने सुध्दा बरीच मजल मारली. त्यात ललीताचा मुख्य वाटा आहे. तसेच ती अखिल भारतीय टेबलटेनीस महिला खेळाडू आहे.

**५) कबड्डी** = या खेळाच्या पावसामुळे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा होऊ शकल्या नाहीत. परंतु निवड चाचणीमध्ये १ निळकंठ प्रल्हाद खडके व २ संजय यशवंत कोल्हे

या दोघांचा जळगांव विभागाच्या संघामध्ये समावेश झाला. त्यात निळकंठ प्रल्हाद खडके यांच्या आक्रमक चढायामुळे त्याची उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघात निवड करण्यात आली.

६) **बॅडमिंटन – मुले** = आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत विजयी होवून अतुल देशपांडे व विनीत जोशी, श्रीधर गाडगीळ यांची जळगांव विभाग संघाकरिता निवड झाली. तसेच त्यांच्या अतुलनीय खेळामुळे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघात अतुल देशपांडे व विनीत जोशी यांची निवड करण्यात आली.

**बॅडमिंटन = मुली** – आंतर महाविद्यालयीन स्पर्धामध्ये आपला संघ विजयी असून कु. प्रिती रडे व वैशाली बाविस्कर यांचा जळगांव विभागाच्या संघात समावेश होऊन त्यातून कु. प्रिती रडे हिची उ.म.वि.च्या संघात निवड झाली. परंतु काही कारणामुळे हा संघ पुढे खेळावयास जाऊ शकला नाही.

७) **बुध्दीबळ** = या संघाला आंतरमहाविद्यालयीन स्पर्धामध्ये अपयश आले परंतु स्वत:च्या खेळामुळे विजय पांडुरंग महाजन यांचा जळगांव विभाग संघासाठी निवड करण्यात आली.

**कुस्ती** : संजय पाटील व रोहीत निकम यांच्या नेत्रदिपक कामगिरीमुळे त्यांची जळगांव विभाग संघासाठी निवड करण्यात आली. पैकी रोहीत निकम याची उ.म.वि. संघात निवड करण्यात आली.

८) **वजन उचलणे** : यात संजय यशवंत कोल्हे याची उ.म.वि.संघात निवड झाली. परंतु हा संघ पुढे खेळावयास गेला नाही.

विजयी व उपविजयी खेळाडूंना मा.डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे यांचे शुभहस्ते प्रमाणपत्र, सन्मानचिन्हे व विद्यापीठ खेळाडूंना महाविद्यालया तर्फे ट्रॅकसूट विशेष भेट म्हणून देण्यात आलेत.

जिमखान्याचा अफाट कारभार हाताळण्यासाठी आमचे प्राचार्य डी.एस.नेमाडे उपप्राचार्य डी.एच. महाजन, उपप्राचार्य एम.के. येवले, उपप्राचार्य पी.एल. कोल्हे तसेच माझे सहकारी मित्र पी.डी. तळेले व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या सर्वांचे आभार



# मु.जे. (ज्युनिअर) महाविद्यालय

## जिमखाना अहवाल १९९३-९४

प्रा.पी.डी. तळेले, क्रीडा प्रमुख

सन १९९९३-९४ शैक्षणिक या वर्षात तालुका पातळीवरील स्पर्धासाठी आपल्या महाविद्यालयाचे ९ संघ पाठविण्यात आले. सदरच्या स्पर्धामध्ये मुले व मुली मिळून ९९ खेळाडूंचा सहभाग झाला. सदर संघाचे व खेळाडूचे यशा-अपयशाचे विवरण खालील प्रमाणे.

### सांघीक खेळामध्ये
### तालुका पातळीवरील यश- अपयश

| संघाचे नांव | |
|---|---|
| १) बुध्दीबळ मुले — | विजयी |
| २) बुध्दीबळ मुली — | विजयी |
| ३) टेबलटेनीस मुले — | विजयी |
| ४) टेबलटेनीस मुली — | विजयी |
| ५) कबड्डी मुले — | पराजीत |
| ६) बॅडमिंटन मुले — | विजयी |
| ७) लॉन टेनीस मुले — | विजयी |
| ८) बास्केटबॉल मुले — | उपविजयी |
| ९) फुटबॉल — | उपविजयी |

अॅथलेटीक्समध्ये = तृप्ती भावसार, स्नेहल खंदार ह्या विजयी झालेल्या आहेत. पोहणे ह्या स्पर्धा तालुका पातळीवर होत नाहीत. तालुका पातळीवरील विजेते संघ व वैयक्तिक प्रथम व द्वितीय खेळाडू जिल्हा पातळीवर खेळावयास जातात. त्यांचे जिल्हा पातळीवरील कर्तृत्वाचे विवरण खालील प्रमाणे....

एक मुलींचा टेबलटेनीस संघ वगळता सर्व संघांना अपयशच आलेले आहे. मात्र वैयक्तिक खेळाडूमध्ये कु. स्नेहल मधुसुदन खंदार २०० मिटर धावणे या स्पर्धेत विभागीय पातळीवर द्वितीय येऊन राज्य पातळीवर जाण्याचा मान मिळविला आहे. तसेच तृप्ती पुरुषोत्तम भावसार ही १०० मिटर हर्डल्समध्ये जिल्हा पातळीवर द्वितीय येऊन तिची विभागीय पातळीवर निवड करण्यात आली.

मुलींच्या टेबलटेनीस संघ विभागीय पातळीवर खेळावयास गेला, तेथे गंधा प्रकाश दप्तरी, आशा सुहास नाईक, भावना विजय जोशी यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करुनही उपविजेते पदावर समाधान मनावे लागले. मात्र गंधा प्रकाश दप्तरी हिच्या अतुलनीय, आक्रमक, लोभनीय खेळामुळे तिची राज्य पातळीवर निवड चाचणी करीता निवड करण्यात आली.

पोहोणे - १०० मिटर पोहोणे या स्पर्धेत सराफ पियुष शिरीष कुमार हा खेळाडू जिल्हा पातळीवर प्रथम येवून त्याची विभागीय पातळी करीता निवड करण्यात आली.

उल्लेखनीय कार्य म्हणजे राहूल रनाळकर मागील वर्षी हा विद्यार्थी मुंबई समुद्र किनारपट्टीत सी रॉक ते गेटवे ऑफ इंडीया हे ५ कि.मी. अंतर कापून स्पर्धेमध्ये प्रथम प्रथमच भाग घेणाऱ्या स्पर्धकामध्ये प्रथम आला. ह्या वर्षी सुध्दा ४०० मिटर फ्रीस्टाईल या स्पर्धेत राज्यपातळीवर खेळावयास गेला. पण तेथे ५ व्या क्रमांकावर राहीला.

वर्षभराच्या कामकाजामध्ये प्राचार्य डी.एस. नेमाडे, उपप्राचार्य डी.एच.महाजन उपप्राचार्य एम.के. येवले, उपप्राचार्य पी.एल. कोल्हे, प्राध्यापक मित्र वर्ग व इतर क्रिडा रसीक यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल १९९३-९४

सन १९९३-९४ च्या शैक्षणिक वर्षात रा.से.योजनेच्या कार्यक्रमाचा शुभारंभ दि. २८ जुलै रोजी मा.प्राचार्य, डी.एस.नेमाडे यांच्या उदबोधनपर भाषणाने झाला. उद्बोधनपर भाषणात मा.प्राचार्य, यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दीष्टे, महाविद्यालयाचा रा.से.योजनेच्या विद्यार्थीकडे पहाण्याचा दृष्टीकोन योजनेचा नविन उपक्रम या विषयी सूचना व मार्गदर्शन केले.

**रौप्य महोत्सवी वर्ष :** हे शैक्षणिक वर्ष रा.से.योजनेचे रौप्यवर्ष या निमीत्ताने भारत सरकारने राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विविध कार्यक्रमाअंतर्गत युवकांचे व्यक्तीमत्व विकास, श्रमसंस्कार सामाजिक जाणिव जागृती, व्यसनमुक्ती, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संतुलन इ. अनेक उपक्रम राबवण्याचे ठरवलेले होते. या युनिटचे भुकंपग्रस्त मदत निधी, परिसर पर्यावरण संतुलन दत्तकग्राम व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरातून वृक्षारोपण व संगोपन, शिबीराच्या कालावधीत श्रमसंस्कार, ग्रामीण विकास रक्तदान इ. उपक्रम राबवून रौप्यमहोत्सवी वर्ष उत्साहात साजरे करण्यात आले.

**भूकंप मदत निधी :** राष्ट्रीय सेवा योजनेतील गृप लिडर्स व महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील स्वयंप्रेरित विद्यार्थी यांनी मराठवाड्यातील भुकंपग्रस्त लोकांच्या मदतीसाठी गोलानी मार्केट येथे निधी संकलन केंद्र स्थापन केले होते. या निधी संकलन केंद्रात जळगाव शहरातील व एरंडोल तालुक्यातील ग्रामिण जनतेने व स्वयंप्रेरणेने, रोख रक्कम धान्य औषधी कपडे, भांडी इ. साहित्य भूकंपग्रस्त जनतेला मदत केली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी १८००० रुपये रोख रक्कम १३ पोते धान्य, कपडे व औषधी जमवून ती मदत मा.प्राचार्य, यांच्याकडे सुपूर्त केली. हा निधी भूकंग्रस्त जनतेसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे देण्यात आला. रा.से.योजनेचा प्रतिनीधी श्री. अनिरुध्द सकळकळे याने भुकंप परिसरात जावून भूकंग्रस्त जनतेला प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मदत केली.

**परिसर पर्यावरण संतुलन :** महाविद्यालयाच्या परिसर, दत्तक ग्राम कानसवाडे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरात पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने वृक्षलागावड व संगोपन कार्यक्रम हाती घेण्यात आला. उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ परिसर बांभोरी येथे मुख्यमंत्री मा.शरद पवार व मा. बाळासाहेब चौधरी यांच्या हस्ते सदभावना वनात कडुलिंब, काशिद, गुलमोहोर, चिंच आप्टेलयीन बाभूळ इ. २००० झाडाची लागवड व संगोपनाचा विशेष कार्यक्रम यावर्षात राबवण्यात आला. मा.डॉ. साळवे, डॉ.ढेकणे, मा.श्री. सी.टी. पाटील विद्यापीठ अधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपणास प्रारंभ करण्यात आला. शिबीराच्या कालावधीत व नियमित कार्यक्रमात झाडांना पाणी देणे व संगोपन इ. कार्यक्रम राबविण्यात आले. कानसवाडे येथील सार्वजनिक जागेवर गेल्या वर्षी वृक्षारोपण केलेल्या झाडाची निगा राखण्यात आली. या कार्यात या विकासभाउ सोनवणे, सरपंच व ग्रामस्थाचा विशेष सहभाग व सहकार्य लाभले.

परिसर पर्यावरण संतुलनात गाजर गवत निर्मूलन मोहिम हाती घेण्यात आली. महाविद्यालय परिसर व सभोवतालच्या परिसरातील गाजर गवत निर्मूलन मोहिम सलग तीन एकदिवशीय शिबीरात राबवण्यात आला.

**श्रमसंस्कार उपक्रम :** महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनींना श्रमदानाचे महत्त्व

# एन.सी.सी.

## विद्यार्थी-विद्यार्थीनी

या वर्षी आपल्या महाविद्यालयातील २६६ विद्यार्थी व ५४ विद्यार्थीनींनी १९९३-९४ मध्ये ''एन.सी.सी. चे लष्करी प्रशिक्षण उत्तम प्रकारे पूर्ण केले. एन.सी.सी. च्या वेगवेगळ्या विषयाबरोबर वृक्षारोपण, प्रौढशिक्षण, रक्तदान, भूंकपनिधी, ट्राफीक कंट्रोल, सद्भावना दिवस, सर्वधर्म समभाव रॅली, राज्यपालाच्या आगमनाचे स्वागत, विद्यापीठाच्या भूमिपूजनाच्या वेळी छात्रसैनिकांचे स्वयंसेवकांचे कार्य, खेडी कढोलीच्या ग्रामस्थान परिवार कल्याण, स्वच्छतेचे महत्त्व, इत्यादी कार्यक्रमामध्ये विद्यार्थी-विद्यार्थीनींनी वरील कार्यक्रमात सहभाग घेवून वरील सर्व कार्यक्रम चांगल्या रितीने पार पाडले. छात्रसैनिकामध्ये खेळाडू वृत्ती यावी म्हणून व्हालीबॉल, बास्केट बॉल, फूटबॉल व बॅट मिंटन इत्यादी खेळाच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात उल्लेखणीय बाब म्हणजे एस.यू.ओ. विलास बोंडे, एस.यू.ओ. रविंद्र ठाकूर, एस.यू.ओ. रोहीत शर्मा, जे.यू.ओ. संजय चौधरी, व सी.पी.एल. विजय भालशंकर, तसेच एस.यू.ओ. रविंद्र चौधरी इत्यादी छात्रसैनीकांनी खेळांमध्ये विशेष प्राविण्य दाखविले. यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थीनींना जिल्हा अधिकारी श्री. अजय भूषण पांडे यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.

अमरावती येथे ग्रूप कॅंप करीता (आर.डी.सी.व बी.एल.सी.) कॅंपचे निवड झाले होते त्यात अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या व दिल्ली येथे बी.एल.सी. कॅंप करीता जे.यू.ओ. संगीता कलकोंडा व जे.यू.ओ. सर्वानंद कुकरेजा जावून आले. तर विद्यार्थीनीचा आर्मी ॲटेच्मेंट कॅंप पूणे येथे झाला. त्यात एस.जी.टी. वैशाली बावीस्कर सहभागी झाली तीला गोल्ड मेडल मिळाले. विद्यार्थ्यांच्या ''आर्मी'' ॲटेच्मेंट कॅंप कामठी येथे झाला त्यात जे.यू.ओ. मनोहर वाघ, किशोर पाधे, विनोद भावसार, प्रविण घुगे भूषण सुर्यवंशी, दिपक सपकाळे, अजय वर्मा, इत्यादी सहभागी झाले. त्यात मनोहर वाघ व इतर छात्रसैनिकांनी विविध तऱ्हेचे प्रशिक्षण घेतले. तसेच, ''ऑल इंडीया ॲडव्हॉन्स लीडरशिप ''कॅंप'' अहमदनगर, शिलॉग येथे झाला. त्यात आपल्या महाविद्यालयातील ''अंडर ऑफीसर'' संजय चौधरी व सुनिल दामोदरे, उमा रामलिंग्या व मलीका कलकोंडा इत्यादी छात्रसैनिक सहभागी झाले होते त्यात अंडर ऑफीसर संजय चौधरी याला ''बेस्ट लिडर'' (महाराष्ट्र) निवडण्यात आले. यू.ओ. सुनिल दामोदरे यांनी ''रनिंग'' मध्ये प्रथम क्रमांक चे बक्षिस पटकवीले. विद्यार्थ्यांचा एन.आय.सी. कॅंप सेलम (मद्रास) तर विद्यार्थीनींचा तामीलनाडू येथे झाला. एस.यू.ओ. रोहीत शर्मा, एस.जी.टी. नितीन पाटील, नरेश रडे, शेखर जगताप, श्वेता समदानी, आणि निलीमा पाटील, सहभागी झाल्या होत्या. त्यांना सांस्कृतीक कार्यक्रम व क्विझ मध्ये बक्षीस मिळाले. रॉक क्लायमिंगचा कॅंप त्रिवेंद्रम येथे त्यात एस.यू.ओ. विलास बोंडे, दिपक अमृतकर, संजीव अबोटी, व सुधाकर ठोके, यांची निवड करण्यात आली होती.

या वर्षी विद्यार्थीनींचा अे.टी.सी.कँप अमरावती येथे झाला त्यात वैशाली बावीस्कर, व मल्लीका कलकोंडा यांनी विशेष प्रावीण्य मिळवीले तर विद्यार्थ्यांच्या अे.टी.सी.कँप नशिराबाद येथे झाला त्यात आपल्या कॉलेजला (ऑल ओव्हर) प्रथम क्रमाकांचे बक्षीस मिळाले. तसेच कॉलेज स्तरावर घेण्यात आलेल्या वेगवेगळ्या स्पर्धामध्ये खालील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी प्रावीण्य मिळवले. सिनीयर रँक होल्डर विलास बोंडे, ज्यूनियर रँक होल्डर संजय चौधरी, ज्युनियर अंडर ऑफीसर मनोहर वाघ, क्रॉस कंट्री गणेश पाटील, बेस्ट फायरर रोहीत शर्मा, बेस्ट सर्वीस रविंद्र ठाकूर तर विद्यार्थीमध्ये रँक होल्डर हेमांगी पाध्ये, तर वैशाली बावीस्कर, मंजूषा अयाती, श्वेता समधानी, वंदना देवपूरे, उमा रामलिंग्या, स्वाती पाटी, शिल्पा खारुड, या सर्वांना २६ जानेवारी १९९४ रोजी प्राचार्य डी.एस. नेमाडे यांच्या हस्ते मेडल देण्यात आले.

आपल्या महाविद्यालयाला विशेष अभिमानाची गोष्ट म्हणजे जळगाव जिल्ह्यातून आपल्या महाविद्यालयाची विद्यार्थीनी जे.यू.ओ. वैशाली कुलकर्णीची २६ जानेवारी १९९४ च्या राज्यपथक संचलनासाठी निवड झाली होती. तिथे तिने विशेष नैपुण्य दाखवून चषक प्राप्त केला. तिच्या यशाबद्दल सर्वांनी तिचे कौतूक केले होते. गतवर्षी झालेल्या एन.सी.सी.च्या बी.व सी. संर्ट च्या परीक्षेचा आपल्या महाविद्यालयाचा निकाल १००% लागला होता. छात्रसैनिकानप्रमाणे एन.सी.सी. चे ऑफीसर सुध्दा कँप मध्ये सहभागी झाले. कॅ.रडे व ले. भालसिंग हे कामठी येथे १ महिन्याच्या एन.सी.सी. रिप्रेचर कोर्स करुन आले. त्यात लेफ्टनंन्ट भालसिंग यांचा फीजीकल टेस्ट मध्यें प्रथम क्रमांक आला त्यांना ओ.टी.एस. चे कँप प्रमुख व अमरावतीचे ग्रुप प्रमुख कर्नल सॅडील्य यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवून त्यांच्या सन्मान करण्यात आला.

**मेजर :** सौ. मालती जावळे

**कॅप्टन :** प्रा. एस.एस. रडे

**लेफ्टनंन्ट :** प्रा.आर.आर. भालसिंग

# विद्यार्थी-विद्यार्थिनी वसतिगृह

सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात मुला-मुलींच्या वसतिगृहात परंपरेप्रमाणे अनेक विधायक व सृजनशील उपक्रम घेण्यात आले. वसतिगृहाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थी व विद्यार्थीनींची राहण्याची उत्तम व्यवस्था शिवाय विद्यार्थी व विद्यार्थिनींनी स्वंतत्रपरे क्लब पध्दतीने चालविलेली मेस होय.

विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांच्या विकासासाठी वर्षभरात अनेक कार्यक्रम राबविले गेले. बी.एड.च्या विद्यार्थिनींनी तसेच एम.एस्सी.च्या विद्यार्थिनींनी नाट्यछटा, गीतगायन, एकांकी, हास्यप्रधान संवाद इ. कार्यक्रम उत्तम प्रकारे प्रदर्शित केले.

कला व संस्कृती ची जोपासना करण्यासाठी 'कला व सांस्कृतिक मंडळाचे' उद्घाटन माननीय कुलगुरु ठाकरे साहेब यांच्या हस्ते मा. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे, प्राचार्य डी.एस. नेमाडे आणि उपप्राचार्य महाजन यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. स्वातंत्र्यदिना निमित्त विद्यार्थ्यांच्या बुध्दिबळ स्पर्धा घेण्यात आल्या. क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन प्रा. ए.बी. पाटील यांच्या शुभहस्ते होऊन त्यांनी सुभाषचंद्र बोस 'जीवन व कार्य' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. त्या सप्ताहात विविध खेळांचे आयोजन केले होते. विद्यार्थी विद्यार्थीनींनी निबंध, वक्तृत्व, कॅरम, संगीत, रांगोळी, मेहंदी, हस्ताक्षर, बॅडमिंटन इ. स्पर्धामध्ये अधिकाधिक संख्येने भाग घेऊन उत्साह दाखविला. शिवाय एम.बी.ए. च्या विद्यार्थ्यांनी अभिनय स्पर्धा आयोजित केली होती. तिलाही उत्तम प्रतिसाद मिळाला.

प्रजासत्ताक दिनी शिवाजी उद्यानात सहभोजन व विविध मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वरील कार्यक्रमांबरोबरच विद्यार्थी विद्यार्थिनींना इतर मान्यवरांच्या व्याख्यानांचा लाभ झाला. श्री. आय.पी. उत्तरदे यांनी 'जीवनातील यशाची रहस्ये आणि डॉ. अग्यजीतसींग (पतियाळा) यांनी 'भारतीय माणूस व खेळ' विषयांबद्दल विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

भूकंपग्रस्तांसाठी मदत म्हणून विद्यार्थी विद्यार्थीनींनी खारीचा वाटा उचलून रु. १८०० दिले. विजया दशमीच्या शुभदिनी वसतिगृहाच्या परंपरेप्रमाणे प्राचार्य आर.डी.राणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांतर्फे मेस मधील कर्मचाऱ्यांना भेटवस्तु देण्यात आल्या. वसतिगृहाच्या कामकाजास यशस्वीरित्या पारपाडण्यासाठी प्राचार्य डी.एस. नेमाडे तसेच सर्व उपप्राचार्य यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभून सहयोग मिळाला. मेस मॅनेजर श्री कोपरकर यांचे मेस संदर्भात सतत सहकार्य मिळत असते. विद्यार्थी प्रतिनिधी व कर्मचारी यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी वसतिगृहाची परंपरा व मूल्य जतन करुन बंधुभावाचे व खेळीमेळीचे वातावरण ठेवले त्यामुळे ते अभिनंदास पात्र आहेत.

**प्रा.डॉ.एस.एस. राणे**
रेक्टर विद्यार्थी वसतिगृह
**प्रा. डॉ. सौ. एम.एम. जावळे**
रेक्टर विद्यार्थिनी वसतिगृह

## नियोजन मंडळ (वरिष्ठ)

नियोजन मंडळाच्या कार्यक्रमात या वर्षी ''जकाती व व्यापार विषयक सामान्य करात (गॅट) मधीलं डंकेल प्रस्ताव व भारतीय अर्थव्यवस्था'' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डी.एस. नेमाडे तर विषयतज्ञ म्हणून माजी खासदार आणि प्रसिध्द अर्थतज्ञ भाईसाहेब वाय.एस.महाजन उपस्थित होते. या चर्चासत्रात प्रा. डी.सी. चव्हाण, प्रा. सौ. एस.टी. बिराजदार, प्रा. डॉ. एस.डी. जोशी, प्रा. शेखर सोनाळकर, प्रा. श्रीरंग राजे, विद्यार्थी श्री. सुधीर केने आणि श्री. अविनाश निकम यांनी गॅट विषयीची आपापली मते व्यक्त केलीत.

अर्थतज्ञ भाईसाहेब महाजन यानी गॅटचे आव्हान भारतीय उद्योजकांनी स्विकारावे असे मत प्रतिपादन केले. अध्यक्षिय भाषणात प्राचार्य नेमाडे यांनी आपले विचार व्यक्त करतांना म्हटले. ''भारतीय उद्योजकांनी स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रयत्न करावा''. त्याप्रसंगी वाणिज्य विभागातील विविध अभ्यासमंडळाचे अध्यक्ष उपस्थित होते. या कार्यक्रमात आम्हांस सक्रिय साहाय्य देणारे आमचे प्राचार्य, उपप्राचार्य, सबंधित प्राध्यापक बंधू भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वृंद यांचे मन:पूर्वक आभार.

प्रा. यशवंत सैदाणे.
अध्यक्ष
नियोजन मंडळ.

**सदस्य :**

प्रा. डॉ. एस्. डी. जोशी
प्रा.सौ. एस.टी. बिराजदार
प्रा.कु. कल्पना नंदनवार
प्रा.डी.सी. चव्हाण

## युवती- सभा (कनिष्ठ)

१९९३-९४ वर्षात युवती सभेचे उद्घाटन नूतन मराठा महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. व्ही.जे. ठाकरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी ''योगा आणि स्त्रीजीवन'' या विषयावर व्याख्यान देऊन काही योगासने करुन दाखविली. योगाकडे सौदर्यात्मक दृष्टीने पहाण्याचा सल्ला त्यांनी दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एम.के. येवले होते.

त्यानंतर आपल्याच महाविद्यालयातील प्राध्यापिका सौ. उषा सावंत यांनी 'सावीत्रीबाई फुले आणि स्त्री शिक्षण' या विषयावर व्याख्यान दिले. आपल्या भाषणात त्यांनी क्रान्तीकारी महिला म्हणून त्यांचा गौरव केला.

त्यानंतर फेविकॉल कंपनीच्या प्रतिनिधी सौ. जोस्ना रघुवंशी यांनी घरगुती साहित्याच्या (कांदा, बटाटा, कार्ले, भेंडी, ब्लेड) आधाराने पेन्टींगची सोपी पध्दत दाखविली. त्यावेळी त्यांनी कागद व कापडावरील पेन्टींगचे प्रात्यक्षिक दाखविले.

शेवटी युवती सभेमध्ये 'सौंदर्यदीप' ब्युटी पार्लरच्या संचालिका सौ. शोभा पाटील यांनी 'त्वचेची निगा' या विषयावर माहिति देऊन फेसियल करुन दाखविले. बऱ्याचशा विद्यार्थिनींनी वरील कार्यक्रमात सहभाग घेतला युवती सभेच्या सदस्या प्रा. उषा सावंत, प्रा. ललिता वाणी व प्रा. करुणा सपकाळे यांनी सहकार्य केले.

[प्रा.सौ. लता पाटील]
अध्यक्ष
युवती - सभा

## मानसशास्त्र मंडळ

मानसशास्त्र विभाग मु.जे. महाविद्यालय जळगाव द्वारा सन १९९३-९४ सालासाठी कनिष्ठ वरीष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थांना मानसशास्त्राची सर्वांगीण माहिती होण्याच्या दृष्टीने मानसशास्त्र मंडळाची स्थानना मा. प्राचार्य डी.एस. नेमाडे यांचे शुभहस्ते करण्यात आले. द्वितीय वर्ष कला व एम.ए. भाग १ या वर्गात मानसशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थीसाठी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला.

द्वितीय वर्ष एम.ए.च्या विद्यार्थाना प्रकल्पासाठी मानवी जीवनाशी संबधित विषय देण्यात आले व विद्यार्थीनी प्रकल्प केलेत व त्यांना संशोधनात्मक दृष्टी लाभल्याचे दिसून आले.

प्रा.एस.एस. राणे यांना पी.एच.डी. मिळाल्याबद्दल मंडळाद्वारा प्राचार्य डी.एस. नेमाडे यांचे शुभहस्ते सत्कार करण्यात आला. तसेच जोधपूर येथील ३० व्या अखील भारतीय मानसशास्त्र परीषदेमध्ये डॉ. एस.एस. राणे यानी'' शोध निंबध सादर केला.

डॉ. अग्याजीत सींग पत्तीयाळा यांनी भारतीय माणूस व क्रिम मानसशास्त्र या विषयावर व्याख्यान दिले. प्रा. डी.जी. नाझर चाळीसगांव यांनी समूह मनोधैर्य या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. जे.सी. पारीखी यांनी एम.ए. विद्यार्थ्यांना प्रकल्पाविषयी महत्वपूर्ण सूचना दिल्यात.

डॉ. बी.आर. जोशी अधिष्ठाता मानसनिती व सामाजिक शास्त्रे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि प्राचार्य ए.जी. चिटणीस नंदुरबार यांनी विभागांस भेट देवून मंडळाविषयी व विभागाविषयी प्रशंसोदगार काढले.

मानसशास्त्र विभागातील विद्यार्थी श्रेष्ठ सुरेश ब्रिजलाल परदेशी व कु. सूहास चंद्रशेखर चतू यांना विशेश प्राविण्य संपादन केल्याबद्दल घन:श्याम काशीराम पाटील पारीतोषीके महाविद्यालया तर्फे देण्यात आले. मंडळातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले. मानसशास्त्र विभाग व मानशास्त्र मंडळाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी प्राचार्य डी.एस.नेमाडे यांचे मार्गदर्शन लाभले तसचे विभागातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अमोल सहकार्य लाभले.

डॉ. एस.एस. राणे
मानसशास्त्र विभाग

## विज्ञान मंच

या वर्षाचा विज्ञान मंचाच वार्षिक अहवाल सादर करतांना मला अत्यानंद होत आहे. या वर्षी प्रथमच विज्ञान मंच चे कार्य संचलन कनिष्ट महाविद्यालय प्राध्यापकांच्या गटाकडे आलेले आहे.

**उद्देश :** इयत्ता नववीतील ग्रामीण व शहरी भागातील हुशार विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व गणिता विषयी जिज्ञानासा व गोडी निर्माण व्हावी, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टीकोन घडवावा आणि आठवी इयते पेक्षा वरच्या वर्गातील विषया संबधीचे प्रयोगात्मक, वैज्ञाननिक माहीती देणे व ग्रामीण व शहरी मुलामध्ये वैज्ञानिक विचारांची देवाण घेवाण करणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट होय. एन.टी.एस. च्या परिक्षेला सहाय्यभूत होईल असे कार्य करणे.

**प्रवेश :** विज्ञान मंच उपक्रमात सहभाग घ्यावयासाठी दि. २२-८-९३ रोजी प्रवेश परिक्षा घेण्यात आले. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला.

अगटात ४० विद्यार्थी शहरी भागातून तर ब गटात ३० विद्यार्थी ग्रामीण भागातून घेण्यात आले. साधारणत: ६५% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या आठव्या इयतेतील मूलांना यात प्रवेश मिळतो. एकाशाळेतून फक्त पाच विद्यार्थी घेण्यात येतात.

**कार्यक्रम :** जळगाव शहरातील विद्यार्थ्यासाठी दर शनिवारी दुपारी मु.जे. महाविद्यालयात विविध कार्यक्रम घेतले गेलेत.

या वर्षी विज्ञान मंचाचे उद्घाटन दि. ११-९-९३ रोजी उपप्राचार्य एम.के. येवले यांच्या हस्ते करण्यात आले. नंतर प्रा. डी.एस. भारंबे समन्वयक विज्ञान मंच यांनी अ गटासाठी फॅरेडेचा नियम व विज निर्मिती, व 'ब' गटासाठी अंधश्रध्दा व निर्मूलन या विषयावर प्रात्यक्षिकासह भाषण केले. त्याशिवाय

प्रा. जे.डी. नारखेडे, दैनंदिन जिवनावरील रसायन शास्त्राचे महत्व

प्रा. एच.बी. चौधरी- उदासिनीकरणाचे प्रयोग

प्रा. एस. व्ही. सोमवंशी - अनुवंशिकता

प्रा. आर.ए. पाटील - उत्क्रांती

प्रा. एच. एम. चौधरी - गणित

प्रा. एल. आर. चौधरी- आहार शास्त्र

प्रा.डॉ.व्ही.बी.शाह - विज्ञान कुंडली

प्रा.एम.एस. झोपे- प्रदुषण

प्रा.डॉ.एस.एस. राणे- मानसशास्त्र या विषयावर माहिती देण्यात आली.

प्रा.पी.डी. भोळे, प्रा. टी.एम. भारंबे, प्रा. बी.आर. पाटील यांच्याही यात सहभाग होता. शिवाय श्री. राजेंद्र गाडगीळ यांनी लोक विज्ञान चळवळी विषयी माहीती दिली तर श्री. बी.एन. गिरासे, विज्ञान पर्यवेक्षक जिल्हा परिषद जळगाव यांनी मुलांना राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षे विषयी इत्यंभूत माहिती दिली.

'ब' गटातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दिवाळीच्या सुटीत सात दिवसांचे दि. १६-११-९३ ते २२-११-९३ पर्यंत विज्ञान शिबीर आपल्या महाविद्यालय परिसरात घेण्यात आले. महाविद्यालया बद्दलची उत्सुकता, नवलाई, भव्य प्रयोग शाळा, यांच्याशी ग्रामीण भागातील मुलांचा परिचय झाला भाषणे. वैज्ञानिक प्रयोग, चित्रकीती याद्वारे त्यांचे उदबोधन करण्यात आले.

विज्ञान मंच साठी एक लहान स्वरुपात

स्वतंत्र वाचनालय असून त्यात गणित, विज्ञान रसायनशास्त्र विषयी उद्बोधक पुस्तके उपलब्ध करुन दिलीत.

या शिवाय विज्ञान प्रश्न मंजूषा, प्रयोगशाळेतील नाविन्यपूर्ण प्रयोग याचा या विद्यार्थ्यानी पुरेपुर लाभ घेतला अशा या लहानशा मुलांनी आकाशाला गवसणी घालावयाचे स्वप्न रंगवण्यासाठी लागणारी जिद्द या संपूर्ण उपक्रमातून घेवून गेले. दि. २६-२-९४ रोजी. प्राचार्य सन्माननीय उपस्थित डी.एस. नेमाडे व श्री एस.एस. पाटील यांच्या सन्माननीय उपस्थित या वर्षाच्या समारोपाचा समारंभ पार पाडला.

या सबंध उपक्रमाविषयी श्री. टी.एन. गिरासे जिल्हा परिषद यांची बहुमोल सहकार्य लाभले. त्याहीपेक्षा लॅब सहकारी श्री शरद अत्तरदे व प्रयोग शाळेतील इतर कर्मचारीच्या बहूमूल्य सहकार्याने या वर्षातील विज्ञान मंचाची सर्व कार्यक्रम उत्तमरित्या पारपाडू शकले. त्याना व इतर सर्वां सहकार्यांना मी शतश: धन्यवाद देतो.

प्राचार्य — **प्रा. डी.एस. भारंबे**

**श्री.डी.एस. नेमाडे** — समन्वयक विज्ञान मंच

केंद्र संचालक विज्ञान मंच

## वाणिज्य- मंडळ (कनिष्ठ)

१९९३-९४ या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालयात वाणिज्य मंडळाची स्थापना करण्यात आली. व्यवसायिक क्षेत्रातील ओळख व्हावी आणि वाणिज्य विषयासंबधीत व वर्तमान परिस्थीतीच्या संबधीत विद्यार्थ्यांना इतर माहिती मिळावी या हेतूने वाणिज्य मंडळाची स्थापना करण्यात आली.

पहिल्या सत्रात वाणिज्य मंडळाचे उद्घाटन श्री.पी.एम. केतकर (सहाय्यक आयकर आयुक्त) यांचे हस्ते करण्यात आले. श्री. केतकर यांनी स्वत: लिहलेल्या कथेच्या आधारावर विद्यार्थ्यांना वाणिज्य शिक्षणाचे महत्व आणि आजच्या व्यावसायिक क्षेत्रात विद्यार्थ्यांची भूमिका कोणती असली पाहिजे या बद्दलचे विद्यार्थ्यांना बहूमोल असे मार्गदर्शन त्यांनी केले. त्याप्रमाणे डॉ. इ.बी. माळी यांनी देशाचे नवीन औद्योगिक धोरणाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

वाणिज्य मंडळाच्या कार्य-क्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. एस.एन. पाटील, प्रा. आर.बी. चौधरी, प्रा. एम.एल. पाटील व इतर प्राध्यापक वर्ग आणि मंडळाचे सर्व सदस्यांनी दिलेल्या अमोल सहकाऱ्याबद्दल मी त्या सर्वाचा आभारी आहे.

प्रा. बी.एम. चौधरी
अध्यक्ष
वाणिज्य मंडळ

**अन्य सदस्य**

१) एस.ओ. उभाळे
२) ई.बी. माळी
३) एस.ए. चौधरी
४) एस.एस. खिराडे



विज्ञान मंच

प्लॅनिंग फोरम





वाद विवाद मंडळ



कनिष्ठ महाविद्यालय
विज्ञान मंडळ

कला मंडळ





युवती सभा

# कला मंडळ १९९३-९४

कला मंडळ १९९३-९४ चा अहवाल देतांना आनंद होत आहे. कारण या वर्षभरात विद्यार्थ्यांनीच प्रत्येक कार्यक्रम यशस्वी करण्यात उत्स्पूर्तपणे सहभाग घेतला.

कनिष्ट महाविद्यालयातील कला मंडळ १९९४ चे उद्घाटन दि. २३-९-९३ रोजी उपप्राचार्य डी.एच. महाजन यांनी केले. ''विद्यार्थी व व्यक्तिमत्त्व'' या विषयावर बोलतानं शेर-शायरी तत्वकता इ. तंत्राचा उपयोग करुन युवकांनी व्यक्तिमत्त्वाचा विकास कलामंडळामार्फत साधावा असा मोलाचा संदेश दिला.

अकरावी कला शाखेचा विद्यार्थी द्वारकाधिश जोशी याने दि. २६-९-९३ ला ''श्री समर्थ रामदास स्वामी'' यांच्यावर प्रवचन केले.

कला मंडळाने दि. १७-१२-९३ ला श्री. तात्यासाहेब मधु नेवे यांचे हस्तकला प्रदर्शन जिमखाना हॉलमध्ये भरविले होते.

विवेकानंद जयंती दि. १२-१-९४ ला साजरी केली. त्या प्रसंगी प्रा. आर.बी. चौधरी यांनी ''विवेकानंद जीवन परिचय'' करुन दिला.

सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने कला मंडळाने दोन विद्यार्थ्यांचे गट जळगाव शहर पोलीस वाहतूक नियंत्रक यांचेकडे निबंध स्पर्धेसाठी पाठविले होते. त्यात यशस्वी झालेले विद्यार्थी- १) नितीन खडसे २) अशिष किशोर, ३) संगीता भावसार, तसेच एका गटाची निबंधक स्पर्धा कलामंडळाने घेतली. त्यात यशस्वी झालेल्या विद्यार्थीनी- १) कु. सुनिता सोनू पाटील २) कु. सीमा महारु इसे. ३) कु. वर्षा केशवराव म्हस्के.

कला मंडळाने गीतगायनाचा कार्यक्रम दि. २०-१२-९३ घेतला. या कार्यक्रमात भाग घेणारे विद्यार्थी कलाकार- सुशिल सोनवणे, मनिषा ठाकरे, राजेंद्र धनराळे, संगिता भावसार, शामला पवार, सविता नेमाडे, सोनाली पाठक, सुदर्शन सोनवणे, कैलास वानखेडे, वर्षा कुलकर्णी, जयंती गोखले, शिरसाळे.

कला मंडळातर्फे दि. १५-२-९४ रोजी पूण्याचे प्रसिध्द ''एकपात्री नाट्यप्रयोग'' करणारे कलाकार श्री. सुरेश ठुमकर यांचा कार्यक्रम झाला. त्यांनी ''श्यामची आई व कथा भारत रत्नाची''हे नाट्यप्रयोग सादर केले.

**कार्यकारीणी**

प्रा. आर. बी. चौधरी

प्रा. व्ही.व्ही. बिऱ्हाडे

प्रा. पी.यु. वानखेडे

प्रा. सौ. ललिता वाणी

**अध्यक्षा**

कला मंडळ

# ग्रंथालय वार्ता

ग्रंथ हेच गुरु असतात अस प्राचीन वाङमयात म्हटल आहे. ज्ञान वृध्दिगंत होण्यासाठी ग्रंथाची गरज असते. म्हणून आमच्या महाविद्यालयाच आगळ वेगळ वैशिष्ट्य कोणत असेल तर सर्वांगी समृध्द पुस्तकांनी भरभरुन असलेला ग्रंथागार होय. अशा वर्धेष्णू ग्रंथालयाचा अहवाल सादर करतांना मला आनंद होत आहे.

दरसाल ग्रंथालयात पुस्तकांची भर पडत असते. यंदा सातव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत पदव्युत्तर या विषयापैकी रसायन शास्त्र या विषयास एक लाख पदार्थविज्ञान या विषयास एक लाख, प्राणिशास्त्र या विषयास एक लाख व गणित या विषयास पन्नास हजार अनुदान विद्यापिठ अनुदान मंडळाकडून मंजूर झालेले आहे. तसेच पदवीपूर्व या विषयासाठी एक लाख पन्नास हजार रुपये मंजूर झालेले आहेत. त्या अनुदानातून व कॉलेजच्या वार्षिक बजेट मधून यंदा ग्रंथालयात १२३४ पुस्तके घेण्यात आलेली आहे. त्यामुळे आता ग्रंथालयातील पुस्तकांची एकुण संख्या ९५७७४ झाली आहे. शिवाय एकूण १६० नियत कालीके, मासिके, पाक्षिके येतात. या वर्षी इंडियन जनरल ऑफ इन्व्हायरमेंटल, जनरल ऑफ सोशॉलॉजी, जनरल ऑफ जेनेटिक्स. इत्यादी प्राणिशास्त्र समाजशास्त्र, वनस्पती शास्त्राचे नियत कालीक नव्याने सुरु करण्यात आलेले आहेत.

ग्रंथालयाचे वैशिष्ट्ये हे की गरीब व होतकरु व हुषार विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सहाय्य व्हावे म्हणून त्यांना क्रमिक पुस्तकांचा संच वर्षभर वापरण्यासाठी दिले जातात. या योजनेचा १५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. ग्रंथालयाचे दुसरे वैशिष्ट्ये हे की यंदा ग्रंथालयात झेरॉक्स मशिन बसविण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थी वर्ग यांना लागणारे संदर्भ त्वरीत झेरॉक्स करुन देण्यात येतात.

**पी.डी. बऱ्हाटे**
ग्रंथपाल

# प्राध्यापकांचे विशेष कार्य

१) प्रा. एस्. एस्. पाटील
क्रमिक पुस्तक : Heal and Thermodynamics,' F.Y.B.Sc. (Physics), NMU, Ox-ford Univ. Press.

२) डॉ. आर.टी. चौधरी
मार्च ९४ मध्ये एम्.एस्.जी. महाविद्यालयाने मालेगाव (कँप) येथे आयोजित केलेल्या 'Thin Film Technology' या कृतिसत्रात सहभाग

३) डॉ. आर.टी. चौधरी
डॉ. जी.डी. तळेले
● पी.ओ. नहाटा महाविद्यालय भूसावळ येथे पदव्युत्तर (भौतिकशास्त्र) वर्गासाठी Guest-Lecturer.
● Solid State Physics and Electronics या विषयात M.Phil, Ph.D. साठी मार्गदर्शक म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाची मान्यता.
● **क्रमिक पुस्तक** : i) 'Semiconductor Devices' ii) 'Passive Electronic Components and Network Theorems' iii) 'Basic Electronc Circuits' iv) 'Digital Electronics' V) Practical Course Electronics, F.Y.B.Sc. (Electronic Science), NMU, Jaydeep. Prakashan, Pune.

४) प्रा. एच.बी. गाजरे
प्रा.एस.के. भोळे
● **क्रमिक पुस्तक** : 'Practial Physics', F.Y.B.Sc, NMU, Oxford Univ. Press.

५) प्रा. एस्.एम्. जावळे
● **क्रमिक पुस्तक** : 'Genetics', NMU, Oxford Univ. Press.
● "Histochemical Studies on Ovaries of sphaeroduma rusticum" article included in the book "Man, Science and Environment" edited by Dr. Ram Prakash, Ashish Publisher, New Delhi.

६) प्रा. सौ. यू.एस. मानूधने
● **क्रमिक पुस्तक** : 'Cell Biology' for F.Y.B.Sc., NMU, Oxford Univ. Press.

७) प्रा. सौ. यू.एस. मानूधने
डॉ. इ.एम्. वाठ
● **शोध निबंध** : i) 'Study of dehydrogenase in the tissues of activating fresh water snail Melanoides lineatus (Gray) J. Environ. Res, Vol. 2, 7-12, 1992 ISSN No 0971-2372.
ii) 'Some aspects of calcium properties and metabolism during shell regeneration in fresh water prosobrank melanoides lineatus (Gray), 80th Indian Science Cogress, Sec. Zoo, Entamology and Fisheries Part IV Abstracts Goa, 1993.

८) डॉ. इ.एम्. वाठ
● **शोध निबंध** : 'Effect of Salinity of sulphydryl level Contents in the Various tissues of form Rana

trigrina' J. Ecobiol 5 (2), 151-152, 2993. Palani Paramount Publications (India) ISSN No. 0937- 0005-151

९) डॉ. इ.एम्. वाठ
डॉ. बी.के. परदेशी

● **शोध निबंध :** Efects of various compounds of oxygen consumption the fresh water snail- Melanoids Lineatus (Gray), Advances in Bio-sciences, Vol.II (II) 33-38, 1992, ISSN 0970-0315

१०) प्रा. बी.के. परदेशी

"Impact of Pesticides on some Physiological Aspects of limnea Accuminata (Lormac)" प्रबंधास मराठा विद्यापिठाची मान्यता व Ph.D. प्राप्त.

११) डॉ. आर.टी. महाजन

● **शोध निबंध :** i) 'A review on fitty indegeneous medicinal plants as male antifertility agents' J.Res. Plants and medicine (In press) Haridwar, 1993. ii) 'Fish toxieants of plant origin' and 'Fertility regulating plants' Two papers presented at ISCA, Jaipur, Jan. 1994

● 'Botony Zoology, Bichemistry या विषयात M.Phill. Ph.d. साठी मार्गदर्शक म्हणून उत्तरमहाराष्ट्र विद्यापिठाची मान्यता.

१२) प्रा. ए.पी. चौधरी

● **शोध निबंध :** i) "Medical Geography and Kautilya' presented in the National seminar at sidhi (M.P.) organised by ACIG on 4 & 5th June 93. ii) 'Mabilization of Redouries and its Tech. and problem (Spt. Ret. to Industrial Security)' Presented in the National seminar at sidhi (M.P.) Organised by A.C.I.G. on 14 & 15th Feb. 94

● Y.C.M. Open Univ. Nashik चा 'Computer Basic' Certificate कोर्स पूर्ण.

● **क्रमिक पुस्तक :** भारतीय युध्दकला for F.Y.B.A., NMU.

१३) डॉ. अ.एस्. भोळे

● **क्रमिक पुस्तक :** 'वाणिज्य भूगोल' F.Y.B.Com, NMU.

१४) प्रा. एस.एस. राणे.

● "A study of cerrelates of organizational climate, Tab-involvement and mental health among Industrial Employes"
प्रबंधास वल्लभ विद्यानगर येथील, सरदारद पटेल विद्यापिठाची मान्यता व Ph.D. प्राप्त.

● **शोध निबंध :** 'Analysing Secondary, School teachers behaviour in the class room, paper presented in the 30th annual JAAP conference at Jodhpur.

१५) प्रा. एन.व्ही. भारंबे

● **क्रमिक पुस्तक:** भारतीय गणराज्याचे शासन, F.Y.B.A, NMU.

१६) प्रा. एस.एन. भारंबे

• **शोध निबंध :** i) 'खान्देशातील पीक विविधत्ता पातळी एक स्थलकाल परत्वे भौगोलीक अभ्यास ''भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे २६-२८ ऑक्टो.९४ काळात महाराष्ट्र भुगोलशास्त्र परिषदेच्या दहाव्या चर्चासत्रात वाचन म.भु.प. च्या भूगोल संशोधन पत्रिकेमध्ये प्रसिध्द Vol.VII, No.2, Dec. 93 ii) म. भू. परिषदेच्या ''भूगोल संशोधन पत्रिका'' मध्ये 'खान्देशातील लोकसंख्या पोषण घनता व टिकात्मक घनतेच्या आकृतिबंधातील स्थानिय बदल'' प्रसिध्दिसाठी स्विकृत Vol. VIII, No.-1, June 94

मु. जे. महाविद्यालय, जळगाव आयोजित, महाराष्ट्र समाजशास्त्र परिषदेच्या आठव्या अधिवेशन 7-9 Nov. 93 चर्चासत्रात सहभाग.



# प्राध्यापक प्रबोधिनी

## कनिष्ठ महाविद्यालय

प्राध्यापक प्रबोधिनीने विविध कार्यक्रम घेतले. त्यात २ नोव्हेंबरला स्नेहसंमेलन झाले.

१८ फेब्रुवारीला डॉ. माळी यांचे ''डंकेल प्रस्ताव व भारतीयं अर्थव्यवस्था ''या विषयावर भाषण झाले. त्यांनी डंकेल प्रस्ताव हा भविष्यकाळासाठी एक गंभीर बाब असून भारतात संशोधनाची व ज्ञानाची दालने बंद होतील'' असे मत प्रतिपादन केले. २४ फेब्रुवारीला ''प्रशासकाचे व्यक्तिमत्त्व'' या विषयावर प्रा. आर.बी. चौधरी यांचे भाषण झाले. प्रशासनात सृजनशील व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असावे मत प्रतिपादन केले.

सर्व कार्यकमांना बहुसंख्येने प्राध्यापक उपस्थित राहून सर्वांनी सहकार्य केले.

**प्रा. सौ. उषा सावंत**
**अध्यक्ष**

# महाविद्यालयास मान्यवर व्यक्तींच्या भेटी

भाईसाहेब महाजन
माजी खासदार

डॉ. एन.के. ठाकरे
कुलगुरु उ.म.वि.

प्राचार्य अशोक प्रधान

मानशास्त्र – डॉ.बी.आर. जोशी

श्रीमती सुमा चिटणीस
कुलगुरु एस.एन.डी.टी.विद्यापीठ,मुंबई

डॉ. के.के. खातु–
महाराष्ट्र शासन, पर्यावरण शास्त्रज्ञ

डॉ. श्रीकांत परांजपे
संरक्षणशास्त्र पुणे

श्री. यशवंतराव पवार
सेक्रेटरी उच्च माध्यमिक बोर्ड, नाशिक

पुनाळेकर एस.पी.

श्री. गुंडेवार – सत्र न्यायधिश जळगाव

श्री. अजयभूषण पांडे–
जिल्हाधिकारी,जळगाव

श्री. दिपक जोग –
जिल्हा पोलीस अधिक्षक, जळगाव

श्री. दिलीप राव –
जिल्हा उपपोलीस अधिक्षक, जळगाव

श्री. यशवंत चौधरी
चित्रकार मुंबई

डॉ. भाऊ मांडवकर–
विदर्भातील संशोधक व साहित्यीक

श्री. वसावे उ.म.वि.

श्री. झेड.बी. पाटील
उ.म.वि.

श्री.डॉ. देशपांडे
समाजशास्त्र

कर्नल– डी.के. शांडिल्य– अमरावती

कर्नल– मोहनलाल शर्मा–
बटालियन प्रमुख, जळगाव

कर्नल– बहादुरणे
१३ महाराष्ट्र बटालीयन खामगाव

कर्नल– ललवाणी
४७ महाराष्ट्र बटालीयन,अकोला

प्रांतधिकारी – श्री. प्रकाश महाजन
श्री. दिलीप महाजन

श्री. अग्रवाल
मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.जळगाव

अग्याजितसिंग – एन.सी.सी.

डॉ. मोहीते–
पशु संवर्धन अधिकारी

डॉ. दारुवाला
पर्यावरण संरक्षण सल्लागार म.शासन, मुंबई

## सन १९९३-९४ या वर्षातील विविध पारितोषिके/शिष्यवृत्त्या मिळविणारे मानकरी

| अ.क्र. | पारितोषिक/शिष्यवृत्तीचे नांव | तपशील | पारितोषिक/शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांव |
|---|---|---|---|
| १) | खेर गंभीरमल पारितोषिक | सर्वोत्कृष्ट विद्यार्थी | सकळकळे अनिरुध्द अशोक टी.वाय.बी.ए. |
| २) | पी.व्ही. रत्नपारखी पारितोषिक | प्रथम वर्ष कला आणि विज्ञान या दोन्ही शाखांतून महाविद्यालयांत सर्वप्रथम येणारा विद्यार्थी. | कु. पिसे वैशाली रमेश |
| ३) | डॉ. के.व्ही. पराडकर पारितोषिक | १२ वी विज्ञान या परीक्षेत जीवशास्त्र या विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | कु. गौड कविता नारायण |
| ४) | फाऊंडर मेंबर नानासाहेब दावलभक्त पारितोषिक | १२ वी परिक्षेत जीवशास्त्र (बी. ग्रुप) घेऊन सर्वाधिक गुण मिळविणारा व वैद्यकिय शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस | कु. गौड कविता नारायण |
| ५) | डी.यु. वाणी पारितोषिक | १२ वी विज्ञान या परिक्षेत गणित या विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | चौधरी दिपक लिलाधर |
| ६) | डी.आर. नाडकर्णी विज्ञान पारितोषिक | १२ वी विज्ञान या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | कौशिक गिरीश मुरलीधर |
| ७) | तापीराम भगवान चौधरी आणि रमाबाई चौधरी (थोरगव्हाणा) पारितोषिक | १२ विज्ञान या परीक्षेत महाविद्यालयातून सर्व प्रथम येणारा विद्यार्थी | कौशिक गिरीश मुरलीधर |
| ८) | वि.वा.गंधे आणि सत्यभामा गंधे पारितोषिक | तृतीय वर्ष कला (मराठी स्पे.) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी. | कु. पाटील शैलजा मधुकर |
| ९) | प्रा. म.ना. अदवंत शिष्यवृत्ती | तृतीय वर्ष कला (मराठी स्पे.) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी. | |
| १०) | नर्मदाबाई नवलराम पाटील पारितोषिक | तृतीय कला (मराठी स्पे.) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक (अग्रीमेंट) गुण मिळविणारा विद्यार्थी | |
| ११) | रामभाऊ प्रभुदेसाई पारितोषिक | तृतीयवर्ष कला या परीक्षेत (मराठी प्रधान) द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी विषयातील (अग्रीगेट) गुण मिळविणारा विद्यार्थी. | |
| १२) | बारजिभे शिष्यवृत्ती | १२ वी कला परीक्षेत इंग्रजी या विषयांत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी. | शर्मा रोहीत मोहन |

| अ.क्र.पारितोषिक/शिष्यवृत्तीचे नांव | तपशील | पारितोषिक/शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांव |
|---|---|---|
| १३) सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | उच्च माध्य. (१२ वी) कला परीक्षेत महाविद्यालयातून सर्व प्रथम येणारा आणि याच महाविद्यालयांत प्रथम वर्ष कला या वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी. | कु. येडशिकर दिपाली भगवान |
| १४) तापीराम भगवान चौधरी आणि रमाबाई चौधरी (थोरगव्हाण) पारितोषिक | १२ वी कला परीक्षेत महाविद्यालयातून सर्व विद्यार्थिनीत सर्व प्रथम येणारी विद्यार्थीनी. | कु. येडशिकर दिपाली भगवान. |
| १५) सौ. लिला महादेव अदवंत पारितोषिक | उच्च माध्य.(१२ वी) कला या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ठाकूर संतोषकुमार माधवराव |
| १६) सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | महाविद्यालयातून ११ वी कला या वर्गात प्रवेश घेणारा व १० वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | नगरधने उत्तम काशिनाथ |
| १७) सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | १२ वी वाणिज्य या परीक्षेत महाविद्यालयांत सर्वाधिक गुण मिळविणारा व प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गात याच महाविद्यालयांत प्रवेश घेणारा विद्यार्थी | शाह निली रमेश |
| १८) पाटील-पोतनीस पारितोषिक | १२ वी ते पदव्युत्तर वर्गामधील उत्तम चारित्र्य व वर्तणूक असणारा व चांगली शैक्षणिक पात्रता असणारा (अपेक्षित पणे आवश्यक नाही) महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना कॉलेज मेस मध्ये स्वत:च्या मदतीसांठी काम करणारा विद्यार्थी | योग्य उमेदवार नाही. |
| १९) विमल पिता भोजू चौधरी पारितोषिक | तृतीय वर्ष विज्ञान (प्रधान रसायनशास्त्र) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारी विद्यार्थीनी. | वाणी सुवर्णा त्र्यंबकराव |
| २०) महादेव काशिनाथ थत्ते पारितोषिक | तृतीयवर्ष विज्ञान (केमिस्ट्री) प्रिंसीपल या परीक्षेत महाविद्यालयातून सर्व प्रथम येणारा विद्यार्थी (विदाऊट बॅकलॉग) | दोशी जिग्नेश बच्चुभाई |
| २१) सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | उच्च माध्य. (१२ वी विज्ञान) या परीक्षेत महाविद्यालयांत सर्वाधिक गुण मिळविणारा व प्रथमवर्ष विज्ञान या वर्गात महाविद्यालयांत प्रवेश घरारा विद्यार्थी. | कु. पांडे राजश्री सुधीर |

| अ.क्र. | पारितोषिक/शिष्यवृत्तीचे नांव | तपशील | पारितोषिक/शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांव |
|---|---|---|---|
| २२) | प्रा. अं.ग. चिपळूणकर पारितोषिक | तृतीय वर्ष कला (इंग्रजी) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा व याच महाविद्यालयांत एम.ए. (इंग्रजी) वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी | साखळे भगवान खंडू |
| २३) | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | या महाविद्यालयांत ११ वी विज्ञान या वर्गात प्रवेश घेणाऱ्या व शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | पाटील रणधीर तानाजीराव |
| २४) | मनूमाई देसाई पारितोषिक | या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी. | पाटील रणधीर तानाजीराव |
| २५) | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | या महाविद्यालयांत ११ वी वाणिज्य या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | अग्रवाल प्रणय मिठुलाल |
| २६) | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | तृतीय वर्ष वाणिज्य या परीक्षेत महाविद्यालयातून सर्व प्रथम येणारा विद्यार्थी | कु. कावडीया निता विरेन्द्र |
| २७) | घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | बी.कॉम वर्गातून सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी | कु. कावडीया निता विरेन्द्र |
| २८) | कै. बाबुराव लेले पारितोषिक | तृतीयवर्ष कला या परीक्षेत इंग्रजी (आवश्यक) या विषयांत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | झोपे उज्ज्वलकुमार मुरलीधर |
| २९) | सौ. लिला महादेव अदवंत पारितोषिक | प्रथमवर्ष कला या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | प्रेमसागर पंकजकुमारा शंकर |
| ३०) | शरद डी. प्रधान पारितोषिक | तृतीय वर्ष विज्ञान संख्याशास्त्र (प्रधान) या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणशरा विद्यार्थी | कुं. चौधरी देवयानी प्रभाकर |
| ३१) | डॉ. शं.रा. पुणतांबेकर पारितोषिक | तृतीयवर्ष कला या परीक्षेत हिन्दी (प्रधान) विषय धरुन सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी (अग्रीगेट मार्क्स) | जावळे सुनंदा देवराम |
| ३२) | प्रा.मो.स. भावे पारितोषिक | प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गातून वार्षिक परीक्षेत अर्थशास्त्र या विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | साकरे सचिन रमाकांत |
| ३३) | प्रा.मो.स. भावे पारितोषिक | तृतीय वर्ष कला या वर्गातून अर्थशास्त्र हा विशेष विषय घेऊन्न (द्वितीय व तृतीय वर्षातील अर्थशास्त्राचे एकूण पेपर) सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | यादव विजय रामसजीवन |

| अ.क्र. पारितोषिक/शिष्यवृत्तीचे नांव | | तपशील | पारितोषिक/शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांव |
|---|---|---|---|
| ३४) प्रा.मो.स. भावे पारितोषिक | | एम.ए. अर्थशास्त्र (संपूर्णस्तर) या वर्गातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ढाके सुरेश भास्कर |
| ३५) घन:श्याम काशिराम पाटील (अमोदे) पारितोषिक | ५०१/- | एम.ए. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | पाटील कैलास जगन्नाथ |
| ३६) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | ५०१/- | एम.ए. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थिनी | श्रीमती शर्मा उषा कृष्णकांत |
| ३७) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | ५०१/- | एम.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | संजय प्रभाकर चौधरी |
| ३८) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | ५०१/- | एम.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी | कु. नागपूरे हेमलता पंढरीनाथ |
| ३९) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | ५०१/- | एम.कॉम. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | राजू शंकर भोसले |
| ४०) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | ५०१/- | एम.कॉम. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी | कु. फराटे मंजुषा रमेशचंद्र |
| ४१) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | २५१/- | बी.ए. वर्गातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | परदेशी सुरेश ब्रिजलाल |
| ४२) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | २५१/- | बी.ए. वर्गातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | कु. चतुर सुहास चंद्रशेखर |
| ४३) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | २५१/- | बी.एस्सी. वर्गातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | वाणी राजेश अंबादास |
| ४४) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | २५१/- | बी.कॉम. वर्गातून सर्वप्रथम येणारी विद्यार्थी | कु. कोलते पौर्णिमा नारायण |
| ४५) घन:श्याम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | २५१/- | बी.कॉम. वर्गातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | जोशी मिलींद दत्तात्रय |

**मुद्रक- मयुरेश प्रिंटर्स,** ८२, नवीपेठ, जळगाव फोन- २८२७७
**टाईपसेटर्स- ओम कॉम्प्युटर्स,** ५२, नवीपेठ, जळगाव.
**प्रकाशक- प्राचार्य डी.एस. नेमाडे**
**मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव**
फोन- कॉलेज ऑफिस- २४२८१, प्राचार्य ऑफिस- २७३६३,
प्राचार्य निवास- २४३१०